वृषाली जोशी



# महान अपेक्षा

# GREAT EXPECTATIONS

CHARLES DICKENS

# Great Expections

# महान अपेक्षा

## लेखक- चार्ल्स डिकन्स

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# महान अपेक्षा

लेखक - चार्ल्स डिकन्स

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २० एप्रिल २०२५



©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे चौपन्न पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५



# चार्ल्स डिकन्स

चार्ल्स डिकन्स पोर्टस्माऊथ येथे १८१२ साली जन्मला व गडशील येथे १८७० साली वारला. त्याला लहानपणी खूप कष्ट सहन करावे लागले. १८१४ साली त्याच्या वडिलांना कर्ज न फेडल्याने, तुरुंगात जावे लागले. आणि चार्ल्सला कारखान्यात काम करून, उपजीविका करावी लागली. इंग्लंडमधील त्या दिवसात त्याच्यावर ओढवलेल्या परिस्थितीचे व अनुभवांचे प्रतिबिब त्याच्या या कादंबरीत पडलेले दिसते.

# Great Expections

# महान अपेक्षा

# प्रकरण १

# चर्चच्या अंगणातील मनुष्य




मला वाटते, ही मला सर्वात घाबरवणारी गोष्ट होती.

आता मी पूर्ण वाढ झालेला पुरुष आहे. पण त्यावेळी मी लहान मुलगा होतो आणि अजूनही मला त्या भीतीचा थरार जाणवतो. खूप वर्षांपूर्वी नाताळच्या त्या संध्याकाळी मला वाटलेली भीती!

मी कुठल्यातरी कारणाने चर्चच्या अंगणात फिरत होतो आणि मला माझ्या आईवडीलांचे थडगे सापडले. ती एक कलत आलेली, थंड व ओलसर दुपार होती. समुद्राकडून येणारा वारा जोरात वहात होता आणि चर्चच्या भिंतीपलीकडे, तिथे पाणी साठलेल्या ठिकाणी रानटी अंधार भरून राहीला होता. नदीचा खळखळाट त्याला छेदत होता. मी आधीच थरथरत होतो. मला भीती वाटून हरवल्यासारखे वाटत होते. तेव्हा स्मशानाच्या दगडांमधून एक आकृती वर आली आणि मी गर्भगळीतच झालो.

एक विचित्र आवाज ऐकू आला, “गडबड करू नका. अरे लहानशा राक्षसा, शांत रहा, नाहीतर मी तुझा गळा घोटीन!”

त्या भीतीदायक माणसाने माझ्या हनुवटीला धरले. त्याने त्याच्या खरखरीत त्वचेवर गरीबीचे कपडे घातले होते. डोक्यावर टोपी नव्हती. बूट फाटके होते. आणि त्याने डोक्याला एक जुनाट चिंधी बांधली होती. तो मनुष्य ओला असून चिखलाने माखलेला होता. तो थरथर कापत होता. तो माझ्या डोळ्यात टक लावून बघतांना, त्याच्या मेंदूत काही बिघाड झाल्यासारखे त्याचे दात वाजत होते.

मी भीतीने घाबरून, गयावया करत म्हणालो, “माझा गळा घोटू नका. असे काही करू नका.”

तो मनुष्य मला हलवत बोलला, “चल झटपट तुझे नाव सांग.”

“पिप, सर.”

माझ्याकडे बघत तो म्हणाला, “काय?

“ते खरे तर फिलीप आहे. पण मला सगळे पिप म्हणतात.”

“तू कुठे रहातोस, ते आम्हाला दाखव. ”मी झाडांमधील, चर्चपासून सुमारे मैलभर अंतरावरील आमच्या गावाच्या दिशेने बोट दाखवले.

त्या माणसाने क्षणभर माझ्याकडे पाहिले. मग वरपासून खालपर्यंत माझी चाचपणी करून माझे खिसे रिकामे केले. त्यात पावाचा एक तुकडा सोडून, काहीच नव्हते. तो इतका बळकट होता, की तो माझ्या आधी क्षणार्धात, चर्चपाशी पोचला. मी थरथरत, स्मशानातील मोठ्या दगडावर बसलो होतो. तेव्हा त्याने भुकेलेल्या अधाशी पशुसारखा तो पावाचा तुकडा खाल्ला.

धमकी दिल्यासारखे डोके हलवत, अचानक तो ओरडला, “तू लहानशा कुत्र्या, तुझे गाल किती गोबरे आहेत. माझ्या मनात, तुला खाऊन टाकायचा विचार घोळतो आहे.” मी तो मला खाणार नाही, या आशेने घाईघाईने दगडाला घट्ट धरून रडू आवरले. मग तो म्हणाला, “इकडे बघ, तुझी आई कुठे आहे?

मी म्हणालो, “तिथे, सर.”

तो उडी मारून पळू लागला. मग थांबून मी निर्देश केलेल्या दिशेकडे बघू लागला.

मी घाबरटपणे परत स्पष्ट केले, “तिकडे, सर. ती वारली आहे आणि माझे वडीलही.”

त्याने क्षणभर ते ऐकून घेतले व मग बोलला, “समजा, मी तुला जिवंत सोडले, तर तू कुणाबरोबर रहातोस? “माझी बहीण, मिसेस जो ग्रेगरी बरोबर. तिचा नवरा जो ग्रेगरी, हा लोहार आहे.”

तो म्हणाला, “लोहार?” आणि त्याच्या पायाकडे बघू लागला.

तो पुढे आला. मला दोन्ही हातांनी पकडले आणि मला इतक्या जोराने मागे ढकलले व माझ्या डोळ्यात रोखून बघू लागला.

त्याने विचारले, “कानस म्हणजे काय ते तुला माहिती आहे का?”

“हो, सर.”

“आणि अन्न म्हणजे काय असते, ते माहिती आहे का?

”हो, सर.” प्रत्येक प्रश्नानंतर त्याने मला अजून अजून मागे ढकलले व सांगितले, “माझ्यासाठी कानस घेऊन ये. आणि थोडे अन्नदेखील आण. हे दोन्ही आण. नाहीतर मी तुझे हृदय बाहेर काढेन.” त्याने मला परत ढकलले.

मी त्याला दोन्ही हातांनी पकडून ठेवले. “कृपया मला सरळ उभे राहू दे. त्यामुळे कदाचित मी नीटपणे तुमचे बोलणे ऐकू शकेन.”

त्याने मला सरळ केले. मग मला चर्च परत नीट दिसू लागले. त्याने मला दगडावर सरळ धरून ठेवले.

“तू मला उद्या सकाळी लवकर कानस व अन्न आणून दे. त्या तिथे जुनी बॅटरी आहे, तिथे मला हे आणून दे. आणि मला पाहील्याचे कुणालाच बोलू नको. मग मी तुला ठार करणार नाही. जर असे न करता, तुझे तोंड उघडलेस, तर तुझे हृदय मी ओरबाडून बाहेर काढेन आणि ते भाजून खाऊन टाकेन. तुला वाटेल, मी एकटाच आहे, तर ते तसे नाही. माझ्याबरोबर एक लपलेला भयानक दुष्ट, तरुण मनुष्य आहे. त्याला मुलाचे हृदय ओरबाडून कसे बाहेर काढायचे, ते माहिती आहे. मी या क्षणी त्याला तुझ्यापासून दूर ठेवेन, पण मोठ्या कष्टाने. कमालीचा त्रास घेऊनच मी हे करू शकेन. हे करायला मला फार कष्ट पडतील. बोल, आता तू काय म्हणतोस?”

मी त्याला सांगितले, की उद्या सकाळी लवकर मी कानस व अन्नाचे काही शिळेपाके तुकडे जुन्या बॅटरीपाशी आणेन. तो मनुष्य म्हणाला, “देवाशपथ, तू ते आणले नाहीस तर, तू प्राणाला मुकशील.”

यानंतर त्याने मला खाली उतरवले. तो म्हणाला, “आता तुला काय करायचे आहे, ते लक्षात ठेव व त्या तरूण माणसालाही लक्षात ठेव --- आता घरी जा!”

मी घाबरत म्हटले, “शुभ रात्र, सर.”

थंड ओलसरपणाकडे बघत तो बोलला, “अरेरे! मी बेडूक असायला हवा होतो.”

त्याच वेळेस त्याने त्याचे कापणारे शरीर दोन्ही हातांनी चर्चच्या भिंतीवर दाबून धरले. तो कडक पाय असल्यासारखा, भिंतीशी पोचला, तेव्हा त्याने वळून माझ्याकडे पाहीले. मी वेळ न गमावता, माझ्या पायांचा सर्वात जास्त चांगला उपयोग करून, कुठेही न थांबता घरी पोचलो.



# प्रकरण २

# दलदलीवरील सकाळ



माझी बहीण मिसेस जो ग्रेगरी माझ्यापेक्षा वीस वर्षांने मोठी होती. ती काहीदिसायला चांगली बाई नव्हती. ती फारच उंच आणि बारीक होती. आणि तिची कांती खूप लाल होती. माझी कल्पना अशी होती, की जसे ती मला करायच्या नसलेल्या अनेक चांगल्या गोष्टी करायला भाग पाडत असे, तसे तिने जो

ला तिच्याशी लग्न करायला भाग पाडले असणार. जो मोठा, छान केस असलेला, गोड स्वभावाचा व निळया डोळयांचा बळकट माणूस होता.

मी घरी पोचलो, तेव्हा ते स्वयंपाकघरात होते. मिसेस जो ने घड्याळाकडे पाहीले. “काय रे तरूण माकडा, तू एवढा वेळ कुठे होतास?”

मी बारीकशा व घाबरट आवाजात म्हणालो, “मी चर्चच्या अंगणात होतो. मिसेस जो ने रागाने तिच्या नवऱ्याकडून माझ्याकडे बघत म्हटले, आता एखादे दिवशी मला तुम्ही दोघे चर्चच्या अंगणात घेऊन जाणार आहात.

जो धुराड्याच्या कोपऱ्यात बसला होता. मी सरकत जाऊन, त्याच्या समोर बसलो. माझी बहीण चहा करत होती. लांबून स्फोटाचा आवाज ऐकून, आम्ही सगळे उड्या मारून धाऊ लागलो.

मी बोललो, “जो, हे बंदुकीचे बार आहेत का?”

जो म्हणाला, “हो. दुसरा गुन्हेगार उडाला.”

मी विचारले, “म्हणजे काय?”

माझ्या बहिणीने अधीरपणे म्हटले, “पळून गेला. तो पळून गेला.”

जो म्हणाला, “काल सूर्यास्तानंतरच्या रात्री एकजण ठार झाला आणि आता असे दिसते आहे, दुसऱ्याला ते बंदुकीने टिपणार आहेत.”

मी बोललो, “कोण बंदुक चालवते आहे?”

माझी बहीण म्हणाली, “या मुलाचे कल्याण होवो. हे हल्कस [एका जागी उभे असलेले व तुरुंगासारखे वापरले जाणारे जहाज.] मधून केले गेले आहे.”

“आणि कृपया मला हल्कस म्हणजे काय ते सांग.”

जो म्हणाला, “”हल्कस म्हणजे दलदली पलीकडील जहाज तुरुंग.”

मी आशेने म्हणालो, “मला नवल वाटते, जहाज तुरुंगात कुणाला व का ठेवतात?”

हे माझ्या बहिणीला जरा अती झाले.

ती बोलली, “या मुलाचे हे असेच असते. त्याच्या एका प्रश्नाचे उत्तर द्या की तो पुढचे डझनभर प्रश्न विचारेल.”

खून व चोरी करणाऱ्या व इतरही सर्व वाईट गोष्टी करणाऱ्या लोकांना जहाज तुरुंगात ठेवले जाते आणि ते नेहमी आधी प्रश्न विचारून सुरवात करतात. आता तू झोपायला जा. मी अंधारात वर गेलो, तेव्हा मला खात्रीने वाटले, की मी हल्कसच्या वाटेवर आहे. मी प्रश्न विचारायला सुरवात केलीच होती. आणि मी मिसेस जो कडे चोरी करणार होतो.

रात्रभर मला एकच स्वप्न पडत होते, की जिथे एक भयंकर तरुण मनुष्य माझे हृदय ओरबाडून बाहेर काढण्यासाठी थांबलेला आहे, अशा मोठ्या पूर आलेल्या नदीत मी तरंगतो आहे.

जराशा अंधारमय अशा पहाटेच्या धूसर प्रकाशात, मी जिना उतरून, खाली येतांना वाटेतील प्रत्येक फळा मला जणू म्हणत होता, “अरे चोरा, थांब!”, मिसेस जो,उठा! मी थोडा पाव, चीज, लोणच्याची अर्धी बाटली, काही ब्रँडी, [जिच्यात एके काळी औषध होते], मासाचा गोल, सुंदर केक; हे सर्व चुकून घ्यायचे रहायला नको म्हणून, कोणी उठायच्या आत गोळा केले. जो च्या हत्यारांच्या खोलीकडे जाणारे स्वयंपाकघरातील एक दार होते. उघडून मी ते त्यातील कानस चोरले. मग घराचे दार उघडून, मी दलदलीच्या दिशेने पळत सुटलो. बॅटरीकडे जाणारा रस्ता

मला माहिती होता, कारण तिथे रविवारी मी जोबरोबर जात असे. बॅटरीजवळील खड्ड्याशी मी आलो, तेव्हा मला जमिनीवर बसलेला तो मनुष्य दिसला. त्याने हातांची घडी घातलेली होती व तो पुढे झुकलेला होता. त्याला अजूनही झोपेने घेरलेले होते. मी हळूच जाऊन, त्याच्या खांद्याला स्पर्श केला. त्याने झटक्यात उडी मारली. पण तो, तो मनुष्य नव्हता.

पण या मनुष्यानेदेखील त्याच्या खरखरीत त्वचेवर गरीबीचे कपडे घातले होते. डोक्यावर टोपी नव्हती. बूट फाटके होते. आणि त्याने डोक्याला एक जुनाट चिंधी बांधली होती. त्याच्या पायात एक लोखंडी कडे होते. मी हे सर्व एका क्षणार्धात पाहीले, कारण माझ्याकडे तेवढाच वेळ होता. तो शपथपूर्वक काही म्हणाला, माझ्यामुळे तो प्रभावित झाला. मग तो धुक्यामध्ये पळून गेला.

मी खूप घाबरलो होतो. मी विचार केला, ‘तो, तो तरुण मनुष्य असावा.’ आणि बॅटरीच्या दिशेने जोरात पळू लागलो. तिथे थरथरणाऱ्या शरीरावर हातांची घडी घातलेला योग्य माणूस होता. माझी वाट बघत तो वरखाली येरझऱ्या घालत होता. तो थंडीने भलताच गारठला होता आणि त्याचे डोळे फार भुकेलेले दिसत होते. मी त्याला कानस दिली तेव्हा माझ्या जवळ अजून काही आहे का, हे न पाहता मला असे वाटले, की तो तीच खातो की काय.

त्याने विचारले, “बाटलीत काय आहे?”

मी सांगितले, “ब्रँडी”

मी आणलेले अन्न तो मोठ्या अधाशीपणे घशाखाली ढकलत होता. पण

ब्रँडी पिण्यासाठी त्याने ते बाजूला ठेवले. काही ऐकायची वाट बघत असल्यासारखा, सर्व वेळ तो धुके निरखीत बसला होता.

त्याने अचानक विचारले, “तुझ्याबरोबर कुणी आलेले नाही? किंवा मागून कुणी येत नाही आहे ना?”

“नाही सर, नाही.”

तो बोलला, “ठीक आहे. मी तुझ्यावर विश्वास ठेवतो. तुझ्या वयाच्या मानाने तू फार भयानक आहेस. जर एखाद्या बिचाऱ्या, जवळजवळ मरणप्राय स्थितीला पोचलेल्या माझ्यासारख्या गुन्हेगाराला सापळ्यात पकडायचा प्रयत्न करायला तू मदत केलीस, तर!

त्याच्या दुःखी कष्टी अवस्थेची मला दया आली. केक खाऊन संतुष्ट झालेले असे त्याला मी पाहीले.

मी म्हणालो, “तू हे खाणे मनापासून खाल्ल्याचे बघून, मला आनंद झाला.”

“मुला, मी तुझा आभारी आहे. मला खाणे खूपच आवडले.”

मी नेहमी आमच्या मोठ्या कुत्र्याला खाणे खातांना बघितले होते. त्याच्यात व या माणसात मला खूपच साम्य आढळले. हा मनुष्य गपागप मोठे घास घेऊन कुत्र्यासारखे खात होता. खातांना इकडे तिकडे बघत होता. जसे काही कोणीतरी येऊन, त्याचे खाणे हिसकावून घेणार आहे.

मी जरा वेळाने म्हणालो, “मला भीती आहे, की तू त्याच्याकरता काही ठेवले नाहीस.”

माझा मित्र माझ्याकडे टक लाऊन बघत बोलला, “कोण तो?”

“तू म्हणालेला, तुझ्याबरोबर लपून बसलेला तरुण मनुष्य.”

तो थोडा हसला. तो म्हणाला, “ओहो, तो? त्याला खाणे नको होते.”

मी बोललो, “त्याच्याकडे बघून मला तो भुकेलेला वाटला.

माझा मित्र खाणे संपवून, माझ्याकडे आश्चर्याने बघू लागला.

“तू त्याला बघितलेस? केव्हा?

“आताच.”

“कुठे?”

मी निर्देश करत म्हटले, “त्या तिथे. तो अर्धवट झोपेत होता. त्याला मी तूच समजलो.”

त्याने माझी हनुवटी धरली व माझ्याकडे इतक्या भयानकपणे पाहीले, की त्याने पहील्यांदा मला दिलेली माझा गळा घोटायची धमकीच आठवली.

मी स्पष्ट केले, “त्याचे कपडे तुझ्यासारखेच होते. त्याच्या पायात लोखंडी कडे होते. तुला काल बंदुकीचा मोठा आवाज ऐकू आला नाही का?”

तो स्वतःशीच बोलला, “म्हणजे तो बंदुकीचा मोठा आवाज होता तर! मला थोडा धक्का देत त्याने विचारले, “तुला या माणसाबद्दल विशेष असे काही जाणवले का?”

“हो, त्याच्या चेहऱ्यावर जागोजागी मार खाल्ल्याच्या खुणा होत्या.” हे मी खरे तर नीटसे पाहीले नव्हते.

तळहाताने, त्याचा डावा गाल घासत, तो बोलला, “असा इथे का?”

“हो, तिथेच.”

उरलेले थोडेसे अन्न त्याच्या करड्या जाकीटात ठेवत, तो ओरडला, ”तो कुठे आहे? तो कुठल्या रस्त्याने गेला, ते मला दाखव. मी त्याला गाठतो. माझ्या सुजलेल्या पायावर, मी हे शस्त्र चालवतो. मुला, मला कानस दे.”

तो ओल्या गवतावरून चालत गेला. आणि वेड्यासारखे त्या कानसला धार लावू लागला. त्याने माझ्याकडे वा त्याच्या पायाकडे लक्ष दिले नाही. तो पाय सुजला होता व रक्ताने लाल झाला होता. त्याचा वेडेपणा बघून व घरापासून इतका वेळ दूर राहून, मला परत त्याची फार भीती वाटू लागली. मी त्याला म्हणालो, की मला गेले पाहीजे. पण त्याने काही लक्ष दिले नाही. त्यामुळे मी ठरवले की सर्वात चांगली गोष्ट म्हणजे पळून जाऊ या.

मी त्याला शेवटचे पाहिले, तेव्हा त्याचे डोके गुडघ्यावर वाकले होते. आणि तो त्याच्या कानसवर जोरजोरात काम करत होता. मी धुक्यात त्याला शेवटचे ऐकायला थांबलो, तेव्हा अजूनही कानस घासल्याचा आवाज येत होता.



# प्रकरण ३

# शिकार




त्या दिवशी जेवणासाठी आमच्याबरोबर मिस्टर वोपल, चर्चमधील कारकून व काका पम्ब्लेचूक, जो चे काका व जवळच्या गावातील मक्याचे श्रीमंत व्यापारी होते. जेव्हा जो आणि मी चर्चमधून परत आलो, तेव्हा टेबल मांडलेले होते. मिसेस जो ने तिचा छान ड्रेस घातला होता. स्वयंपाक व प्रत्येक गोष्ट उत्कृष्ट होती आणि

सकाळच्या चोरीचा कुठे उल्लेख देखील नव्हता. मला चर्चमध्ये बराच त्रास झाला. तिथे मी केलेल्या पापाबद्दल मी क्षमा मागितली.

आम्ही सर्वजण टेबलाशी बसलो, तेव्हा तो क्षण आला. मला स्वप्नातल्या सारखे जेवण दिले गेले. ते झाल्यावर, मी विचार करू लागलो, की मी सुरक्षित आहे. पण तेव्हा माझी बहीण पाहुण्यांना म्हणाली, “तुम्ही मी केलेल्या केकचा तुकडा चाखून पाहिला पाहीजे.

मी टेबलाच्या पायाला घट्ट धरून ठेवले.

त्यांनी चव पाहिलीच पाहिजे का? त्यांना *तो* चाखण्याची फारच कमी आशा होती.

पम्ब्लेचूक काका मोठ्याने श्वास घेणारा, मध्यमवयीन व मंद माणूस होता. त्यांचे तोंड माशासारखे होते. डोळे मिचमिचे पण रोखून बघणारे होते आणि वाळूच्या रंगाचे केस डोक्यावर ताठ उभे रहाणारे होते. ते म्हणाले, “ठीक आहे, मिसेस जो, आम्ही मोठ्या आनंदाने त्याचा आस्वाद घेऊ.”

माझी बहीण तो केक आणायला गेली. मी मिस्टर पम्ब्लेचूक काकांनी [केक कापण्यासाठी] हातात सुरी सरसावलेली पाहिली. मी जो ला असे म्हणतांना ऐकले, “पिप, तू थोडा घे.”

मला वाटले मला अजून हे सहन होणार नाही. मी धरलेला टेबलाचा पाय सोडून दिला आणि पळून गेलो. पण मी थोडासा पुढे जातो की नाही, तोच, मी उघडे टाकलेल्या घराच्या दारात मला सैनिकांची फौज दिसली. त्यांच्या खांद्यावर बंदूक लटकवलेली होती. त्यांच्यापैकी एकाने मला बेड्याची एक जोडी दिली व म्हणाला, “अरे मुला, हे तुझ्यासाठी आहे.”

दारात सैनिकांना बघून, जेवणारी मंडळी गोंधळून उठली आणि मिसेस जो रिकाम्या हातांनी स्वयंपाकघरातून परत आली. थोडी थांबली. निरखून बघितले व आश्चर्याने म्हणाली, “केक नाहीच आहे.”

माझ्याशी सार्जंट बोलला होता. आता त्याच्या उजव्या हातात त्याने बेड्या धरलेल्या होत्या व डावा हात माझ्या खांद्यावर होता. तो म्हणाला, “सभ्य स्त्रीपुरुषहो, मी पळालेल्या गुन्हेगारांचा पाठलाग करतो आहे आणि बेड्यांचे कुलूप तुटले आहे आणि मला त्या चोरांच्या हातात लगेच ठोकायच्या आहेत. तुम्ही कृपया त्या बघाल का?”

जो त्यांच्याकडे बघून म्हणाला, की ते काम करायला थोडा वेळ लागेल. मधल्या वेळात कदाचित. सैनिक आत येऊ शकतात व थोडे खाऊ, पिऊ शकतात. ते ऐकून त्यांना अर्थातच आनंद झाला.

मिस्टर वोपलने विचारले, “ सार्जंट, तुम्ही चोरांना पकडू शकाल, अशी तुम्हाला खात्री आहे का?” तेव्हा त्यांना खाणे पिणे देण्यात आले होते.

सार्जंट म्हणाला, “हो. ते अजून दलदलीजवळच आहेत. तुमच्यापैकी कोणी त्यांना पाहीले का?”

मी सोडून सगळे खात्रीपूर्वक नाही म्हणाले. माझा विचार कुणीच केला नाही.

शेवटी जो चे काम आले. त्याने त्याचा कोट परत घातला, तेव्हां त्याने सुचवले, की सैनिकांबरोबर कुणीतरी जावे आणि त्याना चोर सापडतो का, ते पहावे. मिस्टर पम्ब्लेचूक काकांना अशी काही इच्छा नव्हती. पण मिस्टर वोपल म्हणाले, की जो येणार असेल, तर ते जातील. जो ने त्यांना सांगितले की आपण पिपला ही घेऊन जाऊ. माझी बहीण म्हणाली, “जर या मुलाला जर लहान

बंदुकीच्या मोठ्या नळीने त्याचे डोके उडवलेल्या अवस्थेत परत आणलेत, तर, ते परत बसवायची माझ्याकडून खात्रीने अपेक्षा करू नका. सार्जंटने कडकपणे आम्हाला आज्ञा दिली, की आम्ही सैनिकांच्या मागे रहावे आणि दलदलीजवळ पोचल्यावर, एकही शब्द बोलू नये. जेव्हा आम्ही मोकळ्या हवेत बाहेर पडलो, तेव्हा मी जो जवळ कुजबुजलो, "मला अशी आशा आहे, की ते आम्हाला सापडणार नाहीत. आणि जो ने कुजबुजत उत्तर दिले, "पिप, ते दलदलीतून बाहेर पडले, हे समजल्यावर, मी तुला एक डॉलर देईन. चर्चच्या अंगणाशेजारील गेटने आम्ही बाहेर पडलो व दलदलीच्या वाटेला लागलो. एकदम जोरात आलेल्या पावसाने आम्हाला झोडपून काढले. मला पहील्यांदा असे वाटले, की माझ्या गुन्हेगाराने आम्हाला वाटेत पाहीले, तर त्याला असे वाटेल, की मीच त्याला पकडायला पोलीसांना आणले आहे की काय? पण हा प्रश्न आता स्वतःला विचारून, काही उपयोग नव्हता. मी जो च्या पाठीवर बसलो होतो. आणि सैनिक एका ओळीत आमच्या पुढे बॅटरीच्या दिशेने चालले होते.

आम्ही काही वेळ चालत होतो. तेव्हा अचानक आम्ही सर्वजण थांबलो. वाऱ्यावर व पावसावर आरूढ होऊन, लांबलचक आरडाओरडा ऐकू आला. तो परत परत आला. नाही. त्या एकत्रितपणे मारलेल्या दोन तीन किंकाळ्या होत्या.

सार्जंट आणि सैनिक उजवीकडे धाऊ लागले. जो त्यांच्यामागे इतक्या जोरात धाऊ लागला, की मी पडू नये म्हणून मला त्याला घट्ट धरून ठेवावे लागले.

जसे आम्ही ओरडणाऱ्या लोकांजवळ आलो, तसे आम्हाला दिसले की ते बरेच लोक एकत्रितपणे ओरडत होते. जेव्हा आम्ही धावलो, तेव्हा गोंगाट बंद झाला. सार्जंट पहिल्यांदा पुढे गेला. त्याच्यामागे दोन सैनिक होते. इतर सैनिक थांबले व त्यांनी त्यांच्या बंदुका सरसावल्या.

खड्ड्याच्या तळाशी जायचा प्रयत्न करत, सार्जंट ओरडला, “ते इथे आहेत. तुम्ही दोघे पशु, शरण या. खड्ड्यातून बाहेर या.!”

तिथे भरपूर चिखल आणि पाणी होते. शापवाणी उच्चारली जात होती. गुद्दागुद्दीला जोर आला होता. सार्जंटबरोबर अजून काहीजण खड्ड्यात उतरले आणि त्यांनी सार्जंटला मदत केली. त्यांनी माझ्या गुन्हेगाराला व दुसऱ्याला वेगवेगळे ओढून बाहेर काढले.

माझा गुन्हेगार त्याच्या चेहऱ्यावरील रक्त शर्टाच्या बाहीने पुसत, म्हणाला, “लक्षात ठेवा. *मी* त्याला तुमच्या हवाली केले आहे. *मी* हे केले असल्याचे लक्षात ठेवा.”

सार्जंट बोलला, ”त्यामुळे तुझे थोडे भले होईल. बेड्या आणा.” माझा गुन्हेगार हावरट हास्य करत, म्हणाला, ”तुम्ही माझे काय भले करणार! मला ते काही नको. जोपर्यंत त्याला ते माहिती आहे, तोपर्यंत ते माझ्यासाठी पुरेसे आहे. दुसऱ्या गुन्हेगाराच्या अंगावर जागोजागी जखमा दिसत होत्या. व कातडी फाटली होती. तो इतक्या वाईट अवस्थेत होता, की त्यांना बेड्या घालेपर्यंत त्याला बोलण्यासाठी धड श्वासदेखील घेता येत नव्हता.

दुसऱ्या गुन्हेगाराचे पहीले शब्द होते, “याची नोंद घ्या, तो माझा खून करायला बघत होता!

माझा गुन्हेगार बोलला, “मी खून करायला बघत होतो! मी तर तसे न करायचा प्रयत्न करत होतो. मी त्याला पकडून, तुमच्या हवाली केले. मी त्याला ओढून आणले --- “

दुसरा मध्येच ओरडला, "त्याने मला ठार मारायचा प्रयत्न केला. जर तुम्ही आला नसतात, तर आतापर्यंत, मी मेलो असतो."

सार्जंट बोलला, "अरे मूर्खांनो, गप्प बसा. सैनिकांनो, तुम्ही तुमच्या विजेऱ्या पेटवा." बंदुकीऐवजी हातात टोपले असलेला सैनिक गुडघ्यांवर खाली बसला. आणि टोपली उघडली. माझ्या गुन्हेगाराने भोवताली प्रथमच पाहीले आणि त्याने मला पाहीले. मी जो च्या पाठीवरून खाली उतरलो. आणि खड्डयाच्या कडेला उभा राहीलो. माझा हात थोडासा हलवला आणि डोकेही हलवले. आणि त्याला सांगायचा प्रयत्न केला, की मी निष्पाप आहे. त्याने माझ्याकडे कुठल्या दृष्टीने पाहीले, ते मला समजले नाही. हे क्षणार्धात घडले.

हातात टोपली असलेल्या सैनिकाने विजेरी काढली. गोलार्धात एकमेकांना विजेऱ्या दिल्या गेल्या. आधी अंधार होताच पण आता अगदी गुडूप अंधार झाला. आम्ही काही हालचाल करण्यापूर्वी चार सैनिकांनी हवेत गोळीबार केला. लगेच आम्ही आमच्या मागे, नदीच्या दुसऱ्या तीरावरील दलदलीत विजेऱ्यांचा लखलखाट झालेला पाहीला.

सार्जंट बोलला, "ठीक आहे, पुढे चला."

आम्ही थोडेसे पुढे जातो तोच, आमच्यासमोर तोफेचे तीन गोळे उडवले गेले. त्यामुळे माझ्या कानात स्फोट झाल्यासारखा आवाज आला. सार्जंट माझ्या गुन्हेगाराला म्हणाला, "तुला जहाजात चढायचे आहे. त्याना तू येणार असल्याचे माहिती आहे. बोट जहाजाजवळ घ्या."

आम्ही सैनिक व गुन्हेगारांच्या मागून, एका लाकडी झोपडीपर्यंत व नदीशेजारील जमिनीपर्यंत गेलो. झोपडीबाहेर एक रक्षक होता. आणि आत तीन

चार सैनिक आराम करत होते. सार्जंटने काही अहवाल लिहिला आणि पुस्तकात काही नोंद केली.

माझ्या गुन्हेगाराने माझ्याकडे पाहिलेही नाही. आम्ही झोपडीत उभे असतांना, तिथे पेटवलेल्या शेकोटीकडे तो विचारपूर्वक बघत होता. पण अचानक सार्जंटकडे वळून म्हणाला, “मी गावातून काही अन्न मागवले.”

सार्जंट मध्येच बोलला, “म्हणजे चोरले.”

तो सार्जंटकडे बघून बोलला, “मी भुकेला राहू शकत नाही, शकतो का? मी ते कुठून मिळवले, ते मी तुम्हाला सांगतो. त्या लोहाराकडून. तो पावाचा तुकडा, चीज, काही ब्रँडी आणि केक एवढे होते.”

सार्जंटने जो ला विचारले, “केकसारख्या वस्तूला तुम्ही मुकलात का?” “जेव्हा तुम्ही घरात आलात, त्याच क्षणी माझी बायको केकला मुकली.”

माझा गुन्हेगार जो कडे बघत म्हणाला, “मला माफ करा, पण तुमचा केक मी खाल्ला.”

जो म्हणाला, “ठीक आहे. तुम्ही खाल्लात ना? आम्हाला काही तुम्हाला उपाशी मारायचे नव्हते. पिप, तुला हे माहिती असेल.”

गुन्हेगाराला अजून काही बोलायचे असल्यासारखे त्याचे तोंड हलले, पण त्याने अचानक आमच्याकडे पाठ फिरवली. नंतर एक दोन मिनिटांने काही आरडाओरडा ऐकू आला, की त्याच्याकरता बोट थांबली आहे.

आम्ही त्याच्याबरोबर जेट्टीपर्यंत गेलो आणि त्याला बोटीत चढलेले पाहीले.

ती बोट त्याच्यासारखे गुन्हेगारच चालवत होते. विजेऱ्यांच्या प्रकाशाने, आम्ही तुरुंग जहाज किनाऱ्यापासून लोखंडी साखळ्यांनी बांधून, थोडे लांब उभे असलेले पाहीले आणि नंतर आम्ही त्याच्या कडेने बोट जातांना पाहीली.

मग आम्ही त्याला हल्कवर घेतलेले पाहीले आणि ते दृष्य नाहीसे झाले. जसे काही त्या फक्त गुन्हेगारांसाठीच होत्या. विजेऱ्या पाण्यावर प्रकाश पाडू लागल्या आणि नंतर मालवल्या गेल्या. जसे काही त्या फक्त गुन्हेगारांसाठीच होत्या.

मग विजेऱ्यांचा प्रकाशझोत पाण्यात पडला व बंद झाला, जसे काही सर्व तो दिसेनासा झाल्यावर संपले.



# प्रकरण ४

# मिस हॅविशाम



दिवस जात होते आणि मी माझ्या गुन्हेगार मित्राचा कमी कमी विचार करू लागलो. जसे जसे महिने गेले, तसे तसे आम्ही त्याच्याबद्दल काहीच ऐकले नाही. नंतरचा खूपसा काळ मी त्याला माझ्या मनातून हद्दपार केले.

बाजाराच्या दिवशी हे घडले. माझ्या बहिणीच्या काही वेळेच्या सवयी प्रमाणे, ती पम्ब्लेचूक काकांबरोबर शहरात त्यांच्या खरेदीवर काही सल्लामसलत करायला गेली होती. ते उशीरा घराकडे येत होते. अंधार झाल्यावर आम्हाला रस्त्यावरून लोखंडी बुटांचा आवाज येऊ लागला आणि

त्यांनी डोळ्यांपर्यंत कापड गुंडाळले होते. ते गाडीतून खाली उतरले. थोड्याच वेळात आम्ही सर्वजण स्वयंपाकघरात होतो आणि माझ्या बहिणीने घाई घाईने व उद्दीपित होऊन, सांगायला सुरवात केली. ती माझ्याकडे बघत म्हणाली, “आता आज रात्री हा मुलगा ऋण मान्य करत नसेल, तर तो तसा कधीच असणार नाही!” जो ने गोंधळून विचारले, “का?”

माझी बहीण म्हणाली, “कारण मी वरच्या गावातील मिस हॅविशामबद्दल, त्या वयस्क श्रीमंत बाईबद्दल ऐकले आणि अर्थात तो जाणार आहे. आणि त्याने तिथे खेळलेले बरे. नाहीतर मी त्याच्या लक्षात राहील, असे काही त्याला देईन.

ओहो --- अनेक मैल सभोवतालीचा प्रत्येकजण म्हणतो आहे, की तिला या मुलाने तिच्या घरी जाऊन खेळायला हवे आहे. ती तुरुंगासारख्या मोठ्या, अंधारी घरात रहाते. तिथे तिने स्वतःला जगापासून दूर कोंडून घेतले आहे.

जो आश्चर्यचकित होत ओरडला, ”अरे वा, याची तुला खात्री आहे का? मला नवल वाटते, तिला पिप कुठे सापडला?” माझी बहीण उत्तरली, मूर्ख! कोण म्हणाले तिला तो सापडला? पम्ब्लेचूक काकांना तिथे कधीकधी भाडे भरायला जावे लागते. तेव्हा ती त्यांना विचारत होती, की इथे येऊन खेळेल असा कोणी मुलगा त्यांना माहिती आहे का?” ते समजूतदार असल्याने, त्यांनी या मुलाचे नाव सुचवले. मिस हॅविशामकडे जाऊन, कदाचित त्याचे भाग्य उजाडेल. आज रात्री काका त्याला घेऊन गावात जाणार आहेत आणि मग सकाळी ते त्याला मिस हॅविशामकडे घेऊन जातील. आणि काका थांबलेले असतांना, मी इथे बोलत बसले आहे. हा मुलगा तर पायापासून डोक्यापर्यंत धुळीने माखला आहे! एवढे बोलून तिने मला पकडले आणि माझा चेहरा नळाच्या पाण्याखाली ठेवण्यात आला. आणि पंचाने खसाखसा चोळण्यात आला. तेव्हा कुठे मी माणसात आलो. हे झाल्यावर मला माझे सर्वात चांगले कपडे घालण्यात आले आणि पम्ब्लेचूक काकांकडे सुपूर्त करण्यात आले. मला मी तिथे का जात आहे, हे काही न विचारता, सांगता. त्यांच्याबरोबर मिस हॅविशामकडे खेळण्यासाठी पाठवण्यात आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी, दहा वाजता, पम्ब्लेचूक काका व मी मिस हॅविशामच्या गेटसमोर उभे होतो. ते कुलुपबंद होते. त्यामुळे घंटी वाजवल्यावर, कोणीतरी येऊन, ते उघडेपर्यंत, आम्हाला थांबावे लागले.

आम्ही थांबलो असतांना, मी गेटच्या गजांमधून बघत होतो. मी पाहिले, की ते अंधारी घर जुन्या विटांचे बांधलेले होते. त्याच्या सर्व खिडक्यांना गज होते. समोर मोठे अंगण होते. हातात किल्ल्या घेतलेल्या एका तरुण स्त्रीला मी ते ओलांडून येत असतांना पाहीले.

तिने गेट उघडतांना, मिस्टर पम्ब्लेचूक तिला म्हणाले, “हा पिप आहे. त्या सुंदर पण अभिमानी स्त्रीने विचारले, “हा पिप आहे? आत ये.”

मिस्टर पम्ब्लेचूकदेखील आत येत होते. पण तिने त्यांना गेटपाशीच थांबवले. “मिस हॅविशामला फक्त मुलालाच भेटायचे आहे.” ती थंडपणे बोलली. आणि त्यांच्या तोंडावर गेट लाऊन कुलुपबंद केले. मग ती म्हणाली, “मुला, घाई कर.” आम्ही पम्ब्लेचूककाकांना तोंड उघडे टाकलेल्या अवस्थेत, तसेच सोडले.

जरी ती मला मुला म्हणत असली, तरी ती माझ्याच वयाची होती. पण ती माझ्यापेक्षा खूपच मोठी दिसत होती., फार सुंदर आणि आत्मविश्वासपूर्ण दिसत होती. ती माझ्याकडे रागाने बघत होती, जसे काही ती एकवीस वर्षांची राणी होती.

आम्ही कडेच्या दाराने घरात गेलो आणि माझ्या पहिली गोष्ट अशी लक्षात आली, की सर्व पॅसेज अंधारी होते. तिने एक मेणबत्ती ठेवली होती. ती तिने हातात घेतली आणि आम्ही जिन्याने वर गेलो. आम्हाला अजून पॅसेज लागले. अजूनही सर्वत्र काळोख होता. आणि फक्त मेणबत्तीच्या प्रकाशात आम्ही चालत होतो.

शेवटी आम्ही एका खोलीच्या दाराशी आलो. ती म्हणाली, “आत जा.”

मी बोललो, “तुमच्या पाठोपाठ, मिस”

ती म्हणाली, “अरे मुला, मूर्खपणा करू नकोस. मी आत चालले नाही आहे.” आणि ती उद्धटपणे निघून गेली. कहर म्हणजे ती मेणबत्ती तिच्याबरोबर

घेऊन गेली. आणि मी तिथे अंधारात एकटा घाबरलो. तरीही मी दार वाजवले. आणि एका आवाजाने मला आत येण्यास सांगितले. म्हणून मी आत गेलो. ती खूप मोठी, मेणबत्त्या लावलेली, भरपूर उजेडाची छान खोली होती. दिवसाचा उजेड कुठूनही आत येत नव्हता. हाताच्या खुर्चीत, एका हातावर डोके टेकवून, मी पाहीलेली किंवा पुढे पहाणार असलेली, सर्वात विचित्र बाई बसली होती.

तिने सर्व पांढरे शुभ्र, महाग कपडे परिधान केले होते. तिचे बूटही पांढरे होते. तिच्या नवरीसारख्या पडदा घातलेल्या पांढऱ्या केसांमधून बुरख्यासारखे शुभ्र वस्त्र लोंबत होते. तिच्या गळ्यात व हातात हिरे चमचम करत होते व टेबलावरदेखील काही हिरे चमचमत होते. जमिनीवर सर्वत्र कपडे व प्रवासाचे पेटारे पडलेले होते.

तिथे माझ्या नजरेला सर्व काही पांढरे शुभ्रच दिसत होते. आता ते जुने होऊन, थोडे पिवळे पडल्यासारखे दिसत होते. छान कपडे केलेल्या त्या बाईच्या अंगी काही चमकधमक उरली नव्हती. पण तिचे डोळे तेजस्वी होते. मी पाहिले की ते कपडे एखाद्या तरुणीसाठी तयार केले गेले होते आणि आता ते ज्या शरीरावर घातले गेले होते ते तर फक्त हाडे व कातडी एवढेच उरले होते. ती एखाद्या सापळ्यासारखी होती. माझ्याकडे रोखून बघणाऱ्या गडद डोळ्यांची होती. मी नक्कीच मोठ्याने ओरडलो असतो. पण असे करायला मी घाबरत होतो.

तिने विचारले, “हा कोण आहे?”

मी उत्तरलो, “बाईसाहेब, मी पिप आहे. मिस्टर पम्ब्लेचूक यांनी सुचवलेला खेळायला आलेला मुलगा.”

“मला तुझ्याकडे बघू दे. जवळ ये.”

तिची नजर टाळत, मी तिच्यासमोर उभा राहीलो. नऊला वीस मिनिटे

असणारे खोलीतील एकमेव घड्याळ बंद पडले होते. आणि तिचे घड्याळ देखील तेव्हाच बंद पडले होते.

अचानक मिस हॅविशाम म्हणाली, “माझ्याकडे बघ.” आणि तिने तिचे हात डाव्या बाजूला एकमेकांवर ठेवले व विचारले, ”तुला माहिती आहे का, मी इथे कशाला स्पर्श करते?”

“हो बाईसाहेब, तुमचे हृदय.”

बढाई मारल्यासारखे विचित्र हसू हसत, ती ओरडली, “मोडलेले.” मग हास्य लोप पावले. ती जडपणे म्हणाली, “मी दमले आहे. मी खूप स्त्रिया व पुरुषांना पाहिले आहे. माझी अशी वेडी इच्छा आहे, की कुणाला तरी खेळतांना पहावे. मुला, तू खेळ. खेळ!”

मला काय करावे, ते काही सुचत नव्हते. मी उभा राहून तिच्याकडे बघत बसलो.

तिने कठोरपणे विचारले, “काय झाले?”

मी म्हणालो, “बाईसाहेब.” एक प्रकारच्या दुःखाने मी बोललो, “मला माफ करा पण मी आता खेळू शकत नाही. इथे सगळे इतके नवे आणि विचित्र आहे --- “मी मोडून पडलो आणि आम्ही एकमेकांकडे खूप वेळ बघितले. ती मवाळपणे म्हणाली, “तुला सगळे नवे आहे आणि मला सगळे जुने आहे. इस्टेलाला बोलवा. तू ते कर. दाराशी इस्टेला असेल. तिला बोलाव.”

या विचित्र घरात, त्या रागीट इस्टेलाला, अंधारात जाऊन बोलवायचे, हे खेळायची आज्ञा पाळण्याइतकेच भयंकर होते. पण शेवटी ती म्हणाली आणि ताऱ्याप्रमाणे पॅसेजमध्ये उजेड पडला व इस्टेला आली.

मिस हॅविशामने तिला जवळ बोलावले. तिने टेबलावरून हिरा उचलला आणि त्या मुलीच्या तपकिरी केसांवर, त्याचा परिणाम साधत, ती बोलली, "मला तुला या मुलाबरोबर पत्ते खेळतांना बघू दे."

इस्टेलाने नाक मुरडत विचारले, "या फडतूस मुलाबरोबर?

मला वाटते, मी मिस हॅविशामला असे म्हणतांना ऐकले, फक्त मला ते इतके खोटे वाटले, "ठीक आहे. तू त्याचे हृदय चुरडू शकतेस."

इस्टेला हसली आणि आम्ही पत्ते खेळायला बसलो.

एक डाव संपत आल्यावर, इस्टेला बोलली, "या मुलाचे हात किती खरखरीत आहेत आणि बूट किती जाड आहेत!

मला यापूर्वी माझ्या हातांची किंवा बुटांची कधीच लाज वाटली नव्हती. पण त्या क्षणापासून वाटू लागली. ती डाव जिंकली. आणि मी परत खेळू लागलो. जेव्हा मला समजले, की ती मी चुकावे, म्हणून खोटे बोलत होती, तेव्हा मी नैसर्गिकपणे चुका केल्या. ती मला मूर्ख, फडतूस म्हणाली.

आमच्याकडे बघतांना, मिस हॅविशाम म्हणाली, "तू तिच्याबद्दल काहीच बोलला नाहीस. तुला ती कशी वाटते?"

माझा चेहरा लाल होत, मी उत्तरलो, "मला ते सांगायला आवडणार नाही."

माझ्याकडे वाकत, मिस हॅविशाम म्हणाली, "माझ्या कानात सांग."

मी कुजबुजत बोललो, "मला ती फार शिष्ट वाटते."

"आणखी काही?"

"मला वाटते, ती फार सुंदर आहे."

“आणखी काही?”

“मला वाटते, ती फार अपमानकारक बोलते.”

यावर इस्टेला हसली.

“आणखी काही?”

“हो --- आता मला घरी जायला आवडेल.”

“आणि ती सुंदर असली, तरी तिला परत भेटायला तुला आवडणार नाही?”

“ते मला सांगता येणार नाही. पण आता मला घरी जायचे आहे.”

मिस हॅविशाम मला म्हणाली, “तू लवकरच जाशील. आधी खेळ संपव.”

मी खेळ संपेपर्यंत खेळलो आणि इस्टेलाने मला पुन्हा हरवले. तिने पत्ते टेबलावर भिरकावून दिले. जणू तिने माझ्यावर कुरघोडी करून, माझा द्वेष केला.

मिस हॅविशाम मला म्हणाली,”तू परत माझ्याकडे केव्हा येशील? “मला विचार करू दे. मला आठवड्यातील दिवसांबद्दल काही माहिती नाही. आता सहा दिवसांनी ये, बर का मुला.”

“हो, बाईसाहेब.”

“इस्टेला, त्याला खाली घेऊन जा. जा, पिप.” मी मेणबत्तीच्या प्रकाशात खाली गेलो. मी वरदेखील तसाच आलो होतो. एकदम दिवसाच्या प्रकाशात आल्यावर, मी गोंधळलो. मला वाटले, की मी खूप तास मेणबत्तीच्या प्रकाशाच्या विचित्र खोलीत होतो. “इस्टेलाने गेटचे कुलूप उघडले. आणि मला वाट देण्यासाठी बाजूला झाली. जणू काही माझे हात खरखरीत असल्याने व माझे बूट जाड बघता, बाहेर चाललो होतो. जेव्हा तिने तिच्या हाताने मला स्पर्श केला.

ती म्हणाली, “तू रडत का नाहीस?”

“कारण मला रडायचे नाही, म्हणून.”

ती म्हणाली, “पण तुला रडायचे आहे.” तू आता रडतो आहेस.” ते खरे होते.

ती परत ह्सली व मला बाहेर ढकलले. लाथ मारून, गेट बंद केले. मी सरळ मिस्टर पम्ब्लेचूक यांच्याकडे गेलो आणि ते घरात नसल्याचे बघून, सुटकेचा निःश्वास टाकला. मी पाहिलेल्या सर्व गोष्टींचा मनाशी विचार करत, मी चार मैल दूर असलेल्या आमच्या गावी निघालो. मी मनात खूप खंत केली, की मी असा खरखरीत हातांचा, व जाड बुटांचा, मूर्ख, सामान्य मुलगा का होतो. मी खूपच वाईट वाटेवर होतो, असे मला जाणवले!






# प्रकरण ५

# एक फटका आणि चुंबन

त्यानंतर मी नेहमी मिस हॅविशामकडे जाऊ लागलो आणि इस्टेलाने मला नेहमी मी कुत्र्यापेशा जास्त नसल्यासारखे वागवले आणि कुठल्यातरी कारणाने, मी मी तिची मर्जी मिळवण्यासाठी आसुसलेला राहिलो.

मग असा एक दिवस आला की जेव्हा ती व मी वरती गेलो आणि आम्हाला एक सभ्य गृहस्थ खाली येतांना भेटला. त्याने माझ्याकडे बघत आम्हाला थांबवून विचारले, “तुम्ही इथे का आला आहात?”

इस्टेलाने उत्तर दिले, “एक मुलगा.”

तो धिप्पाड मनुष्य असून, त्याचे डोके खूप मोठे होते. व त्याला टक्कल होते. त्याने माझी हनुवटी त्याच्या हातात घेतली. आणि मेणबत्तीच्या प्रकाशात बघण्यासाठी, माझा चेहरा वर उचलला. त्याचे डोळे त्याच्या डोक्यात खोल बसवल्यासारखे असून, तीक्ष्ण व संशयी होते. त्याच्या भुवया काळ्या असून, दाट होत्या.

त्याने विचारले, “शेजारचा मुलगा का? तू इथे कसा आलास?

मी उत्तरलो, “मिस हॅविशामने मला बोलावून घेतले.

तो म्हणाला, “छान, इथे नीट वाग. मी काय म्हणतो आहे, समजले का? नीट वाग!”

इतके बोलून, तो मनुष्य जिना उतरून गेला. तो मनुष्य तिथे काय करत होता, हे बघायला फारसा वेळच मिळाला नाही. कारण लवकरच आम्ही मिस हॅविशामच्या खोलीत होतो. तिने मला विचारले, “तू खेळण्यासाठी तयार आहेस? की तू काम करशील?” मी म्हालो, की मी काम करायला एका पायावर तयार आहे. ती एक काठी घेऊन आली व माझ्या खांद्यावर हात ठेऊन म्हणाली, “मला पलीकडील खोलीत घेऊन जा.” तिने दाखवलेल्या खोलीत मी शिरलो. खिडक्यांना विटा लावल्यामुळे आत सूर्यप्रकाश येऊ शकत नव्हता. पण तिथे जागोजागी मेणबत्त्या होत्या. त्यामुळे खोली प्रकाशित होती. ती मोठी खोली असून, मध्यभागी, त्यावर कापड टाकलेले लांब टेबल होते. तिथे जणू काही मेजवानी होती. पण घरातील सगळी घड्याळे मात्र बंद होती. टेबलावर घातलेल्या कापडाच्या मध्यभागी, एक प्रकारची वस्तू ठेवलेली होती. त्यावर इतकी कोळीष्टके लटकलेली होती, की ती काय वस्तू आहे, ते कळत नव्हते. त्यावर मला कोळी इकडून तिकडे धावतांना दिसत होते.

टेबलाकडे काठीने निर्देश करत, ती बोलली, “मी मेल्यावर, मला इथे ठेवले जाईल.” तुला त्याबद्दल काय वाटते?” ती पुन्हा काठीने निर्देश करत म्हणाली, “कोळीष्टके आहेत तिथे, तुला त्याबद्दल काय वाटते?”

मी बोललो, “बाईसाहेब, ते काय आहे, याचा मी तर्क करू शकत नाही.”

“तो मोठा केक आहे. माझा नवरीचा केक आहे. तिने खोलीभर नजर फिरवली आणि मग माझ्या खांद्यावर वाकत, बोलली, “ये, ये, ये! मला चालव, मला चालव!” यावरून मला असा बोध झाला, की माझे काम म्हणजे मिस हॅविशामला खोलीत गोल गोल फिरवणे. त्याप्रमाणे, ते मी लगेच सुरु केले. आम्ही गोल गोल फिरत, लांब गेलो. थोड्या वेळाने ती म्हणाली, “इस्टेलाला हाक मार.”

जेव्हा इस्टेला आली तेव्हा ती बोलली, “पिपला घेऊन खाली बागेत जा. त्याला काहीतरी खायला दे. आणि त्याचे त्याला हिंडू दे. खातांना त्याच्याकडे लक्ष दे. पिप, जा.”

इस्टेलाने मला खाली अंगणात नेले. मला बसवून ठेवले व ती पाव व काही मास घेऊन परतली. ते तिने माझ्याकडे न बघता मला दिले व ती निघून गेली. मी अंगणाच्या कोपऱ्याकोपऱ्यातून व दुर्लक्षित बागेतून रानटीपणे फिरलो. नंतर घर रिकामे असेल, असा संशय न घेता, एका खिडकीमधून निरखून बघू लागलो आणि मला फार आश्चर्य वाटले, की मला एक विरळ केसांचा मुलगा दिसला.

तो लगेच झटक्यात, नाहीसा झाला. आणि एका जवळील दाराने बाहेर आला.

त्याने विचारले, “तुला आत कुणी घेतले?”

“मिस इस्टेला.”

तुला इथे फिरायला मोकळे कुणी सोडले?”

“मिस इस्टेला.”

“ये आणि मारामारी कर.” तो अशक्त मुलगा बोलला. आश्चर्य म्हणजे मी

त्याच्या बरोबर बागेतील एका निवांत कोपऱ्यात गेलो. तिथे त्याने त्याचे नुसते जाकीटच काढले नाही, तर एखाद्या कसलेल्या व्यावसायिकासारखा रक्तपिपासूपणे स्वतःचा शर्टही काढला. मला तो माझ्याच वयाचा वाटला. पण तो खूपच उंच होता. जेव्हा तो हात उंच करून, नाचत, माझ्या अंगावर चालून आला, तेव्हा मी माझ्या आयुष्यात कधी नाही एवढा आश्चर्यचकित झालो. जेव्हा मी त्याला गुद्दा लगावला व पाठीवर पडलेले पाहीले, तेव्हा त्याने नाकातून रक्त येणाऱ्या अवस्थेत माझ्याकडे वर बघितले.

तो उठून उभा राहीला व परत माझ्यावर चाल करून आला आणि माझ्यासाठी अजून दुसरे आश्चर्य म्हणजे, परत तो पाठीवर पडला. तरीही तो काळा डोळा वर करून, माझ्याकडे रागाने बघत होता. तो परत माझ्यावर चालून आला. त्याच्याकडे काही शक्ती उरली आहे, असे वाटत नव्हते. आणि तो मला जोराने मारू शकला नाही. तो नेहमी माझ्याकडून मार खात होता. मी त्याला जोरजोराने मारले. तो परत आला. शेवटी खाली पडतांना, त्याचे डोके मागील बाजूने भिंतीवर आदळले. त्याचा श्वास प्रयत्नाने चालू झाल्यावर,.''तो बोलला, ''ठीक आहे. तू जिंकलास. ''मी विचारले, तू ठीक आहेस का? मी तुला काही मदत करू का?''

तो उत्तरला. ''नको, आभारी आहे.'' मी निघून जात बोललो, ''मग, शुभ दुपार.''

जेव्हा मी परत अंगणात आलो, तेव्हा मला इस्टेला किल्ल्या घेऊन थांबलेली दिसली. ती कुठल्या तरी कारणाने खुश दिसत होती. सरळ गेटकडे जाण्याऐवजी, ती मागे पॅसेजमध्ये थांबली. आणि मला तिच्यामागे ओढले. ''इकडे ये. तुला पाहिजे, तर तू माझे चुंबन घेऊ शकतोस.'' ती वळल्यावर मी तिच्या गालाचे चुंबन घेतले. मला वाटते, तिच्या गालाचे चुंबन घेऊन, मी फार मोठे

काहीतरी केले. पण मला वाटले, की चुंबन हे बिन किमतीचे काही पैसे दिल्यासारखे; मूर्ख, सर्वसाधारण मुलाला दिले जाते.

माझे मन त्या अशक्त तरूणाविषयी फार अस्वस्थ झाले. मी मारामारीचा व त्या माणसाच्या जखमी अवस्थेचा जितका विचार करू लागलो, तितके मला असे वाटू लागले, की मला स्वतःला काही शिक्षा करून घ्ययला पाहिजे. जेव्हा माझा परत मिस हॅविशामकडे जायचा दिवस उजाडला, तेव्हा माझी भीती फारच वाढली. तरीही मला मिस हॅविशामकडे जायलाच हवे, असे वाटले आणि मी गेलोही. मी मारामारीबद्दल काहीही बोललो नाही. काही झाले तरी त्याचा उल्लेख केला गेला नाही. आणि मी त्या अशक्त, तरुण माणसाला परत बघितलेही नाही. जसे आम्ही एकमेकांना अधिक परिचित झालो, तसे मिस हॅविशाम मला मी काय शिकलो आहे, व मला कोण व्हायचे आहे याबद्दल प्रश्न विचारू लागली. मी जसे सुचेल तसे म्हणालो, की मला जो चा मदतनीस व्हायचे आहे.

इस्टेला मला नेहमी आतबाहेर करून देत असे, पण मला तिने परत कधी चुंबन घ्ययला सांगितले नाही. कधीकधी ती उघडपणे सांगत असे, की तिला माझे प्रश्नदेखील आवडत नसत. मिस हॅविशाम मला नेहमी कुजबुजत विचारत असे, “पिप, ती अधिकाधिक सुंदर दिसू लागली आहे का? आणि जेव्हा मी हो म्हणे, तेव्हा तिला हावरटासारखा आनंद होई व ती मुलीच्या कानात कुजबुजे, “माझ्या प्रिय, त्यांची हृदये तोड आणि पैसे घेऊ नकोस!”

असे खूप दिवस चालू होते आणि मग एक दिवस मिस हॅविशाम म्हणाली, जसे काही तिला पहील्यांदाच त्याची कुणकुण लागली.

“पिप, तू उंच होतो आहेस!”

त्या दिवशी ती अजून काहीच बोलली नाही. पण पुढच्या वेळी मी आलो, तेव्हा मी तिला तिच्या खोलीत हातात पर्स घेऊन उभे असलेले पाहिले. ती म्हणाली, “यात पंचवीस गिनीज आहेत. पिप, तू चांगला मुलगा आहेस. इस्टेला, याला बाहेर सोडून ये.”

मी विचारले, “मिस हॅविशाम, मला परत इथे यायचे आहे का?

“नाही. एका बाईला योग्य असे शिक्षण घेण्यासाठी, इस्टेला परदेशी चालली आहे. पिप, तू तिला घालवून बसला आहेस. इस्टेला, याला बाहेर सोड.” मला नवल वाटले. काही कारणाने मला ठरवता येईना, की माझे हृदय विदीर्ण झाले आहे का. एक दोन मिनिटात, मी गेटच्या बाहेर होतो आणि माझ्यामागे ते कुलुपबंद केले गेले. इस्टेला हसत म्हणाली, “पिप, अच्छा” आणि निघून गेली.



मी सावकाश घरी जाऊ लागलो. मला कधी नाही इतके उदास व हरवल्यासारखे वाटू लागले.

# प्रकरण ६

# हिंसा



मी परत मिस हॅविशामकडे गेलो, त्याच्या खूप आधी, आणि जेव्हा गेलो, तेव्हा मला बोलावले नव्हते --- मध्यंतरीच्या काळात, मी जो बरोबर काम केले. एकदा मला असे वाटले, की मी जो चा मदतनीस होण्यापेक्षा अजून काही मोठे होण्यासंबंधी काही विचार करू शकतो.

मला काय हवे आहे, ते मला कळत नव्हते. नये. पण आता मला असे वाटू लागले मी असमाधानी आहे. आनंदी नाही. आणि अजून काही चांगले करावे, असे मला वाटते आहे. मी जी काही हिंसा किंवा छळ केला होता, ते आठवून मला आसे वाटले की मी माझे डोळे उघडून, इस्टेलाला जोच्या लोहार कारखान्याच्या एखाद्या खिडकीत पहावे. मला अशी भीती होती, की आता किंवा उशीरा ती मला हात व

तोंड काळे झालेल्या अवस्थेत शोधून काढेल. मला हसेल व माझ्यापासून दूर पळेल. मी तिच्यासंबंधी खूप विचार करायचो. काळोख झाल्यावर, मी भट्टीतील आगीच्या ज्वाळांमध्ये तिचा चेहरा व वाऱ्यावर उडणारे सुंदर केस बघायचो. मला तिचे डोळे माझा द्वेष करत आहेत, असे वाटायचे. ती मी माझ्या स्वप्नात नेहमी यायची.

शेवटी मी इस्टेलाला बघण्याच्या आशेने, मिस हॅविशामकडे जायचे ठरवले. एका रविवारी, मी जो ला विचारले, की तो मला येत्या आठवड्यात, अर्ध्या दिवसाची सुट्टी देईल का. आणि मला ती का हवी आहे, ते देखील सांगितले. त्याने फारसा विचार न करता हो म्हटले.

मिस हॅविशामकडे परत जातांना मला विचित्र वाटत होते. पण मी गेलो व गेटची घंटी वाजवली. ते उघडायला एक सुरकुतलेली छोटीशी म्हातारी बाई आली. इस्टेला नव्हे.

काही काळजी घेऊन, तिने मला आत सोडले आणि शेवटी मला आत जाण्यासंबंधी निरोप मिळाला. सगळे काही तसेच होते. मिस हॅविशाम तिच्या खोलीत एकटीच होती. ती म्हणाली, ‘काय रे? मला अशी आशा आहे की तू कसली मागणी करणार नाहीस. तुला काही मिळणार नाही.”

“नाही, तसे काही नाही. मला फक्त तुम्हाला सांगायचे होते, की मी जो च्या हाताखाली लोहारकामाचे शिक्षण घेतो आहे. माझे चांगले चालले आहे आणि मी तुमचा ऋणी आहे.” ती म्हणाली, “अस्स! मधून मधून इथे येत जा. तुझ्या वाढदिवसाला ये. आहा! तू खरे तर इस्टेलासाठी इकडे तिकडे बघतो आहेस? तू तिला गमावलेस, असे तुला वाटते आहे का?”

मी खरे तर इस्टेलासाठीच इकडे तिकडे बघत होतो. ती चांगली असेल, असे मी समजत असल्याचे, मी म्हणालो.

मिस हॅविशाम म्हणाली, की ती अजून परदेशीच आहे. त्यामुळे ती तुला भेटू शकणार नाही. ती अधिकच सुंदर दिसू लागली आहे. तिला बघणारे सगळे तिचे कौतुक करतात. तू तिला गमावलेस, असे तुला वाटते आहे का?"

मी इतका बावरून गेलो, की मला काय बोलावे, ते कळेना. तिने मला त्रासात टाकले. जेव्हा माझ्यामागे दार लागले, तेव्हा मला माझ्या घराची व्यवसायाची आणि आयुष्यातील प्रत्येक गोष्टीची लाज वाटली. मी घरी जाण्यापूर्वी थोडा वेळ इकडे तिकडे फिरत राहीलो.

ती फार अंधारी रात्र होती. मी दलदल ओलांडतांना, मला नदीच्या खालील बाजूस असलेल्या जहाज तुरुंगातून एक ओळखीच्या गुन्हेगाराच्या, मोठ्या बंदुकीचा आवाज आला. त्यावरून त्या गुन्हेगाराने स्वतःची सुटका करून घेतल्याचे कळत होते. मी गावात आलो व एका खानावळीवरून चाललो होतो, तेव्हा तिचे दार सताड उघडले गेले आणि एक मनुष्य हातात बाटली घेऊन, मोठ्या घाईने धावत बाहेर आला.

तो बोलला, "तुझ्या घराशी काही चुकीचे झाले आहे. "पिप. धाव, धाव!"

मी त्याच्याबरोबर धावत विचारले, "काय झाले आहे?"

"मला नीटसे काही समजले नाही. पण जो बाहेर असतांना, मला वाटते, गुन्हेगारांनी घर तोडलेले दिसले. मला वाटते कोणावर तरी हल्ला करून, जखमी केले गेले. त्यांनी मला ब्रँडी आणायला पाठवले.

आम्ही स्वयपाकघराशी येईपर्यंत थांबलो नाही. तिथे किंवा अंगणात सगळा गाव लोटला होता. तिथे जो होता, तो बायकांचा घोळका होता. त्या सर्व जमिनीवरील कुणातरी भोवती जमल्या होत्या. मला बघितल्यावर, त्या बाजूला झाल्या. त्यामुळे मला माझी बहीण दिसली. तिला डोक्याच्या मागील बाजूस कोणीतरी अनोळखी हाताने जोरदार गुद्दा मारल्याने, ती काही हालचाल न करता निपचित पडली होती

मारणारा कुणी अनोळखी होता. माझी बहीण त्यानंतर खूप आजारी पडली आणि मारणाऱ्याचा शोध घेण्यासाठी ती काहीही सांगू शकली नाही. तिच्या दृष्टीवर परिणाम झाला. तिची स्मृती गेली. आणि बोलायची सर्व शक्तीच गेली. जेव्हा ती जरा बरी झाली, तेव्हा तिला खाली स्वयंपाकघरात आणले पण तिथे ती एखाद्या मदतीची अपेक्षा असणाऱ्या मुलासारखी बसून राहिली. आम्हाला तिच्यासाठी एक परिचारिका शोधावी लागली. पण एक प्रसंग सोयीस्करपणे असा घडला, की आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला. मिस्टर वोपले यांची बहीण वारली. आणि तिची बिंडी नावाची मुलगी आमच्याकडे रहायला आली. बिडी माझ्याच वयाची होती. आणि मी तिला पूर्वीपासून ओळखत होतो. ती काही इस्टेलासारखी सुंदर नव्हती. पण ती सुस्वभावी व आल्हादक होती. आता माझ्या बहिणीला आम्ही कधीच एकटे ठेवत नसू. रविवारी दुपारी बिडी आणि मी जेव्हा बाहेर जात असू, तेव्हा जो तिची काळजी घेत असे. उन्हाळ्यातील एका दुपारी, जेव्हा बिडी आणि मी नदीकिनारी बसलो होतो, तेव्हा बिडीला विश्वासात घ्यायला, ही चांगली वेळ असल्याचे मला जाणवले आणि मी म्हणालो, बिडी, मला एक सभ्य गृहस्थ व्हायचे आहे. मी आहे तसा मुळीच आनंदी नाही. मला एकदा कोणीतरी सांगितले, तसे सर्वसाधारण व रासवट व्हायचे नाही.

एक नदीच्या वरील प्रवाहाकडे जाणारे जहाज बघत बिडी म्हणाली, “ते खरे नाही व नम्रतेने म्हटलेले देखील नाही. तुला असे कोण म्हणाले?”

“मिस हॅविशामकडील एक सुंदर मुलगी. मला तिच्यासाठी, सभ्य गृहस्थ व्हायचे आहे.”

“तू तिचा तिरस्कार करतोस, म्हणून तुला तसे व्हायचे आहे का?”

मी उदासीनतेने बोललो, “मला माहिती नाही.”

“कारण ते जर तिच्या तिरस्कारामुळे असेल, तर तर मला वाटते, तिच्या शब्दांकडे काही लक्ष दिले नाही, तर ते साध्य होईल. आणि जर हे तिला जिंकण्यासाठी असेल, तर मला वाटते --- पण तुला जास्त माहिती असेल --- ती जिंकण्याच्या लायकीची नसेल.”



“मी असाच विचार करत होतो. पण मला काही फरक पडत नाही. मला माहिती आहे, की मी इस्टेलावर प्रेम करतो. आणि इतर कुणावर ते करू शकत नाही. आणि एकाच प्रकारे, मी तिला जिंकू शकतो आणि ते म्हणजे सभ्य गृहस्थ होणे. पण मला काही कल्पना नाही, की मी ते कसे करू शकेन --- आणि मग अचानक नशीबाने माझा खेळ हातात घेतला.

# प्रकरण ७

# महान अपेक्षा




मी जो चा मदतनीस म्हणून काम करायला लागलो, त्याच्या चौथ्या वर्षी, एका शनीवारच्या रात्री, आम्ही स्वयंपाकघरात, शेकोटीपाशी जमलो होतो. तेव्हा रस्त्यावर उघडणाऱ्या दारावर टकटक झाली. कोण आहे, ते बघायला बिडी गेली. आणि तिच्या चेहऱ्यावरील आश्चर्यासकट परत आली. आणि म्हणाली कुणी विचित्र, सभ्य पाहुणा आला आहे व त्याला जो शी बोलायचे आहे. तिने मेणबत्तीच्या प्रकाशात त्याला जोच्या खोलीत नेले.

मी त्याला बघितल्याबरोबर ओळखले. मी बागेत, जिन्यावर, त्या अशक्त तरुण माणसाला मारामारीच्या वेळी भेटलो होतो. त्याने मला ओळखले नाही. पण मी त्याच्या मोठ्या डोक्यामुळे, खोल डोळयांमुळे व जाड, दाट भुवयांमुळे, त्याला बघितल्याबरोबर ओळखले होते. आम्ही त्याला बसायला सांगितले.

तो म्हणाला, “माझे नाव जॅगर्स आहे आणि मी लंडनमध्ये वकील आहे. आम्ही तुमच्या या मदतनीसाची, त्याच्या भल्यासाठी तुमच्यापासून सुटका करू इच्छितो. तुम्ही त्याला सोडावे, यासाठी तुम्हाला काही हवे आहे का?” जो त्याच्याकडे मोठे डोळे करून बघत राहीला.

थोडे थांबून, तो म्हणाला, “पिपला माझ्याकडून घेण्यासाठी, मला काही नको.”

मिस्टर जॅगर्सने मान हलवली. आणि माझ्याकडे लक्ष दिले. “आता मी या तरूण माणसाकडे वळतो. मला तुम्हाला सांगितले पाहीजे, की त्याच्या खूप अपेक्षा पूर्ण होणार असून, त्याचा भविष्यकाळ उज्वल आहे.”.

जो ने माझ्याकडे बघितले व मी त्याच्याकडे बघितले. आम्ही दोघेही काही बोलण्यासाठी अवाक झालो होतो.

मिस्टर जॅगर्स माझ्याकडे निर्देश करून बोलले, “मला त्याला असे सांगण्यासाठी बजावण्यात आले आहे, की त्याला चांगली इस्टेट मिळेल. तशी ती इस्टेट असलेल्या मालकाची इच्छा आहे. आणि त्याची अशी देखील इच्छा आहे, की त्याला ताबडतोब इथून हलवावे आणि एक सभ्य गृहस्थ म्हणून तयार करावे. थोडक्या शब्दात एक खूप अपेक्षा असलेला तरुण म्हणून वाढवावे.”

माझे स्वप्न खरे ठरले. मिस हॅविशाम मोठ्या प्रमाणावर, माझे भविष्य घडवणार होती. वकील पुढे म्हणाला, “मिस्टर पिप, आता तुम्हाला हे समजून घेतले पाहीजे, की हे मला माझ्या अशीलाने बजावून सांगितले आहे, की तुमचे नाव यापुढे पिपच राहील. जर तुमची काही हरकत असेल, तर आताच तसे सांगा.”

माझे हृदय जोराने धडधडत होते. आणि माझ्या कानात संगीत गुणगुणत होते. मी क्वचितच असे म्हणू शकलो असतो, की माझी काही हरकत नाही.

मी असा विचार करायला नको. आता तुम्हाला समजले असेल की ज्या माणसापासून तुमचा फायदा होणार आहे, त्याचे नाव जोपर्यंत ते उघड करायची

त्याची इच्छा नाही, तोपर्यंत गुप्त राहीले पाहीजे. जर तुम्हाला काही संशय असेल, की तो कोण आहे, तर तसे आताच सांगा.”

परत एकदा मी सांगितले, की माझी काही हरकत नाही.

मी काही विचार करायला नको. आम्ही आत फक्त काय काय व्यवस्था

असणार आहे, त्याकडे वळलो. माझ्याकडे तुझ्यासाठी रहाण्याची व्यवस्था व शिक्षणासाठी व आधारासाठी काही रक्कम आहे. तुम्ही मला कृपया तुमचा पालक समजा. असा विचार केला गेला आहे, की तुम्ही चांगले शिक्षण घ्यावे. एखाद्या चांगल्या शिक्षकाच्या हाताखाली रहायची तुमची तयारी आहे का?

मी म्हटले, मी नेहमीच यासाठी तरसलेलो होतो.

मिस्टर जॅगर म्हणाले, “मिस हॅविशामशी त्याचे लांबचे नाते आहे. “माझ्या ओळखीचा एक शिक्षक आहे, तो ठीक राहील. त्याचे नाव पॉकेट आहे --- मिस्टर मॅथ्यु पॉकेट असे आहे.”

मी म्हटले, की मी आनंदाने त्याच्याकडे शिकेन.

“छान. तू त्याच्या घरी जाऊन शिकलेले बरे. त्याची व्यवस्था तुझ्यासाठी केली जाईल. तू त्याच्या लंडनमध्ये असलेल्या त्याच्या मुलाला प्रथम भेटशील. तू लंडनला केव्हा येशील?”

मी जो कडे बघत म्हणालो, “मला वाटते, मी लगेच येऊ शकेन.”

मिस्टर जॅगर म्हणाले, “पण येण्यासाठी, तुझ्याकडे काही नवीन कपडे हवेत. या आठवड्यातील एका दिवशी लंडन जमेल. तुला काही पैसे लागतील. मी तुझ्याकडे वीस गिनीज देऊन जाऊ का?”

त्याने त्याच्या लांब पाकीटातून, पैसे काढून मोजले व मला दिले.

नंतर तो दाराकडे जाऊ लागला. नंतर तो म्हणाला, “मिस्टर पिप, जितक्या लवकर तू इथून बाहेर पडशील, तेवढे बरे. या आठवड्यात केव्हातरी हे जमव. जेव्हा तू लंडनमध्ये येशील, तेव्हा सरळ माझ्याकडे ये. तुम्हाला दोघांना शुभ रात्र.”

मी त्यांना दारापर्यंत सोडायला गेलो. आणि मग परत स्वयंपाकघरात, गेलो. माझी बहीण कोपऱ्यात बसली होती आणि जो बिडीच्या पुढे बसला होता. मी जो च्या पुढे कोपऱ्यात बहिणीसमोर बसलो. बराच वेळ मी आगीकडे बघत होतो. मला जोकडे जास्त बघायचे नव्हते. जितका जास्त वेळ शांतता पसरली, तितका मी बोलायला असमर्थ ठरलो.

शेवटी मी उठून, वर गेलो. “जो, तू बिडीला सांगितलेस का?”

“नाही, पिप.”

तो देखील आगीकडे बघत होता. जो म्हणाला, “ते सांगायचे काम मी तुझ्यावर सोडतो. पिपचे नशीब फळफळलेच म्हणायचे. आणि देव त्याला त्यात यश देवो.”

बिडी तिचे काम सोडून, माझ्याकडे बघू लागली. जो त्याचे गुडघे धरून, माझ्याकडे बघू लागला. मी त्या दोघांकडे बघू लागलो. थोड्या वेळाने त्यांनी माझे अभिनंदन केले. पण त्यात थोडी उदासी जाणवत होती.

त्यामुळे मला वाईट वाटले. कारण माझे हृदय आनंदाने उसळत होते. आणि माझे मन इस्टेलाच्या विचारांनी भरून गेले होते.

शनिवारी सकाळी मी लंडनला जाण्यासाठी निघणार होतो. शुक्रवारी दुपारी मी माझे नवीन कपडे घालून मिस हॅविशामला भेटायला गेलो. त्याच म्हाताऱ्या बाईने माझ्यासाठी गेट उघडले. मला इतके बदललेले पाहून, ती माझ्याकडे

आश्चर्यचकित होऊन, पाहू लागली. ती म्हणाली, “तू! अरे देवा, तुला काय हवे आहे?

मी कडकपणे म्हणालो, मी लंडनला चाललो आहे आणि मला मिस हॅविशामचा निरोप घ्यायचा आहे. तिने मला अंगणात सोडले व ती आत विचारायला गेली. थोड्या उशीराने, ती परतली आणि मला घेऊन, माझ्याकडे निरखून बघत, मला वर घेऊन गेली. मिस हॅविशाम लांब टेबलाच्या खोलीत, तिच्या काठीवर वाकलेली होती. ती म्हणाली, “पिप, काय कसे काय?

“मिस हॅविशाम, मी उद्या लंडनला निघालो आहे.” मी काय बोललो ते खूप काळजी घेऊन बोललो. “आणि मला वाटले मी भेटायला आलेले तुम्हाला आवडेल.”

तिची काठी माझ्याभोवती फिरवत ती बोलली, “पिप, तू छान दिसतो आहेस.”

“तुम्हाला भेटल्यापासून माझे नशीब बदलले आहे. आणि त्याबद्दल मी तुमचा ऋणी आहे, मिस हॅविशाम.”

ती म्हणाली, “हो, मी मिस्टर जॅगर्सना भेटले. मी त्याबद्दल ऐकले, पिप. मग तू उद्या चालला आहेस तर? आणि तुला एका श्रीमंत माणसाने दत्तक घेतले आहे?

“हो, मिस हॅविशाम.”

“त्याचे नाव तुला माहिती नाही का?”

“नाही, मिस हॅविशाम.”

“आणि मिस्टर जॅगर्सना तुझे पालक नेमले आहे?”

हो, मिस हॅविशाम.”

ती बोलली, “ठीक आहे. चांगला रहा आणि मिस्टर जॅगर्सचे मार्गदर्शन घे. पिप, अच्छा. मला माहिती आहे, तू नक्कीच तुझे नाव राखशील.”

“हो, मिस हॅविशाम.”

पिप, अच्छा.” तिने तिचा हात पुढे केला. मी गुडघ्यात वाकून, तो माझ्या ओठांना लावला. तिने तिच्या डोळयात विचित्र भाव घेऊन माझ्याकडे पाहीले. मंद प्रकाश असलेल्या खोलीत मी तिला काठीवर दोन्ही हात ठेऊन उभे असलेले पाहीले.

आणि या वेळेस जेव्हा मी घर सोडले आणि रस्त्यावरून माझ्या नवीन कपड्यात रुबाबात चालू लागलो, तेव्हा मला सर्व जग माझ्या पायाशी लोळण घेत असल्यासारखे वाटले.



# प्रकरण ८

# मिस हॅविशामची गोष्ट




मिस्टर जॅगर्सनी त्यांचा पत्ता पाठवला. आणि जेव्हा मी लंडनमध्ये पोचलो, तेव्हा टांगा करून मला तिथे जायला काहीच त्रास झाला नाही. मी माझी लहानशी बॅग घेऊन, पुढील कार्यालयात गेलो. आणि मिस्टर जॅगर्स तिथे आहेत का, विचारले.

कारकुनाने विचारले, तुम्हीं मिस्टर पिप आहात का? मिस्टर जॅगर्स तुमची वाट बघत आहेत."

माझ्या पालकाने माझे अभिनंदन केले व मला सांगितले, की माझ्यासाठी त्यांनी काय ठरवले आहे. मला टेंपल [लंडनचा एक भाग] मध्ये जायचे होते. तिथे मला तरुण मिस्टर पॅकेट बरोबर एका खोलीत रहायचे होते. सोमवारी ते मला त्यांच्या वडीलांकडे भेटायला घेऊन जाणार होते. हे सर्व मला कसे वाटते आहे, याची ती चाचपणी होती. मला महीन्याला किती पैसे खर्च करता येणार आहेत, हे देखील मला सांगण्यात आले. ते बरेच होते. आणि कुठल्या दुकानातून मी काय घ्यावे याबाबत मार्गदर्शन मिळाले,

मिस्टर जॅगर्स म्हणाले, “अर्थात, तू काही वेळेला चुकीचे काही करशील पण तो माझा दोष नसेल. मी त्या शेऱ्यावर विचार केला आणि विचारले, “मी बग्गी बोलावू शकतो का. तेव्हा मिस्टर जॅगर्स म्हणाले, “ते फारसे लांब नसल्याने बग्गी बोलवायला नको. मला चालणार असेल, तर वेमिक माझ्याबरोबर चक्कर मारू शकतो.

मला असा शोध लागला, की वेमिक हा पुढील खोलीत कारकून होता. तो एक बुटका मनुष्य असून, त्याचा चेहरा चौकोनी व लाकडी होता आणि त्याचे डोळे काळे व तेजस्वी होते. आम्ही चालतांना तो आल्हादकपणे इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत होता. मला असे आढळले, की आमच्या खोल्या गार्डन कोर्टमध्ये होत्या. तो नदीच्या खालच्या बाजूला टेम्पलचा भाग होता. वेमिकने मला वर काही खोल्या असलेल्या एका अरुंद जिन्याकडे नेले. मिस्टर पॉकेट, जून असे दारावर रंगवलेले होते. पत्रपेटीवर असे चिकटवलेले होते, की ‘लवकरच परतत आहोत.’ मिस्टर वेमिकने स्पष्टीकरण दिले, “त्याला तू इतक्या लवकर येशील, अशी कल्पना नसेल. “आता तुला मी तुझ्याबरोबर नसलो, तरी चालेल ना?”

मी म्हणालो, “नको, आभारी आहे.”

वेमिकने निरीक्षण केले, “मी सुटे पैसे देणारा असल्याने, आपण आता वारंवार भेटूच. शुभ दिवस.”

तो गेल्यावर मी जिन्यातील खिडकी उघडली आणि जिन्यावर कुणाची तरी पाऊले वाजेपर्यंत, तिथून बाहेर बघत अर्धा तास उभा राहीलो. मला जिन्यावर पाऊले वाजल्याचा आवाज आला. हळूहळू, माझ्यासमोर टोपी, डोके, कोट, पँट, बूट उमटत गेले आणि माझ्याच वयाचा एक तरुण अवतीर्ण झाला. त्याच्या दोन्ही

काखांमध्ये कागदी पिशव्या होत्या व हातात फळांची टोपली असून, तो धापा टाकत होता.

तो म्हणाला, ‘मिस्टर पिप?”

मी म्हणालो, “मिस्टर पॉकेट?”

ते म्हणाले, ‘मला माफ करा. पण दुपारच्या वेळी तुम्ही तुमच्या जागेपासून टांग्याने आला असाल, असे मला वाटले. तसेच मला असेही वाटले की रात्रीच्या जेवणानंतर, तुम्हाला फळे खायला आवडतील, म्हणून मी ती आणायला गेलो होतो. माझे डोळे डोक्यातून बाहेर पडत आहेत की काय अशा त्ऱ्हेने, मी त्याच्याकडे रोखून बघत होतो. मला असे वाटायला लागले होते, की हे सर्व स्वप्न आहे.

तरुण मिस्टर पॉकेट म्हणाले, “हे दार खूप घट्ट चिकटते. कृपया आत या. ते दाराशी झगडत असतांना,मी त्याना विनंती केली, की त्यांनी त्यांच्या कागदपत्रांची बॅग मला धरायला द्यावी. मग ते दार इतके अचानक उघडले, की ते जवळजवळ पडले आणि आम्ही दोघे हसलो.

तरुण मिस्टर पॉकेट म्हणाले, “कृपया आत या आणि मला तुमच्या
बॅगा घेऊ द्या.”

मी बॅगा दिल्या आणि त्यांनी माझ्याकडे खालपासून वरपर्यंत पाहीले. त्यांच्या डोळ्यात आश्चर्य उमटलेले दिसले. ते माझ्याही डोळ्यात उमटले असणार, हे मला माहिती होते. आणि ते मागील आठवण काढून बोलले, “अरे देवा, बागेत मी ज्याच्याशी मारामारी केली, तो मुलगा तू आहेस!”

मी म्हणालो, “आणि तुम्ही ते अशक्त, तरुण सभ्य गृहस्थ आहात!” आम्ही दोघे एकमेकांकडे खूप वेळ बघत राहीलो आणि शेवटी हास्यात बुडून गेलो.

त्याचे हात एकमेकात गुंफत तो म्हणाला, “तू तो मुलगा आहेस, ही कल्पना ---पण जाऊ दे. आता ते सर्व संपले आहे. आणि मी अशी आशा करतो, की आपण चांगले मित्र होऊ. माझे नाव हर्बार्ट आहे.”

त्याच्याबरोबर हस्तांदोलन करत मी म्हणालो, “माझे नाव पिप आहे.”

त्याने विचारले, “त्या वेळी तुझे नशीब फळफळले नव्हते का?”

“नाही.”

मी त्याची वाट बघत होतो. मिस हॅविशामने मला इथे पाठवले आहे ---

मी तिच्या नात्यातील आहे. मी तिला आवडतो का, हे पाहीले गेले. पण तसे झाले नाही.”

मी नम्रपणे विचार केला, की मला हे ऐकून नवल वाटले.

हर्बार्ट हसत, म्हणाला, हो, तिची निवड चुकली. जर तिला मी आवडलो असतो, तर मलाही संधी मिळाली असती. माझे इस्टेलाशी लग्न देखील ठरले असते.”

मी विचारले, “मग तुझा मनोभंग तू कसा सहन केलास?”

“ओहो, मला काही दुःख झाले नाही. ती मुलगी कठीण आहे. मिस हॅविशामने तिला पुरुषांवर तिचा सूड घेण्यासाठी वाढवले आहे.”

“तिचे मिस हॅविशामशी काय नाते आहे?”

“काही नाही. तिला मिस हॅविशामने दत्तक घेतले आहे.”

आणि ती पुरुषांवर सूड का व कशा प्रकारे घेते?”

“अरे प्रिय माणसा, तुला माहिती नाही?”

मी उत्तरलो, “नाही.”

“मी सांगतो.”

मी ती ऐकण्यासाठी अधीर झालो होतो. पण मी थांबलो आणि आम्ही उत्कृष्ट जेवण घेतले. मग मी त्याला मिस हॅविशामची गोष्ट सांगायची आठवण केली.

त्याने सुरु केले. तिचे वडील खूप श्रीमंत मनुष्य होते --- ती अगदी लहान असतानाच तिची आई वारली. आणि ती एक बिघडलेली मुलगी होती. तिचे वडिल तिला कशालाही नाही म्हणत नसत.

मी विचारले, "ती एकुलती एक मुलगी होती का?"

"नाही. तिच्या वडीलांनी परत लग्न केले आणि तिला सावत्र भाऊ झाला. जेव्हा तो मुलगा मोठा झाला, तेव्हा तो पूर्णपणे तेव्हा वाईट सवयीचा निघाला. जेव्हा वडिल वारले, तेव्हा त्या मुलाला बरेच पैसे मिळाले, पण मिस हॅविशामइतके नाही. त्या मुलाने त्याचे सगळे पैसे उडवून टाकले. आणि तो बहिणीच्या विरुद्ध गेला, तेव्हा ती काही त्याला पैसे देईना.

आता मी गोष्टीच्या दुष्ट भागाकडे येतो. गोष्टीत मिस हॅविशामवर प्रेम करणारा एक प्रेमिक आला. ती पण त्याच्यावर प्रेम करू लागली. त्यांचे लग्न ठरले आणि त्याने तिला असे सांगून तिच्याकडून अतोनात पैसे मिळवले, की लग्नानंतर तो सगळे पैसे व्यवस्थित सांभाळेन. लग्नाची तारीख ठरली. कपडे खरेदी झाली. पाहुण्यांना आमंत्रणे गेली. लग्नाचा दिवस उजाडला. पण नवरा मुलगा आलाच नाही. त्याने एक पत्र लिहिले,

मी म्हणालो, "आणि ते तिला, ती लग्नासाठी तयार होत असतांना, नऊला वीस मिनिटे असतांना मिळाले?"

हर्बार्ट मान हलवत बोलला, "अगदी बरोबर त्याच वेळी आणि त्या वेळे नंतर तिने घरातील सगळी घड्याळे बंद केली. नंतर जेव्हा ती भयंकर आजारातून

उठली, तेव्हा तिने सगळी नासधूस केली आणि तेव्हापासून तिने कधीही सूर्यप्रकाश बघितला नाही.

मी विचारले, “एवढीच गोष्ट आहे का?”

“नाही, मी एक गोष्ट विसरलो. असे ऐकले गेले की त्या माणसाने तिच्या भावाला विश्वासात घेतले. त्यांनी नवीन प्रकारे पहीलाच व्यवसाय सुरु केला आणि ते खूप नफा मिळवू लागले.

मी विचारले, “त्या दोन माणसांचे नंतर काय झाले?”

“त्यांची स्थिती लाजलावणी झाली. ते गाळात गेले.”

“ते अजून जिवंत आहेत का?”

“मला माहिती नाही.”

“मिस हॅविशामने इस्टेलाला कधी दत्तक घेतले?”

हर्बार्ट उत्तरला, “मी जेव्हापासून मिस हॅविशामला ओळखतो, तेव्हापासून इस्टेला तिथे आहेच. याबद्दल मला अधिक काही माहिती नाही.”

तर अशा तऱ्हेने पहील्यांदाच इतक्या लांब लंडनमध्ये, मी मिस हॅविशामची विचित्र गोष्ट ऐकली. तिने माझ्या आयुष्यात महत्वाची भूमिका बजावली, मला इस्टेला दाखवली. आणि आता माझी खात्री पटली आहे, की तिनेच माझ्या स्वतःसाठी इस्टेलाला जिंकण्याची संधी मिळवून दिली.



# प्रकरण ९

# एका जंगली पशुला माणसाळवले



एखाद्या सभ्य माणसासारखे साधे, आनंददायी जीवन व्यतीत करणे, मला कठीण गेले नाही. माझ्याकडे खर्च करायला पैसे होते. घालायला चांगले कपडे होते.  करमणुकीची खूप साधने होती आणि हर्बार्ट व त्याच्या ओळखीचा कंपू माझ्या सोबतीला होता.

त्याने माझी भेट त्याच्या वडिलांशी घालून दिली --- तो करड्या केसांचा, नैसर्गिक गोडवा असलेला सभ्य माणूस होता. आणि असे योजले गेले होते, की मी रोज त्यांच्या घरी जाऊन, त्यांच्या हाताखाली शिकावे. मला त्या घरात एक आल्हादक खोली देण्यात आली. माझ्यासारख्याच अजून दोन खोल्यात रहाणाऱ्या ड्रुमल आणि स्टारटॉप नावाच्या मुलांशी माझी ओळख करून देण्यात आली.

बेन्टले ड्रुमल एका श्रीमंत घरातून आला होता आणि धिप्पाड व समजूतदार होता. तो आळशी व गर्विष्ठ देखील होता. स्टारटॉप साधा मुलगा होता. तो चेहऱ्याने व चणीने एखाद्या बाईसारखा नाजूक होता..

हर्बार्ट माझा जवळचा मित्र होता. संध्याकाळी आम्ही चौघे तरुण लोक नेहमी बोट वल्हवायला जात असू. मी व्यायामात माहीर होतो. ड्रुमल आणि स्टारटॉप या दोघांकडेही एकेक बोट होती. मी देखील हर्बार्ट बरोबर एक बोट विकत घेतली आणि शिक्षणाबरोबर परिसरातील बोट वल्हवण्यासारख्या काही गोष्टी करत, मी स्थिरस्थावर झालो. लवकरच मला महागड्या सवयी लागल्या. एक दोन महिन्यांपूर्वी मला जे करायला अवघड गेले असते, ते खर्च मी सहज करू लागलो.

मिस्टर वेमिकने, आम्हाला पैसे देणाऱ्याने, मला माझ्या स्थानिक पालका बद्दलच्या काही गोष्टी मला सांगितल्या. मी त्याच्या सहवासात बराच काळ राहीलो आणि मला तो आवडू लागला.

माझ्या गुन्हेगारी स्वरूपाची कामे करणाऱ्या वकीलाबद्दल म्हणजेच माझ्या स्थानिक पालकांबद्दल त्याला नितांत आदर होता. गावातील कोर्टात त्या वकीलाला महत्वाचे स्थान होते. मी त्याच्याकडे पैसे घ्यायला गेलेलो असतांना, वेमिकने काही गूढ असे शेरे झाडले व त्यामुळे, मी मिस्टर जॅगर्सबद्दल अधिक जाणून घ्यायला उत्सुक बनलो.

त्याने विचारले, “तू अजून कधी मिस्टर जॅगर्सबरोबर जेवला आहेस का?”

“नाही.”

वेमिक म्हणाला, “तर जेव्हा तू जेवशील, तेव्हा त्याच्या घरच्या नोकराणीकडे नीट लक्ष दे. ”त्यांच्या बाबतीत काही वेगळे आहे का?” वेमिक उत्तरला, “हो. तू जंगली पशु माणसाळलेला पाहशील. मला वाटते तो तुला उद्या बोलावेल. कारण, त्याने असे मला दुपारी सांगितले.” तो तुझ्या मित्रांना पण बोलावणार आहे. तुम्ही तिघे आहात ना?”

जरी ड्रुमलला मी माझा जवळचा मित्र समजत नसलो, तरी मी हो म्हणालो.

“तर तू त्याच्या नोकराणीकडे नीट लक्ष दे. मी तुला मिस्टर जॅगर्सच्या अधिकारांबद्दल काही कल्पना देतो.

तो म्हणाला, तसेच झाले. मला माझ्या तीन मित्रांसकट व स्थानिक पालकांसकट सोहोमधील त्याच्या घरी जेवायला बोलावण्यात आले.

फर्निचरने सजवलेल्या खोलीत जेवण मांडण्यात आले. माझे स्थानिक पालक आश्चर्यकारक रीत्या ड्रुमलमध्ये रुची घेत होते. आम्ही टेबलाशी बसताच त्यांनी ड्रुमलशी बोलायला सुरवात केली. मी त्या दोघांकडे बघत असतांना आमच्यामध्ये वाढायचा पहीला पदार्थ घेऊन, नोकराणी आली. मला वाटते, ती थोडी उंच, डौलदार बांध्याची व हालचालीची, मोठ्या डोळयांची, खूप अशक्त व काळ्याभोर केसांची. साधारण चाळीशीची बाई होती. मी जेवणभर तिचे निरीक्षण करत होतो. मी नवल करत होतो, की असेच कुणाचे माझ्या ओळखीच्या व्यक्तीचे डोळे व केस मी पाहिलेले आहेत. पण ती कोण व्यक्ती, ते मला आठवत नव्हते.

एखाद्या कुत्र्याने मालकाच्या आज्ञेची वाट पहावी, तसे ती खोलीत असेपर्यंत, सर्व वेळ माझ्या पालकांवर नजर ठेऊन होती.

जेवण आनंदात पार पडले. मग संभाषण वल्हवण्यावर घसरले आणि ड्रमलने त्याच्या हातांच्या व मनगटांच्या शक्तीविषयी बढाया मारायला सुरवात केली. नोकराणी टेबल साफ करत होती, तेव्हा मिस्टर जॅगर्सने त्यांचा चपटा हात त्या बाईवर उगारून, पकडला तो टेबलाच्या कडेने ओढत आणला.

तिने हात मागे घ्यायचा प्रयत्न केला.

तिने विनवणी केली, "कृपया, नको."

मिस्टर जॅगर्स जरबेच्या सुरात म्हणाले, "मॉली, "त्यांना तुझी दोन्ही मनगटे बघू दे. ये. त्यांना दाखव."

त्यांनी तिचे मनगट धरून, टेबलावर उंच केले. तिने तिचा दुसराही हात ओढून पुढे आणला आणि दोन्ही मनगटे शेजारी शेजारी ठेवली. त्यापैकी एक खोल ओरखडा उठलेले व बरेच वेडेवाकडे होते.

मिस्टर जॅगर्स म्हणाले, "यात शक्ती आहे. मी याहून ताकदवान मनगटे आजपर्यंत पाहिलेली नाहीत." मॉलीने तिचे दोन्ही हात पुढे केले.

"मॉली, ठीक आहे. तुझी स्तुती केली जाते आहे आणि आता तू जाऊ शकतेस"

त्याने शांतपणे पुढे म्हटले, "मुली, बास झाले. तुझे कौतुक झाले आहे. तू जाऊ शकतेस"

त्या रात्री आम्ही तिथून जाण्यापूर्वी. माझ्या पालकाने मला एकट्याला गाठून सल्ला दिला, "पिप, त्या ड्रमलच्या जास्त नादी लागू नकोस."

मी नवल करत म्हणालो, "मला वाटले, तुम्हाला तो आवडला."

ते उत्तरले, मला त्याच्यात रुची वाटली. पण मला वाटते, मी भविष्य जाणत असेन, तर तू त्याच्यापासून सावध रहा."

ते थांबून हसले.

ते पुढे म्हणाले, "पण मी काही भविष्यवेत्ता नाही. तुला माहिती आहे, मी कोण आहे ते, नाही का? पिप, शुभ रात्र."

"सर, शुभ रात्र."

त्यानंतर सुमारे महिन्याभराने, ड्रमलचा चांगल्या प्रकारे, मिस्टर पॉकेटशी संबंध संपला आणि तो त्याच्या कुटुंबाकडे, घरी गेला. मला वाटते, मी त्याला शेवटचे पाहीले, पण पुढे मी बेन्टले ड्रमल, या नावाचाही तिरस्कार करू लागलो.



# प्रकरण १०

# स्वागताचा निरोप




दोन दिवसांनी वेमिकने माझ्या हृदयाची धडधड वाढवणारा निरोप पाठवला, की मिस्टर जॅगर्सना मिस हॅविशामकडून असे पत्र आले आहे, की इस्टेला घरी आली असून, ती तुला भेटू इच्छिते.

हे उघड होते की मला उद्या माझ्या गावी जावे लागेल व जो कडे रहावे लागेल. पण जेव्हा मी जाण्याचे आरक्षण केले, तेव्हा मी जो कडे न जाण्यासाठी कारणे व सबबी शोधू लागलो. जो कडे रहाणे सोयीस्कर नव्हते. त्यापेक्षा शहरातील प्रसिद्ध ब्लू बोअर हॉटेलमध्ये रहावे, असे मी ठरवले. माझे अचानक ठरल्याने जो कडे माझी झोपायची व्यवस्था नीट होणार नाही, आणि ते मिस हॅविशामच्या घरापासून लांब पडेल, असे मला वाटले. म्हणून मग मी ब्लू बोअर हॉटेलमध्ये रहायला गेलो. त्याच मिस हॅविशामच्या म्हाताऱ्या नोकराणीने माझ्यासाठी गेट उघडले. आत जाऊन, मी मिस हॅविशामच्या खोलीच्या दारावर टकटक केले. आतून आवाज आला, “पिपची टकटक.”

लगेच मला तिचा आवाज आला, “पिप, आत ये.” ती तिच्या खुर्चीत बसली होती. तिच्या हातात काठी होती आणि डोळे शेकोटीकडे लागलेले होते. ती खोलीकडे पाठ करून बसली होती. अशी रुबाबदार बाई मी यापूर्वी पाहीली नव्हती.

मिस हॅविशाम म्हणाली, “पिप, कसे काय? काय रे, मी राणी असल्यासारखे माझ्या हाताचे तू चुंबन घेतो आहेस?

मी म्हणालो, “तुम्ही मला भेटायला बोलावून, मोठा दयाळूपणा दाखवलात.”

खिडकीतील बाईने तिचा चेहरा वळवून माझ्याकडे बघितले. ती इस्टेला होती. पण ती खूप बदलली होती व इतकी सुंदर दिसत होती, की मला मी परत खरखरीत त्वचेचा सर्वसाधारण मुलगा दिसू लागलो.

अधाशीपणे बघत, मिस हॅविशामने विचारले, “पिप, ती बदलली आहे का? ती उद्धट, अपमान करणारी मुलगी असल्याचे, तू म्हणाल्याचे आठवते आहे का? आणि तुला तिच्यापासून दूर जायचे होते!”

मी गोंधळून बोललो, की त्याला खूप वर्षे झाली. आणि तेव्हापासून मला तिच्याबद्दल काही माहिती नाही. इस्टेला हसली. मला असे समजले, की ती आताच फ्रान्सहून आली आहे व इंग्लंडला चालली आहे. आम्ही बसून बोलू लागलो. मी उरलेला सगळा दिवस तिथे घालवायचा, असे ठरलेले मला समजले. रात्री मी हॉटेलवर परतणार होतो आणि सकाळी लंडनला परत जाणार होतो.

थोडा वेळ आम्ही बोलल्यावर, मिस हॅविशामने आम्हाला बागेत फिरायला पाठवले. जिथे हर्बार्टने व मी मारामारी केली, त्या कोपऱ्याशी आम्ही आलो. इस्टेला थांबून बोलली, “मी त्या दिवशी लपून, तुमची मारामारी पाहील्याने, तू मला नक्कीच विचित्र म्हणशील. पण मी ते केले. आणि तुला माहिती आहे का, की मला खूप मजा आली.”

“तू मला एक प्रकारे बक्षिसच दिलेस.”

ती म्हणाली, “खरे का?”

“मला वाटते, मी हर्बार्टचा फारसा विचार केला नाही. आता तो व मी चांगले मित्र झालो आहोत. तू मला कसे रडायला लावलेस, ते तुला आठवते का?”

“हो आणि त्याचे कारण मला हृदय नव्हते. पण आता मी दुष्टपणा करणार नाही. मला तुझा हात दे. आपण एकमेकांना दयाळूपणा दाखवू.”

आम्ही उजाड बागेत चकरा मारल्या. आणि माझ्या बरोबरच्या मुलीमुळे, माझ्या डोळ्यात ती जागा एकदम सुंदर ठरली. त्या क्षणी माझी खात्री पटली, की मिस हॅविशामने आम्हाला एकमेकांसाठी निवडले आहे. आणि माझा आनंद गगनात मावेना. जेव्हा आम्ही परत घरात गेलो, मी नवल वाटून ऐकले, की माझा पालक, काही कामानिमित्त, मिस हॅविशामला भेटायला आला होता आणि जेवायला परत येणार होता. वेळ इतका भरभर गेला, की जेवायची वेळ येऊन ठेपली. माझा पालक आला आणि इस्टेला तिचे कपडे बदलायला गेली. मिस्टर जॅगर्स व मी मिस हॅविशामला तिच्या खोलीत ठेऊन, अंधारी जिन्याने खाली गेलो. त्यांनी मला विचारले, “तू किती वेळा मिस हॅविशामला खातापितांना पाहीले आहेस?

मी म्हणालो, “कधीच नाही.”

ते म्हणाले, “आणि कधी बघणारही नाहीस, पिप. ती तिचे विचित्र आयुष्य जगतांना, तिला खातापितांना कुणाला बघून देत नाही. ती रात्री फिरते आणि मग तिला हवे ते खाते.

आम्ही जेवायच्या टेबलाशी आलो. इस्टेलाही तिथे आली. मिस हॅविशामने तिचा फार सुंदर हिऱ्याचा दागिना इस्टेलाच्या केसात घातला. माझा पालकदेखील

त्याच्या दाट भुवयांखालून, इस्टेलाकडे बघत होता आणि मधून मधून त्याच्या भुवया उंचावत होता. जेवणानंतर, आम्ही मिस हॅविशामच्या खोलीत जाऊन, तिथे पत्ते खेळलो. नऊ वाजता मी जेव्हा तिथून निघालो, तेव्हा असे ठरले, की इस्टेला जेव्हा लंडनला येईल, तेव्हा मी तिला बग्गीमध्ये भेटावे. मी सगळ्यांना शुभ रात्र म्ह्टले आणि निघालो. मग मी तिच्या हाताला स्पर्श करून, तिचा निरोप घेतला.

रात्री खूप वेळ मी जागा होतो व उशीत तोंड घालून बोलत होतो, “मी तिच्यावर प्रेम करतो. मी तिच्यावर प्रेम करतो. मी तिच्यावर प्रेम करतो.” परत परत तेच तेच बोलत होतो. त्या क्षणी माझी खात्री झाली की मिस हॅविशामने आम्हाला एकमेकांसाठी निवडले आहे. मग माझ्यावरील उपकाराने, मी दबून गेलो. मला असे वाटले, की ती एके काळच्या माझ्यासारख्या लोहाराच्या मदतनीसासाठीच ती आहे.

मी लंडनला परतेपर्यंत मला आठवले नाही, की मी जो ला व माझ्या बहिणीला फोन करायला विसरलो. पण त्यांच्यापासून दूर रहाण्यात, असे काही नव्हते, की मी त्यांना कमी दर्जाचे समजत होतो. पण इस्टेला मात्र तसे समजत असावी. पण माझ्या अपेक्षेपेक्षा लवकर मला जो ला भेट द्यायची वेळ आली. मी परतल्यावर लंडनमध्ये फक्त पाच दिवस होतो. तेव्हा एके दिवशी संध्याकाळी माझ्या नावाने काळी चौकट असलेले एक पाकीट बिडीकडून आले. तिने खेदपूर्वक लिहिले होते, की माझी बहीण मागील सोमवारी, सहा वाजून वीस मिनीटांनी हे जग सोडून गेली आणि पुढील सोमवारी दुपारी तीन वाजता, दफनविधी होईल. माझ्या आयुष्यात स्मशान पहिल्यांदाच शिरत होते. होता. माझ्या बहिणीचा कोवळेपणा मला फारसा आठवत नव्हता. पण फारशा प्रेमाशिवाय देखील खंत असण्याचा धक्का बसू शकतो, हे मी समजलो.

जेव्हा मी घरी गेलो, तेव्हा मला वाटले होते, त्यापेक्षा जास्त तिची उणीव मला भासली. आणि मला सारखे असे वाटत राहिले, की ती स्वयंपाकघरात चालत येईल आणि माझा कान पकडेल. मी मुलगा असतांना तिने हे खूप वेळा केले होते. मी कधीच न पाहिलेल्या माझ्या आईवडिलांच्या दफनभूमी शेजारी चर्चच्या अंगणात तिचे दफन होतांना मी पाहीले. मग जो आणि बिडीबरोबर एक शांत संध्याकाळ घालवली. मी विचार करत होतो, की अलीकडे मी त्यांना किती कमी भेटलो. मी हे जास्त वेळा केले पाहिजे. असे स्वतःशी घोकत राहीलो.. सकाळी लवकर मला निघायचे होते. तसा मी निघालो. घराच्या एका खिडकीतून, कुणालाही न दिसता मी बघत राहीलो. तिथे काही मिनिटे जो ला काम करतांना बघत उभा राहीलो.

त्याच्या चेहऱ्यावर स्वास्थ्याचे व शक्तीचे तेज होते. “प्रिय जो, अच्छा मी आता जातो. परत नेहमीच येईन.”

जो बोलला, “पिप, पण इतक्यात नाही. आणि सारखासारखा तर अजिबात नाही.”

मग मी गावाकडे पाठ फिरवली आणि एक सभ्य माणूस म्हणून मनात खूप अपेक्षा ठेऊन, परत लंडनला गेलो.



# प्रकरण ११

# जिन्यातील अपरिचित




एके दिवशी मी अभ्यासात व्यग्र असताना माझ्यासाठी पोस्टाने पत्र आले. मी थरथरत्या हाताने व धडधडत्या हृदयाने हातात धरून वाचले. ते असे होतेः 'मी दुपारच्या बग्गीने परवा लंडनला येते आहे. मला वाटते, तू मला भेटावेस. मिस हॅविशामने तुझी चौकशी केली आहे --- तुझी इस्टेला'

एवढेच पत्र होते. पण यामुळे माझे रक्त किती तापले असेल, याची तुम्ही कल्पना करू शकता. पण अजून वेळ होता. मी या प्रसंगासाठी अनेक सुटांची मागणी नोंदवली. माझी भूक एकदम गेली. आणि तो दिवस उजाडेपर्यंत मी अस्वस्थ राहिलो. आणि तरीही जेव्हा मी इस्टेलाला बग्गी च्या खिडकीत पाहिले, तेव्हा मला अचानक असे वाटले, की आमच्यावरती सावलीसारखे काही तरंगते आहे. आणि मग मला ती लंडनला आल्याचे काही चांगले व आनंदी वाटेना.

फरच्या प्रवासी कपड्यात, अजूनपर्यंत ती मला दिसली होती, त्यापेक्षा अधिक सुंदर दिसली. तिचे डोळे तर अधिकच सुंदर वाटले. तिची माझ्याशी

वागण्याची पद्धत पूर्वीपेक्षा जास्त मला जिंकणारी वाटली. तिच्यात झालेल्या या बदलामागे मिस हॅविशामचा काही परिणाम असावा, असे मला वाटले.

ती मला म्हणाली, “मी चालले आहे. ते अंतर दहा मैल आहे. मला बग्गी करायची आहे व तू मला तिथे सोडणार आहेस. ही माझी पर्स आहे व त्यातील पैशांमधून तू तो खर्च करणार आहेस. ओहो, तू पर्स घेतलीच पाहिजेस. त्यात काही तडजोड नाही. मिस हॅविशामने सांगितले आहे, तसेच ते केले पाहिजे. तू आणि मी, आपल्याला जे वाटते, ते करायला मोकळे नाही.

माझ्या हातात पर्स देतांना, तिच्या डोळ्यात काही वेगळेच भाव होते.

मला अशी आशा होती की ती बोलली, त्यात काही छुपा अर्थ दडलेला होता.

मी विचारले, “रीचमंडला तू कुठे जाणार आहेस?”

“मी तेथील एका बाईबरोबर रहायला चालले आहे. ती मला मी इच्छुक असलेला लोकांकडे नेऊन, माझी त्यांच्याशी ओळख करून देणार आहे.

मी म्हणालो, “मिस हॅविशाम तुला इतक्या लवकर सोडायला कशी काय तयार झाली?”

मिस इस्टेला बोलली, “हा सगळा मिस हॅविशामचा माझ्या बाबतीत असलेला बेत आहे. मला तिला सतत लिहायचे आहे. माझे कसे चालले आहे, याचा अहवाल तिला द्यायचा आहे. मी हिरे घेऊन जाते आहे. आता ते सर्व जवळजवळ माझे आहेत.

लवकरच आम्ही रीचमंडला आलो. दारातून तिचे सामान खाली उतरवले गेले. तिने माझा हात हातात घेऊन हसत, माझा निरोप घेतला व नाहीशी झाली.

आणि मी अजून त्या घराकडे बघत असा विचार करत राहिलो, की मी तिच्याबरोबर या घरात रहात असतो तर किती आनंदी झालो असतो. आणि मला माहिती होते, की मी तिच्याबरोबर आनंदी नव्हे, तर नेहमी अवघडलेला असतो.

रीचमंडमधील ते घर, मी मेल्यावर माझ्या भुताने झपाटलेले असेल. माझे मृत शरीर कुठेही असले, तरी माझा आत्मा नेहमी त्या घराभोवती, घराभोवती, घराभोवती फिरत असेल.

मी इस्टेलाला नेहमी त्या रीचमंडमधील घरात पाहीले. मी तिच्याबद्दल तिथेच ऐकले. मी तिला नेहमी बाहेर नदीवर घेऊन जात असे. सगळ्या प्रसंगांमधून व सुखांमधून, मी तिचा मागोवा घेत राहिलो --- आणि त्या सर्व माझ्या दुःखद आठवणी होत्या.

तिचे अगणित चाहते होते. तिच्याजवळ जाणाऱ्या व तिची स्तुती करणाऱ्या प्रत्येकाचा मी द्वेष करू लागलो. पण मी द्वेष न करत असलेले ही तिचे काही चाहते होते. मग बेन्टले ड्रुमल लंडनला आला आणि जिथे तिथे तो दृषायमान होऊ लागला. काही काळात तो व मी जवळजवळ रोज भेटू लागलो.

बेन्टले ड्रुमल इस्टेलाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे मला माहिती होते आणि ती देखील त्याला तसे करून देत होती. तिला त्याच्याकडे बघून हसतांना पाहून, त्याचे श्रीमंत व इभ्रतदार कुटुंब लक्षात घेऊन, मी खजील होत होतो. एक प्रकारे, ती माझ्याकडे बघून कधीच हसत नव्हती ---

अशा चमत्कारिक दुःखाच्या काळात असा एक प्रसंग घडला की त्यामुळे माझ्या जीवनाची पद्धतच बदलून गेली. एका क्षणार्धात मला जोरदार धक्का बसला

आणि माझ्या अपेक्षांचा महाल माझ्यावर कोसळून पडला. माझी सर्व स्वप्ने तुटली व नाहीशी झाली ---

माझे वय तेव्हा तेवीस होते. माझ्या अपेक्षांचा आवाजच बंद झाला. माझा तेविसावा वाढदिवस उलटून एक आठवडा झाला.

काही कामामुळे हर्बार्ट मार्सेल्सला गेला होता. शहरातील एका तरुण व्यापाऱ्याबरोबर त्याने भागीदारी केली होती आणि त्याचे छान चालले होते. त्याच्या आनंदी चेहऱ्याची व उत्फुल्ल हसण्याची मला उणीव भासत होती.

अनेक दिवस हवा खराब होती. वादळी व ओलसर होती. सगळ्या रस्त्यांवर चिखल, चिखल, चिखल, झाला होता. घरांमधून बेभान वारा वहात होता. आणि आक्रमकपणे पाऊस कोसळत होता. मी वाचायला बसलो, तो दिवस सर्वात वाईट दिवस होता.

नदीचा प्रवाह वाऱ्याने ढकलला जात होता. समुद्र दुभंगल्यासारखी, घरे हलत होती. काही वेळा अशा रात्री त्याला धुराड्यातून बाहेर पडायचे नसल्यासारखा, धूर बाहेर पडत होता. मी दार उघडे टाकून जिन्याकडे बघत बसलो आणि जिन्यातील दिवे गेले.

अकरा वाजता जसे मी माझे पुस्तक बंद केले, मला जिन्यावर कुणाची तरी चाहूल लागली.

त्या पदरवावरून, मला माझ्या मृत बहिणीची आठवण आली. का माहिती नाही पण माझ्या मानेच्या मागील बाजूवरील केस उभे राहिले. आणि माझ्या पाठीतून एक लहर सरसरत गेली. मी जिन्यातून वर येणारा पदरव ऐकला आणि मी

माझा वाचायचा दिवा घेऊन, जिन्याच्या सुरवातीशी गेलो. खाली जे कोणी होते, ते माझ्या हातातील दिवा बघून थांबले. एकाएकी सर्व शांत झाले.

मी विचारले, “कोण आहे? तुम्हाला कितवा मजला हवा आहे?

एक खरखरीत, तुटका आवाज बोलला, “सर्वात वरचा मजला, मिस्टर पिप.”

“ते माझे नाव आहे. काही झाले आहे का?”

उत्तर आले, “काहीही झालेले नाही.” आणि तो माणूस वर आला. मी जिन्याच्या कठड्यावर उजेड पाडत उभा राहीलो. आणि तो हळूहळू उजेडात आला. त्याचे कपडे एखाद्या दर्यावर्दीसारखे साधे होते. त्याचा चेहरा माझ्या ओळखीचा नव्हता. त्याचे केस काळे करडे होते आणि तो साधारण साठीचा होता. तो बळकट दिसत होता. उन्ह व वारा खाऊन तो तपकिरी झाला होता.

तो शेवटच्या एक दोन पायऱ्या चढून वर आल्यावर, त्याने माझे दोन्ही हात धरलेले पाहून, मी आश्चर्यचकित झालो.

मी विचारले, “तुम्हाला काय हवे आहे? तुम्हाला आत यायचे आहे का?”

तो बोलला, “हो, मला आत यायचे आहे.”

मी त्याला आत घेतले. दिवा टेबलावर ठेवला. आणि त्याच्याकडे स्पष्टीकरण मागितले.

त्याने स्वतःकडे विचित्र तऱ्हेने पाहीले --- त्या बघण्यात आनंद होता. जणू तो त्याच्या आवडत्या जागी आला होता --- त्याने बाहेरील कोट ओढून काढला व टोपीही. त्याच्या गळयात एक रंगीत रुमाल बांधलेला होता. मी त्याच्या डोक्याला टक्कल असलेले पाहीले. आणि फक्त कडेला लांब करडे केस होते.

त्याने इकडे तिकडे बघत विचारले, “इथे दुसरे कुणी नाही, आहे का?”

त्याच्याकडे संशयाने पहात, मी विचारले, “तुम्ही म्हणजे एक परका माणूस, रात्री माझ्या खोलीत येऊन, मला हे का विचारत आहात?” त्याने सरळ माझ्या डोळ्यात बघत मानेचा रुमाल काढला.आणि तो डोक्याभोवती गुंडाळला. मग दोन्ही हातांनी स्वतःचे शरीर धरत, थरथरत, तो खोलीमध्ये वळला. व माझ्याकडे मला तो ओळखू येतो आहे का असे पाहीले.

पाउस व वाऱ्याने मधील सर्व वर्षे उडून गेल्यासारखे, क्षणार्धात मी त्याला ओळखले. मधील वर्षे नाहीशी होऊन, आम्ही प्रथम भेटलो, त्या चर्चच्या अंगणात गेलो.

मी खूप वर्षांपूर्वी ज्याला दलदलीच्या जागी खायला घातले, तो तो माणूस, माझा गुन्हेगार होता.



# प्रकरण १२

# सत्य




मी त्याला निरखत उभा राहिलो, तेव्हा तो त्याचे हात पसरून, माझ्याजवळ पुढे सरकला. मी त्याच्या हातात माझे हात दिले. त्याने ते घेऊन, त्याच्या ओठांना लावले. त्यांचे चुंबन घेतले आणि अजूनच घट्ट धरून ठेवले. तो म्हणाला, “तू उमदा मुलगा होतास. उमदा पिप आणि मी ते कधीच विसरणार नाही.”

त्या भीतीदायक क्षणी मी विचार केला की तो त्याचे पाश माझ्याभोवती

आवळणार आहे. मी त्याला मागे करण्यासाठी हात उंच केला. जर मी केले त्याबद्दल तू उपकृत असशील, तू इथे माझे आभार मानायला आला असशील, तर त्याची काही गरज नव्हती. तुला हे खात्रीपूर्वक माहिती आहे आणि तुला समजून घेतले पाहीजे --- मी --- “

तर माझे शब्द जिभेवरच विरघळले. माझ्याकडे अशा विचित्र दृष्टीने बघत होता. तिथे थोडी शांतता पसरली. आणि तो शेकोटीशेजारील खुर्चीत बसला. त्याने विचारले, “मी काय समजून घेतले पाहिजे?”

मी मोठ्या मुश्किलीने बोललो, “हे बघ, आपले मार्ग वेगळे आहेत. तू ओला असून दमलेला आहेस. तू जाण्यापूर्वी काही पेय घेशील का?” बाजूच्या टेबलावर एक ट्रे तयार होता. मी त्याला थोडे गरम पाणी आणि रम दिली. जेव्हा मी त्याला पेला दिला, तेव्हा मी आश्चर्याने पाहीले, की त्याचे डोळे अश्रूंनी भरले होते.

मी म्हणालो, मी अशी आशा करतो, की तू ठीक आहेस”

तो. समाधानाने उत्तरला, “मी अगदी ठीक आहे. पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूच्या जगात, मी यासाठी प्रसिद्ध आहे.”

“हे ऐकून, मला आनंद झाला.”

तो माझ्या चेहऱ्याकडे बघत बोलला, “माझ्या आवडत्या मुला, तुला असे म्हणतांना ऐकून, मला आनंद झाला. मी तुला विचारू शकतो का, की त्या गार दलदलीनतर, तू काय काय केलेस?”

मी त्याला सांगितले, की काही मालमत्ता मिळण्यासाठी मला निवडले गेले आहे.

तो म्हणाला, “मी विचारू शकतो का, की कुणाची व कुठली मालमत्ता?

मी म्हणालो, “मला माहिती नाही.”

माझा गुन्हेगार बोलला, “तुला दरवर्षी जी रक्कम मिळते, त्यावरून मी तर्क करू शकतो का? कदाचित ती रक्कम पाचशे पौंड असावी, बरोबर?”

मी त्याच्याकडे निरखून पाहीले. एखाद्या जड हातोड्यासारखे माझे हृदय जड झाले. तो म्हणाला, “तुला स्थानिक पालकदेखील मिळाला असणार. कदाचित कुणी वकील. त्या वकिलाचे नाव ज ने सुरु होते का?”

माझ्या एकंदरीत स्थितीचे, रुबाबाचे सत्य अचानक माझ्यावर चालून आले आणि त्याबद्दलची नाराजी, धोके, अपमान व सर्व प्रकारचे परिणाम माझ्यावर इतके चालून आले, की मी त्याने अस्वस्थ झालो. माझा श्वास अडू लागला.

तो पुढे म्हणाला, जर त्या वकिलाचा अशील समुद्रमार्गे, पोर्ट्समाऊथला आला आणि त्याला तुला मी तुला शोधले, तसे शोधायचे असते, तर काय?

मी पोर्ट्समाऊथहून, एका लंडनमधील व्यक्तीला तुझा पत्ता कळवण्याविषयी लिहिले होते. त्या माणसाचे नाव वेमिक होते.”

जरी त्याने माझा जीव वाचला असला, तरी तरी मी तोंडातून एकही शब्द उच्चारू शकलो नाही.

“अरे पिप, माझ्या आवडत्या मुला, मी तुझा सभ्य माणूस केला आहे. मी त्या वेळेची शपथ घेऊन सांगतो, मी खात्रीने एक गिनी मिळवली होती. ती तुझ्याकडे गेली पाहीजे. मी शपथपूर्वक असे सांगतो, की मी कधी श्रीमंत झालो, तर तू देखील श्रीमंत होशील. मी गरीबीत राहीन पण तू सुखात राहीले पाहिजेस. मी खूप कष्ट करीन पण तुला काम पडायला नको. मी तुझे दुसरे वडिल आहे. पिप, तू माझा मुलगा आहेस --- तू मला कुठल्याही मुलापेक्षा जास्त आहेस. मी तुला खर्च

करण्याकरताच माझा पैसा बाजूला ठेवला आहे. मी परतपरत स्वतःला सांगितले आहे, "जर मला स्वातंत्र्य आणि पैसे मिळाले, तर मी या मुलाला एक सभ्य माणूस बनवेन. आणि मी ते केले आहे. "प्रिय मुला, तू स्वतःकडे बघ. ही एखाद्या उमरावासारखी रहायची व्यवस्था बघ. आणि तुझी पुस्तकेही." त्याचे डोळे खोलीभर फिरवून, तो म्हणाला, "तुझ्यासारखी शेकडो आणि शेकडो पुस्तके. आणि तू ती वाचतोस, नाही का? प्रिय मुला, तू ती माझ्यासाठी वाचशील का?"

जेव्हा परत त्याने माझे दोन्ही हात हातात घेतले. व ओठांना लावले, तेव्हा मी थंड पडलो. "तो मी असेन, असे तुला कधीच वाटले नाही का?"

"नाही, कधीच नाही."

"ठीक आहे, पण असे बघ. तो मी स्वतः आणि मिस्टर जॅगर्स होतो.

मी विचारले, "अजून कोणी नव्हते का?"

तो आश्चर्याने म्हणाला, 'नाही रे प्रिय मुला, अजून कोण असणार?" नंतर त्याने घाईने विचारले, प्रिय मुला, तू किती छान दिसू लागला आहेस! हे तेजस्वी डोळे! याहून जास्त तेजस्वी डोळयांचा तू कधी विचार केला आहेस का?

ओहो, इस्टेला इस्टेला, इस्टेला!

"प्रिय मुला, जर पैशाने ते विकत घेता आले, तर ते तुझे असेल. पण मी काय म्हणत होतो, ते माझे बोलून होऊ दे. जेव्हा मी ऑस्ट्रेलीयात पैसे कमावायला सुरवात केली, तेव्हा मी ते सगळे घरी तुझ्यासाठी मिस्टर जॅगर्सना पाठवले.

त्याने त्याचे हात माझ्या खांद्यावर ठेवले. मी या विचाराने थरथरलो, की हे हात कदाचित रक्ताने माखलेले असतील.

“पिप, माझ्यासाठी ते सोपे नव्हते, की तो भाग सोडून इथे येणे. पण प्रिय मुला, शेवटी मी ते केले.”

त्याने माझे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

त्याने विचारले, “तू मला कुठे ठेवशील? प्रिय मुला, मला कुठे तरी झोपले पाहिजे.”

मी म्हणालो, “झोप? हो, माझा मित्र इथे नाही, तुम्ही त्याची खोली वापरू शकता.”

“तो उद्या येईल का?”

“नाही, उद्या नाही.”

त्याचा आवाज खाली करत, तो म्हणाला, “कारण, प्रिय मुला, इकडे बघ. काळजी घेणे जरुरीचे आहे.”

“काळजी? म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“मला जीव वाचवण्यासाठी हद्दपार करून परदेशी पाठवण्यात आले. परत येणे, हे माझ्यासाठी मरण आहे. त्यांनी जर मला पकडले, तर ते मला फासावर लटकवतील. ”कसलीही गरज नव्हती पण हा दुःखी आणि वाईट नशीबाचा माणूस, त्याच्या वाईट सोन्याचांदीच्या पायी त्याचे वाईट नशीब धोक्यात घालून माझ्याकडे आला आहे. आणि मी त्याला आश्रय देतो आहे. माझा पहीला विचार होता, की पडदे ओढायचे. आणि मग दारे कुलुपबंद करायची. मी त्याला खाणेपिणे दिले आणि जेव्हा त्याला, एखाद्या कुत्र्याप्रमाणे, खातांना बघितले, तेव्हा मला त्याला दलदलीत बघितल्याची आठवण झाली. त्याचे खाणे झाल्याबरोबर तो

म्हणाला, की दमल्यामुळे त्याला झोपायचे आहे. मी त्याला हर्बर्टच्या खोलीत घेऊन गेलो.

परत त्याने माझे दोन्ही हात हातात घेऊन शुभरात्र म्हटले, तेव्हा मी परत थंड पडलो.

मी त्याच्यापासून दूर गेलो आणि शेकोटीशेजारी बसलो. मी झोपायला जायला घाबरत होतो. मी तिथे खूप वेळ बसलो. मी विचार करत होतो, की मी किती वाईट होतो, कसे मी ज्याने प्रवास केला, त्या जहाजाचे तुकडेतुकडे झाले.

मिस हॅविशामचे माझ्याबद्दलचे सर्व बेत, हे एक स्वप्न होते. इस्टेला माझ्यासाठी मुळीच नव्हती आणि सर्वात सलणारे, खोल दुःख म्हणजे, त्या गुन्हेगारासाठी मी जो आणि बिडीला सोडले होते. तो माझ्या जीवनातील सर्वात कटू क्षण होता.

तरीही हळूहळू मी खुर्चीतून घसरत खाली आलो आणि जमिनीवर झोपलो. मी जागा झालो, तेव्हा चर्चच्या घड्याळात पाचचे ठोके पडत होते. मेणबत्त्या जळून गेल्या होत्या. शेकोटी विझली होती. आणि पावसाचा व वाऱ्याचा आवाज वाढला होता.

घडलेले सर्व माझ्या मनःपटलावर, चित्रासारखे सरकू लागले. कुणाला तरी तो इथे आहे, हे माहिती असल्याशिवाय मी त्या गुन्हेगाराला इथे दडवून ठेऊ शकत नव्हतो. रोज सकाळी, दोन बायका इथे झाडण्यासाठी येत असत आणि त्या त्याला बघणार. मी त्याला असे सांगायचे ठरवले, की माझे काका अचानक इथे गावाहून येत आहेत. हर्बर्टला सत्य माहिती पाहिजे. कारण मदतीसाठी मी त्याच्यावर अवलंबून होतो.

जेव्हा मी अंधारातून, उजेडाकडे जायचा विचार करत होतो, तेव्हा मी या गोष्टी ठरवल्या. मला काय हवे आहे, हे न सापडल्याने, मी बाहेर जाऊन, पुरुषांसाठी असलेले लॉज शोधायचे ठरवले. एका माणसाला कंदील घेऊन माझ्याबरोबर घेतले. मी असा विचार केला, की माझा पाहुणा म्हणजे गावाहून आलेला माझा काका असल्याचे त्याला समजावे.

मी दार कुलुपबंद केले व हळूच खाली उतरलो. अंधारात मला मार्ग दाखवण्यासाठी हातात कंदील घेतलेला तो मनुष्य होता. मी जिन्याच्या तळाशी पोचलो. आणि भिंतीच्या कडेने चाललो होतो तेव्हा मी कशाला तरी अडखळून पडलो, ज्याने थोडे हलून रडण्याचा, कळ आल्याचा व नवल वाटल्याचा आवाज काढला. आणि ते काहीतरी म्हणजे कोपऱ्यात अंग चोरून बसलेला एक मनुष्य होता.



# प्रकरण १

## मॅगविचची गोष्ट



मी दचकून मागे वळलो.

मी विचारले, “कोण आहे?” मलाच माझा आवाज विचित्र वाटला.

त्या माणसाने काही उत्तर दिले नाही. पण झटकन माझ्या अंगावरून अंधाऱ्या जिन्याच्या तळाशी गेला. मी सरळ लॉजकडे धावलो आणि तेथील रक्षकाला पटकन येण्याची विनंती केली. त्याला वाटले काय झाले, आणि मी ते सांगितले. आम्ही खालपासून वरपर्यंत जिना तपासला. आणि तिथे कुणीच सापडले नाही. नंतर मला असे वाटले, की तो मनुष्य कदाचित, हळूच खोलीत शिरला असेल. माझ्या रक्षकाच्या दिव्यावर माझी मेणबत्ती पेटवली असेल आणि त्याला दारात उभा ठेऊन, मी ती जागा व माझा भीतीदायक पाहुणा झोपलेली जागाही

काळजीपूर्वक तपासली. सर्व काही शांत होते. तिथे कुणीही नव्हते. वर्षातील सर्व रात्रींपैकी त्या रात्री, जिन्यात कुणी अनोळखी टेहेळणी करणारा असावा, याने मला त्रास झाला. मी रक्षकाला विचारले, की त्याने अंधार झाल्यापासून किती लोकांना गेटच्या आत घेतले, तर तो उत्तरला, “सर, अगदी थोडे. एक दोन सभ्य लोक माझ्या चांगले ओळखीचे होते. आणि एका कुणी विचित्र माणसाने तुमचे नाव सांगितले, तेव्हा मी काही विचार न करता त्याला आत सोडले.”

मी म्हणालो, “माझे काका. हो.”

“आणि त्याच्याबरोबरील माणूस?”

मी विचारले, “त्याच्याबरोबरील माणूस?”

“मी ओळखले की तो माणूस तुमच्या काकांबरोबर होता. काका चौकशी करायला थांबले, की आणि तो त्यांच्यामागून चालला होता. ते थांबले, की तो देखील थांबायचा. ”

“काकांबरोबर होता? तो कसा दिसत होता?”

रक्षकाने नीट पाहीले नव्हते. जेव्हा ते दोघे गेले, तेव्हा त्या प्रकाराने मला त्रास झाला. तरी त्यावेळी मला करण्यासारखे काहीच उरले नव्हते.

मी शेकोटी पेटवली. मग अंघोळ करून, कपडे केले. मी ‘माझ्या काकांची’ वाट बघत थांबलो. तेवढ्यात त्याचे दार उघडून, तो बाहेर आला. मला वाटले, दिवसाच्या प्रकाशात तो फार वाईट दिसेल.

“मला हे कळले देखील नाही, की त्याने त्याची टेबलाजवळील जागा कधी घेतली. तेव्हा मी म्हणालो, ”मी असे सांगितले आहे, की तुम्ही माझे काका आहात. मला वाटते, जहाजावर तुम्ही काही नाव वापरता.”

“हो, प्रिय मुला, मी प्रोव्हीस असे नाव घेतले आहे.”

“तुमचे खरे नाव काय आहे?”

“मॅगविच. अबेल मॅगविच.”

“तुम्ही काल रात्री इथे आलात, तेव्हा बरोबर कुणी होते का?”

“माझ्याबरोबर? नाही, रे मुला. पण मला वाटते, माझ्यामागून एक माणूस येत होता.”

तुम्हाला लंडनमध्ये ओळखले जाते का?”

ज्यामुळे माझे तापमान वाढून, त्याच्या मनासारखे मला आजारल्यासारखे झाले, अशा तऱ्हेने मानेला बोटाने झटका देत, तो म्हणाला, “मला अशी आशा आहे, की नाही.”

लंडनमध्ये तुमच्यावर खटला झाला होता का?”

त्याने मान हलवली. त्यावेळेस मिस्टर जॅगर्स मला माहिती झाले. त्याने माझी वकिली केली.”

त्याला असे विचारावे, असे माझ्या अगदी ओठांवर आले होते, पण त्याने भुकेलेल्या कुत्र्यासारखे, हातात चाकू घेऊन, न्याहारी संपेपर्यंत त्यावर तुटून पडायला सुरवात केली. जेव्हा तो टेबलावरून उठला, आणि तंबाखूने भरलेला एक छोटासा काळा पाइप काढला व त्याच्या मनासारखा पेटवला. तेव्हा त्याने त्याची आवडती मुद्रा केली. त्याचे हात पसरून, माझे हात हातात घेण्यासाठी तो माझ्याकडे आला.

तो बोलला, “आणि हा सभ्य गृहस्थ, ज्याला मी तयार केले त्याला, म्हणजेच मिस्टर पिपला बघतांना मला चांगले वाटते आहे.”

माझे हात बाजूला घेत, मी म्हणालो, “मला तुमच्याशी बोलायचे आहे. मला जाणून घ्यायचे आहे, की तुम्ही धोक्यापासून लांब कसे राहीलात आणि तुम्ही किती दिवस इथे रहाणार आहात?”

तोंडातून पाइप काढत तो म्हणाला, “किती दिवस? मी परत जाणार नाही आहे. मी माझ्या भल्यासाठी घरी आलो आहे.”

मी विचारले, तुम्ही कुठे रहाणार? तुमचे काय करायचे? कुठे तुम्ही सुरक्षित असाल?”

तो म्हणाला, “मला काही नवीन कपडे हवे आहेत. मी आता जे काही करतो आहे, त्यासाठी मला थोडे वेगळे दिसायची गरज आहे. त्याने खिशातून एक छोटेसे जाड पुस्तक काढले व पाने उलटत, ते टेबलावर फेकले. “प्रिय मुला, त्या पुस्तकातल्याप्रमाणे काही करावे, असे ते आहे. आणि ते कोठून आले, तर ऐक. तू मला काही नवीन कपडे घेऊन दे आणि मग कोणीच मला अबेल मॅगविच म्हणून ओळखणार नाही.” त्याला जवळच कुठेतरी एखादे शांत लॉज बघून द्यावे, यापेक्षा जास्त चांगले काही मी करू शकत नव्हतो. जेव्हा दोन तीन दिवसात, हर्बार्ट परत येईल, तेव्हा मी त्याला काही वेगळे कपडे घेऊन देईन --- एखाद्या सधन शेतकऱ्याने घालावे असे --- आणि त्याचे केस जरा कमी करून त्याला पावडर लावायला लावेन. त्या दुपारी मी त्याला माझ्या खोलीत कुलुपबंद केले आणि माझ्या खोलीपासून हाकेच्या अंतरावरील, इसेक्स रस्त्यावरील एक लॉजमध्ये गेलो. तिथे मिस्टर प्रॉव्हीस, या माझ्या काकांसाठी दुसऱ्या मजल्यावर एक खोली मिळवण्याइतका, मी सुदैवी ठरलो. मग मी बरीच दुकाने हिंडलो. माझ्या काकांच्या दिसण्यात बदल करण्यासाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी घेऊन आलो.

मी परत सरळ घरी आलो. तिथे मी भलत्याच अवस्थेत प्रॉव्हीस यांना रम व पाणी ढोसतांना व पाइप ओढतांना पाहीले.

दुसऱ्या दिवशी मी मागवलेले कपडे आले. जेव्हा त्यांचे केस मी कापले आणि नवीन कपडे त्यांना घातले, तेव्हा मला असे वाटू लागले, की मी त्यांचे बाह्यरूप दर्शवण्याचा निरर्थक प्रयत्न केला आहे. प्रॉव्हीस मला एक गूढ बनून राहीला होता. त्या उजाड खोलीत पावसाच्या व वाऱ्याच्या माऱ्यात तो मला माझ्या खर्च झालेल्या पैशांच्या पुंजीची आठवण करून देत होता. एखाद्या भुतानेही माझ्या पैशांवर एवढा डल्ला मारला नसता. तो भयानक दिसत होता.

हे असे थांबून रहाणे व काही न करणे मला वर्षासारखे लांबलचक वाटत होते. खरे तर ते पाच दिवस चालले होते.

सर्व वेळ हर्बार्टची वाट बघत, मी कुठेच बाहेर गेलो नाही. फक्त एकदा दिवस मावळल्यावर प्रॉव्हीसला घेऊन, फिरायला गेलो होतो. शेवटी, एका संध्याकाळी, जेवण झाल्यावर, खूप दमून, मी झोपलो होतो, तेव्हा मी जिन्यावर पायरव ऐकला. झोपलेला प्रॉव्हीस उडी मारून उभा राहीला. आणि क्षणार्धात मी त्याच्या हातात, चमकणारा सुरा पाहीला.

मी म्हणालो, "शांत. इथे हर्बार्ट आहे." आणि हर्बार्ट तिथे अवतीर्ण झाला.

तो ओरडला, "तू कसा आहेस? तू इतका बारीक कसा झाला आहेस? माझ्या आवडत्या, अरे, मी काय म्हणतो आहे!"

त्याने परत खिशात सुरा ठेवणाऱ्या प्रॉव्हीसला पाहिल्यावर, तो थांबला. मी दार लावत बोललो, "हर्बार्ट, काहीतरी विचित्र झाले आहे. हा माझा पाहुणा आहे.

हर्बार्ट, बस. मी तुला त्याच्याबद्दल सगळे काही सांगतो. तो निरीक्षण करत व आश्चर्य वाटत उभा होता.

जेव्हा मी, हर्बार्ट आणि प्रॉव्हीस शेकोटसमोर बसलो, तेव्हा हर्बार्टला वाटलेले आश्चर्य वर्णनातीत होते. मी सगळ्या गुप्त गोष्टी सांगितल्या. आणि जेव्हा माझे सांगून संपले, तेव्हा प्रॉव्हीसची पाळी आली.

तो म्हणाला, " प्रिय मुला व तुझ्या मित्रा, मी तुम्हाला माझ्या आयुष्याची गोष्ट सांगणार आहे. आणि तीदेखील मोठ्या अवघड इंग्लिशमध्ये सांगणार आहे. तुरुंगातील व तुरुंगाबाहेरील तेव्हापासून, जेव्हा मी अगदी हवेत होतो ---

"मी कुठे जन्मलो, याची मला काही कल्पना नाही. इसेक्समध्ये मला माझी पहील्याप्रथम जाणीव झाली. तेव्हा मी जगण्यासाठी धडपडत होतो. मला माझे नाव मॅगविच असल्याचे, मी गरीब प्राणी असल्याचे आणि मी कुणालाच नको असल्याचे मला माहिती होते.. मग मी काय करावे? मला भूक लागे. मी पुढील वीस वर्षे काम केले, भीक मागितली आणि चोऱ्या केल्या आणि मी वयात आलो. मोठा मनुष्य झालो. पण मी काम करुनही, भीक मागे आणि चोऱ्या करे. मी लग्न केले, पण नाही, मी त्याबद्दल बोलणार नाही. मला तिच्याबरोबर फार त्रास झाला.

शेवटी मला एक कॉम्पेयसन नावाचा, सभ्य माणूस भेटला. तो चांगल्या शाळेत जाऊन शिकला होता. तो दिसायला व बोलायलाही चांगला होता. त्याने मला भागीदार करून घेतले. त्याचा व्यवसाय म्हणजे कुठल्याही प्रकारची ठकगिरी, हा होता. बँकेतून नोटा चोरणे वगैरे.

त्याच्याबरोबर आर्थर नावाचा अजून एक मनुष्य होता. मी त्याला पहिल्यांदा भेटलो, तेव्हा तो आजारी माणूस होता. काही वर्षांपूर्वी कॉम्पेयसन आणि आर्थर

दोघेही एका श्रीमंत बाई बरोबर मिळून, वाईट धंदा करत होते. त्यांनी त्यातून खूप पैसा कमावला होता. पण लवकरच त्यांनी तो वाईटसाईट सवयींमध्ये उडवून टाकला. शेवटी कॉम्पेयसन व मी दोघांनाही नोटा चोरल्याच्या आरोपावरून, पकडण्यात आले. आणि शिवाय अजूनही काही आरोप होते. जेव्हा आम्हाला कोर्टात आणण्यात आले, मला पहिली गोष्ट जाणवली म्हणजे कॉम्पेयसन पूर्णपणे सभ्य माणूस दिसत होता. आणि मी मात्र त्याच्यापुढे अगदीच भिकार दिसत होतो. पुरावे ऐकले गेले आणि माझ्याविरुद्ध काहीबाही सांगून आणि त्याच्या चांगल्या दिसण्याने कॉम्पेयसन सुटला. जेव्हा आम्हाला शिक्षा झाली तेव्हा त्याला सात वर्षे जहाज तुरुंगात पाठवले गेले आणि मला चौदा वर्षे! मी त्याला चिडून म्हणालो, "एकदा या कोर्टातून बाहेर पडलो, की मी तुझा खोटा चेहरा चिरडून टाकणार आहे" हे ऐकून तुम्ही आश्चर्यचकीत झाला असाल."

"आम्ही एकाच जहाज तुरुंगात होतो. पण प्रयत्न करूनही, मला अनेक दिवस तो सापडला नाही.

शेवटी मी त्याचा पाठलाग करून, त्याच्य गालफडात लगावली. पण मी अजून काही करण्यापूर्वी इतर लोकांनी मला थांबवले. त्यानंतर मी किनाऱ्यावर पळालो. तिथे मी पहिल्यांदा चर्चच्या अंगणात या मुलाला पाहीले.

त्याने माझ्याकडे प्रेमाने पाहीले.

पिपने मला सांगितले की कॉम्पेयसनदेखील कसा तुरुंगातून पळून इथे दलदलीत आला आहे. माझ्यापासून दूर पळण्याच्या भीतीने तो तुरुंगातून निसटला असणार कारण मी किनाऱ्यावर गेल्याचे त्याला माहिती नसणार. मी त्याला खाली शोधले. त्याचा चेहरा फाडला. आणि माझी स्वतःची काळजी न करता, त्याला परत तुरुंगात पाठवले. मला बेड्या घालून, पुन्हा सुनावणीसाठी कोर्टात आणण्यात

आले. आणि देशातून हद्दपारीची शिक्षा दिली गेली. माझे आयुष्य चालूच राहीले. त्यामुळे तू मला इथे पाहतो आहेस.”

तिथे शांतता पसरली. शेवटी मी विचारले, “तो मेला का?”

“प्रिय मुला, कोण मेले का?”

“कॉम्पेयसन.”

“त्याला अशी आशा असेल, की मी मेलो असेन. जर तो जिवंत असेल, तर तू खात्री बाळग, की मी त्याच्याबद्दल कधीच काही ऐकले नाही.

हर्बार्ट एका पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पेन्सिलीने लिहित होता. प्रॉव्हीस पाइप ओढत असतांना, हर्बार्टने शेकोटीतील आगीकडे बघत, पुस्तक माझ्याकडे ढकलले. मी त्यात वाचले. *‘तरुण हॅविशामचे नाव आर्थर होते. कॉम्पेयसन हा तिचा प्रेमिक असल्याचे ढोंग करणारा माणूस होता.’*



मी पुस्तक बंद केले आणि हर्बार्टकडे बघून मान डोलावली. पण_आमच्यापैकी कुणीच काही बोलले नाही. शेकोटीशेजारी उभे राहून, पाइप_ओढणाऱ्या प्रॉव्हीसकडे आम्ही दोघे बघत राहीलो.

# प्रकरण १४

# अपघात



हर्बर्ट म्हणाला, ”पहीली आणि महत्वाने करायची गोष्ट ही आहे, की त्याला इंग्लंडमधून हाकलणे. जर तू त्याच्या बरोबर गेलास, तर तो तयार होईल.

मी कबूल केले. अजून करण्यासारखे काहीच नव्हते. त्या रात्री उशीरा, मी प्रॉव्हीसला लॉजमध्ये भेटून परत येत होतो.

हर्बर्ट शांतपणे म्हणाला, ”त्याने इथे येऊन धोका घेतला आहे. आणि शक्य असेल, तर तू त्याला वाचवले पाहीजेस. जर कॉम्पेयसनला समजले की तो इथे आहे, तर --- तुला माहिती आहे, खात्रीने काय होईल. तो स्वतःची कातडी वाचवण्यासाठी, त्याला फाशीच्या शिक्षेकडे वळवेल.

मी अस्वस्थपणे जिन्यावरील अनोळखी माणूस आठवला. कदाचित कॉम्पेयसनला आधीच माहिती असेल. तो अस्वस्थ करणारा विचार होता. जितक्या लवकर आम्ही हा देश सोडण्यासाठी, प्रॉव्हीसचे मन वळवू, तेवढे ते बरे ठरेल. पण मी हर्बर्टला म्हणालो, आपण परदेशी जाण्यापूर्वी मला एकदा इस्टेलाला शेवटचे भेटायचे आहे. मी दुसऱ्या दिवशी रिचमंडला जायचे ठरवले व गेलो.

मला इस्टेलाच्या नोकराणीकडून समजले, की इस्टेला गावाकडे गेली आहे. कुठे? नेहमीप्रमाणे, मिस हॅविशामकडे.

दुसऱ्या दिवशी मी थाप मारली, की मी जो ला भेटायचे वचन दिले असल्याने, मला तिथे जायला हवे. मी गेल्यावर प्रॉव्हीस फार दक्ष होता. आणि हर्बार्ट त्याची काळजी घेणार होता. शहरातील ब्लू बोअर मधून न्याहारी करून, मी पहाटेच्या बग्गीने निघालो. जेव्हा मी माझ्या चेहऱ्यावरील व हातावरील प्रवासाच्या खाणाखुणा धुवून टाकल्या, तेव्हा मी प्रवेश न केलेला बरा, अशा जुन्या घरी गेलो.

लांब टेबल असलेल्या खोलीत मिस हॅविशाम होती. पण इस्टेला कुठे दिसत नव्हती. त्या म्हातारीने माझ्याकडे स्थिर नजरेने पाहीले. पण मला ती जरा गोंधळलेली वाटली.

तिने मला विचारले, ''पिप, आज इकडे कुठे रस्ता चुकलास?

मी म्हणालो, “मिस हॅविशाम, मी इस्टेलाशी बोलण्यासाठी, काल रिचमंडला गेलो. मला असे सांगण्यात आले, की ती इथे आहे. आणि म्हणून मी इथे आलो.”

तिने मान हलवली.

ती बोलली, “इस्टेला इथे नाही. पिप, आज ती गेली. आज तिचे लग्न आहे.”

मी तिच्याकडे बघतच राहीलो. नकोसे सत्य माझ्यावर चालून आले.

“नाही ---नाही.”

मला तिचे नाव घेववेना. मिस हॅविशामने मान हलवली.

ती म्हणाली, “हो, पिप. बेन्टले ड्रुमलबरोबर तिचे लग्न आहे.”

मी माझा चेहरा हाताने झाकून घेतला. तिने असे का केले? असल्या मूर्खाशी तिने लग्न का ठरवले? मला उत्तर माहिती होते. हा मिस हॅविशामच्या सूडाचा भाग होता. मी सोडून, इतर अनेक इस्टेलाचे प्रेमिक होते. अनेकांनी तिच्यासाठी त्यांचे आयुष्य पणाला लावले होते. आणि तिने काय केले, हे त्यांना जेव्हा समजेल, त्यानादेखील माझ्यासारखेच दुःख होईल.

मी वर बघितले आणि त्या वृद्धेच्या डोळयात अश्रू पाहून, मला नवल वाटले. तिचा चेहरा दुःखी दिसत होता. तिने तिचे हात माझ्याकडे पसरले.

ती तुटक्या आवाजात म्हणाली, “ओहो! पिप, मी हे काय केले?”

“मिस हॅविशाम, जर तुम्हाला असे वाटत असेल, की मला जखमी करून तुम्ही काय केले, तर मला तुम्हाला उत्तर देऊ दे. अगदी थोडक्यात. मी माझी परिस्थिती पाहून, तिच्यावर प्रेम करायला हवे होते.”

ती म्हणाली, “अरे प्रिय मुला, यावर विश्वास ठेव. जेव्हा पहील्यांदा ती माझ्याकडे आली, तेव्हा मला तिला दुःखातून वाचवायचे होते. पण जसजशी ती मोठी होत गेली, तसतशी ती जास्त जास्त सुंदर होत गेली. मी हळूहळू माझ्या स्तुतीने व हिरेमाणकांने, आणि सर्व पुरुषजातीवरील सूडाच्या भावनेने, मी सर्वात वाईट कृत्य केले. मी तिचे हृदय चोरुन, त्यात बर्फ भरले. जर तुला माझी सर्व हकीगत समजली, तर तुला मी असे का केले, ते कळले असते.”

तिने मान हलवली.

“तुला माहिती नाही?” तिने परत मान हलवली. मी खूप काळ स्वतःला या खोलीत कोंडून घेतले होते. जेव्हा मी मिस्टर जॅगर्सला सांगितले, की मला एक लहान मुलगी हवी आहे, तेव्हा त्यने तिला इथे आणले. मी तिच्यावर स्वतःच्या

मुलीसारखे प्रेम केले. ती दोन तीन वर्षांची असतांना त्याने तिला झोपेतून उचलून इथे आणले. आणि मी तिला इस्टेला म्हणू लागले.

“म्हणजे मिस्टर जॅगर्सने तिला इथे आणले तर! जर मी त्यांना विचारले, तर ते मला सर्व काही सांगतील.”

मी उठलो. मला दुःखाच्या आजाराने घेरून टाकले.

मी म्हणालो, “मिस हॅविशाम, मी इथून जाण्यापूर्वी बागेत थोडे फिरून येतो.”

मी जेव्हा खोलीतून जाऊ लागलो, तेव्हा ती काहीतरी बोलली. पण मी खाली गेलो. आणि भकास बागेत फिरू लागलो. मी खूप वेळा बागेला चक्कर मारली. जिथे मी आणि हर्बार्टने मारामारी केली, तो कोपरा पाहीला. मी आणि इस्टेला जिथे फिरलो, त्या जागा नजरेखालून घातल्या. आता सर्व काही खूप थंड, उदास आणि भरून आलेल्या मनस्थितीचे होते मिस हॅविशामचा निरोप घ्यायला, बऱ्याच वेळाने, मी वर गेलो. मी तिला खोलीत शोधले. ती शेकोटीजवळ बसलेली असून, माझ्याकडे तिची पाठ होती. एका फाटक्या तुटक्या खुर्चीत बसली होती. मी शांतपणे वळून परत जाणार होतो, तेव्हा मी एक प्रकाशित ज्वाळा वर उंच आलेली पाहीली. तेव्हाच मी तिला माझ्या दिशेने, ज्वाळांनी लपेटलेल्या अवस्थेत, माझ्याकडे किंचाळत, धावत येतांना पाहीले.

तिचा लांब नववधूचा ड्रेस शेकोटीच्या ज्वाळेत जाऊन पेटला व क्षणार्धात ती सर्व बाजूंनी पेटली. माझा कोट जाड व जड होता. मी तो ओढून काढला व तिला मिठीत घेतले. मग मी टेबलावरील कापड ओढले व ते मधील अर्धवट जळक्या ढीगावर टाकले. मी तिच्या अंगावरदेखील कापड टाकले. मग आम्ही

दोघे जमिनीवर पडलो. आमची धडपड चालली होती. मी तिला जितका कापडात लपेटत होतो, तितकी ती रानटीपणे किंचाळत स्वतःला सोडवायला बघत होती.

नोकर धावत दाराशी आले. तरीही मी तिला सर्व शक्तीनिशी, घट्ट धरून ठेवले होते.

शेवटी तिच्या किंकाळ्या कमी होत गेल्या. पण मी घाबरलो होतो. डॉक्टर ला बोलावणे गेले. मी तो येईपर्यंत, ती पुन्हा आगीच्या दिशेने जाऊ नये, म्हणून मी तिला धरून ठेवले होते.

जेव्हा मी उठलो तेव्हा माझे दोन्ही हात भाजलेले पाहीले, तेव्हा मी आश्चर्यचकित झालो. कारण आधी मला तसे काहीच जाणवले नव्हते.

डॉक्टरांच्या सांगण्यावरून, तिचे अंथरूण खोलीतील मोठ्या टेबलावर घालण्यात आले. जेव्हा तिला तपासले गेले, तेव्हा डॉक्टर म्हणाले, ती गंभीर रीत्या भाजली आहे आणि बहुधा जगणार नाही. त्या संध्याकाळी काय झाले, ते तिने स्पष्टपणे सांगितले. मग मध्यरात्रीच्या सुमारास, ती काहीबाही बोलू लागली. आणि तेच तेच खालच्या, भारदस्त आवाजात बोलत राहीली. “मी हे काय केले! ओहो! पिप, मी हे काय केले!”

माझ्या हातांना डॉक्टरने मलमपट्टी केली. आणि जखमा फार गंभीर नव्हत्या. मी घरात राहून अजून काही चांगले करू शकणार नव्हतो, त्यामुळे, मी सकाळी लवकर बग्गी घेऊन, लंडनला जायचे ठरवले. सकाळी सहा वाजता, मी तिच्यावर वाकून, माझे ओठ तिच्या ओठांवर टेकवले. जिना उतरून घराबाहेर पडलो. मी घरी पोचलो, तेव्हा फार अस्वच्छ होऊन खूप दमलो होतो. रक्षकाने माझ्यासाठी

गेट उघडून धरले, तेव्हा त्याने माझ्याकडे निरखून बघितले, तरी मी त्याकडे दुर्लक्ष केले.

तो म्हणाला, ”दोन मिनिटे, सर, तुमच्यासाठी ही चिठ्ठी आहे.”

फार नवल वाटून मी ते बंदिस्त पाकीट घेतले. त्यावर लिहिले होते,

.‘कृपया हे इथे वाचा.’ मी ते उघडले आणि वाचले. चिठ्ठीत असे लिहिले होते, ‘तुमच्या खोलीत जाऊ नका.’



# प्रकरण १५

## इस्टेलाचे वडिल




गेटपासून मागे वळून, मी चिठ्ठीत वाचल्याप्रमाणे, मिस्टर जॅगर्सच्या कार्यालयात जायला निघालो. माझा पालक कोर्टात होता. वेमिक तिथे होता व मला बघून, त्याने सुटकेचे भाव दर्शवले.

तो म्हणाला, "तुला माझी चिठ्ठी मिळाली? छान! काल सकाळी मी अचानक असे ऐकले, की एक विशिष्ट माणूस --- आम्ही नाव सांगत नाही. मिस्टर पिप, जो सरकारी खर्चाने परदेशी गेला आणि एका विशिष्ट ठिकाणाहून नाहीसे होऊन, त्याने बरीच खळबळ माजवली. नंतर त्याच्याबद्दल काहीच कळले नाही. मी असेही ऐकले, की त्याला ओळखणाऱ्या कुणीतरी त्याला लंडनमध्ये बघितले. तुझी खोली तपासली गेली. आणि कदाचित परतदेखील तपासली जाईल.

मी विचारले, कुणाकडून?"

वेमिक उत्तरला, "मी काही त्यात पडलो नाही. मिस्टर जॅगर्सना मला त्यांच्या अशीलांची, किंवा वयस्क अशीलांची नावे सांगायला आवडत नाही. मिस्टर पिप,

आमचा बराचसा व्यवसाय जे लोक कायद्याविरुद्ध काही करतात, अशा लोकांशी चालतो. त्यामुळे आम्हाला काळजी घ्यावी लागते, काय समजलास?”

मी मान डोलावली व विचारले, “तू कॉम्पेयसन नावाच्या माणसाबद्दल ऐकले आहेस का?”

आता मान डोलावण्याची पाळी वेमिकची होती.

“तो जिवंत आहे?” दुसऱ्याने मान डोलावली.

“तो लंडनमध्ये आहे का?”

वेमिक बोलला, “हो. मी जे ऐकले, त्यानंतर मी काय केले ते सांगतो. मी टेम्पलला जाऊन तुला शोधले. तू न सापडल्याने मी मिस्टर हर्बार्टच्या कार्यालयात गेलो. त्याला सांगितले, की तू इथे नाहीस व जर त्याला कुणी लपून बसल्याचे समजले, तर त्याने त्या माणसाला हाकलून द्यावे.

मी म्हणालो, “काय करावे, याचे त्याला कोडे पडले असेल.”

“काय करावे, याचे त्याला कोडे पडले, कारण मी त्याला माझे मत दिले, की त्या माणसाला देशाबाहेर हाकलणे, सध्या सुरक्षित दिसत नाही. मग त्याने एक बेत आखला. तो म्हणाला, की तो जिचे वडिल अंथरुणाला खिळून आहेत व जी ग्रीनहाउस व लाईमहाऊसच्या मध्ये नदीकिनारी रहाते, अशा एका बाईचा तो अनुनय करतो आहे. मिस्टर पिप, मला वाटते, ती तरुण बाई तुला माहिती आहे?”

मी म्हणालो, “फारशी नाही.”

“खरे तर मला माहिती आहे, की त्या तरुण बाईचे नाव क्लारा आहे. भरपूर पैसे घेऊनही हर्बार्टचे भले न करणारी, त्याची सोबतीण म्हणून काम करणारी अशी ती बाई आहे.

वेमिकने चालू ठेवले, "मिस्टर हर्बार्टने असे सुचवले, की कुणा तरी माणसाला घेऊन, तिथे जावे आणि मला ती कल्पना आवडली. कारण पहीले म्हणजे ती नदीला जवळ आहे. दुसरे म्हणजे मिस्टर हर्बार्ट तिथे वारंवार कुणाला काही संशय न येता जाऊ शकतील. तिसरे असे की तुला या माणसाला समजा परदेशच्या बोटीवर चढवायचे आहे, तर तो तयार असेल. त्याला असे सांगितले गेले आहे, की त्याला इथे धोका आहे. तशी वेळ आली तर योग्य वेळी, तू जर त्याच्याबरोबर गेलास, तर त्याने देश सोडायची तयारी दाखवली आहे."

मी अर्थात हे सगळे कबूल केले. हे सर्व काही ठीक दिसत होते आणि त्याबद्दल, मी वेमिकचे आभार मानले.

मग तो म्हणाला, "मिस्टर पिप, मी तुला असे सांगतो, की आता तुझा मित्र जिथे आहे, तिथेच त्याला तात्पुरते, सर्व काही शांत होईपर्यंत ठेव. तू चांगला पोहणारा आहेस आणि योग्य वेळ येईल, तेव्हा तू त्याला कधीही नदीवर नेऊ शकतोस. टेम्पलच्या पायऱ्यांशी तू एक बोट ठेवायला आणि त्यातून इकडे तिकडे चक्कर मारायला सुरवात केलीस, तर त्याला कोण काय हरकत घेणार आहे? जर तू सर्व काही माझ्यावर सोपवलेस, तर मी तुला इथून निघून जाण्याची योग्य वेळ सांगू शकेन."

मी परत वेमिकचे आभार मानले. नंतर गेले काही दिवस मला त्रास देणाऱ्या गोष्टीचा मी विचार करू लागलो.

मी म्हणालो, वेमिक, तुला आठवते का, की तू मला मिस्टर जॅगर्सचे घर राखणाऱ्या बाईची विशेष दखल घेण्यास सांगितले होतेस?

वेमिकने मान हलवली.

“माझी अशी इच्छा आहे, की तू मला तिची गोष्ट सांगावीस. मला त्याच्यात व्यक्तिगत रुची आहे.”

काही वेळ त्याने हो नाही केले व मग बोलला, “वीस वर्षांपूर्वी त्या बाईवर जुन्या बेलीमध्ये खुनाबद्दल केस केली गेली होती. त्यावेळी ती फार तरुण व सुंदर दिसत असे.”

“तेव्हा तिला सोडून देण्यात आले का?”

“हो, मिस्टर जॅगर्स तिच्या बाजूने होते. आणि त्यांनी तिला गुन्ह्यातून सोडवले. पण ती खून करणारी एक बाई होती. ती हेवादावा करायची केस होती. मॉली नावाच्या मुलीचे दुसऱ्या बाईशी भानगड असणाऱ्या एका वाईट माणसाशी लग्न झाले होते. खून झालेल्या बाईचे प्रेत एका धान्याचे कोठार असलेल्या शेतघरात सापडले. तिथे रक्तरंजित मारामारी झाली.

तिला चिरडून, ख्ररचवटले गेले व गळा आवळून, तिला श्वास घेण्यास अवरोध केला गेला. हे सर्व मॉलीने केल्याचे व तिला ठार मारल्याचे, आढळून आले. मॉलीला फक्त एकदोन जखमा झाल्या. पण तिचा हात व मनगटांची मागील बाजू जणू धारदार नखांनी फाडली गेली. असा पुरावा दाखवायचा प्रयत्न केला गेला, की तिने तिच्या नवऱ्यावर सूड उगवण्यासाठी, तिच्या तीन वर्षाच्या मुलाचा खून केला. मिस्टर जॅगर्सने त्याचा असा अर्थ लावला. “तुम्ही म्हणता की तिच्या हातावरील खुणा या नखांनी ओरबाडून झाल्या आहेत आणि तिने तिच्या मुलाला ठार मारले असावे आणि त्या मुलाने त्याच्या नखांनी तिला ओरबाडले असावे. तर मग काय? तुम्ही तिला तुम्ही तिला मुलाच्या खुनाबद्दल अटक करत नाही आहात. तर दुसऱ्या बाईच्या खुनाबद्दल अटक करत आहात --- आणि ते तर तुम्हाला सिद्ध

करता येत नाही. सर, थोडक्यात काय, तर मिस्टर जॅगर्स ज्युरींच्यापेक्षा वरचढ ठरला.

मी विचारले मेलेले मूल मुलगा होता की मुलगी?

"मुलगी."

मी पुन्हा वेमिकचे आभार मानले व माझ्या विचारांना नवीन खाद्य देत, पण जुने विचार चालूच ठेवत, घरी गेलो.

माझा पहिला प्रश्न असा होता, की जेव्हा हर्बार्ट त्या संध्याकाळी घरी आला, तेव्हा नदीवरील हवा चांगली होती का? त्याने हो असे उत्तर दिले आणि गेल्या काही दिवसांमधील घटनांचा परामर्श घेण्यासाठी, आम्ही शेकोटीशी बसलो.

हर्बार्टने मला सांगितले, "काल रात्री मी प्रोव्हीसबरोबर दोन तास बसून बोलत होतो. कुठल्याशा कारणांने तो त्याच्या गत आयुष्याबद्दल खूप बोलला. तुला आठवते का, की त्याने त्याला एका बाईकडून बराच त्रास झाल्याचे सांगितले होते? असे दिसत होते की ती तरुण व रानटी होती. तिला इतका टोकाचा हेवा होता, की ती तिची मजल खून करण्यापर्यंत गेली.

मी सुरवात केली, पण हर्बार्ट शेकोटीकडे बघत बसल्याने, त्याचे लक्ष नव्हते.

त्याने पुढे चालू ठेवले, "तिच्यावर खटला चालवला गेला. तिचा वकील मिस्टर जॅगर्स होता. यात दुसऱ्या एका बाईचा बळी गेला होता. आणि तिथे धान्याचे कोठार असलेल्या शेतघरात मारामारी झाली. प्रोव्हीस व त्याच्या बायकोला लहान मुलगी होती. ती प्रोव्हीसची फार लाडकी होती. खुनाच्या दिवशी संध्याकाळी त्याची बायको त्याच्याकडे आली व शपथपूर्वक सांगू लागली, की ती मुलीला मुद्दाम मारणार आहे. मग ती अदृष्य झाली.

“ती बाई बोलल्याप्रमाणे वागली का?”

तो म्हणतो ती तसे वागली. त्याने परत त्याच्या मुलीला कधीच बघितले नाही आणि कोर्टाच्या सुनावणीनंतर ती बाई अदृष्य झाली.

माझ्या हृदयाचे ठोके ऐकत, मी विचारले, “हे कधी घडले, हे त्याने सांगितले का?”




“हो. तुला तो चर्चच्या अंगणात भेटला त्यापूर्वी तीन/ चार वर्षे हे झाले.

तो म्हणाला, की तू त्याला त्या माणसाने गमावलेल्या मुलीची आठवण करून दिलीस. ती आता साधारण वयाने तुझ्याएवढीच असती.”

मी म्हणालो, मला ती माहिती आहे. ती मेली नाही. हर्बार्ट, आपण नदीकाठावर लपवून ठेवलेला मनुष्य, हे इस्टेलाचे वडील आहेत.”

# प्रकरण १६

# नदीवर




दुसऱ्या दिवशी मी टेम्पलच्च्या पायऱ्यांशी एक बोट आणली, जेणेकरून मला दोन तीन मिनिटात तिच्याजवळ पोचता यावे. नंतर मी जणू काही प्रशिक्षणासाठी व सरावासाठी, बाहेर जायला सुरवात केली. कधीतरी एकट्याने, तर कधीतरी हर्बार्टबरोबर. वेमिककडून काही कळले नाही. आणि आम्हाला सावध करेल, असे काही आम्ही पाहीले नाही. मला माहिती होते, की सावधानतेच्या इशाऱ्याचे कारण आणि आमच्यावर कुणी लक्ष ठेऊन असल्याची कल्पना माझ्या डोक्यातून जात नव्हती.

काही आठवडे गेले. माझे आयुष्य दुःखात चालले होते. मला खूप काळज्या होत्या. मी माझी बोट वल्हवत असे व मला जितके शक्य होईल, तितके थांबून राही. थांबून राही व थांबून राही.

हर्बार्टने मला सांगितले, की त्याचा व्यवसाय इतका छान चालला आहे, की तो व त्याचे भागीदार असे ठरवत आहेत, की पूर्वेला अजून एक शाखा काढायची आणि तो स्वतः हे लवकरच करेल. म्हणजे हर्बार्ट इथे नसतांना, मला प्रोव्हीसचे जे

काही करायचे, ते करावे लागेल आणि ते हर्बार्टच्या मदतीशिवाय करावे लगेल, ते मी कसे काय करू शकेन, याचे मला नवल वाटले.

मार्च महिना उजाडला. माझ्या हातावरील जखमा बऱ्यापैकी भरून आल्या. मग एका सोमवारी सकाळी, जेव्हा आम्ही न्याहारी करत होतो, तेव्हा मला वेमिककडून अशी चिठ्ठी आलीः

‘हे वाचल्याबरोबर लगेच जाळून टाक. या आठवड्यात सुरवातीला, किंवा बुधवारी, तुला जे करायचे आहे, ते तू करू शकतोस. .आता जाळून टाक.’

हर्बार्टने व मी काय करायचे, त्याचा विचार केला. मला प्रोव्हीसला इंग्लंडबाहेर काढायचे असल्याने मी याची फारशी काळजी केली नाही, की प्रोव्हीस व मी कोणत्या बंदराला जातो आहोत. आम्हाला हे माहिती होते, की लंडनहून कोणत्या वेळी, कुठल्या रंगाची व कशा प्रकारची बोट सुटणार आहे. आम्ही ठरवले की आम्हाला एखादी बोट सापडेपर्यंत, प्रोव्हीसला नदीतून आणून एखाद्या शांत ठिकाणी झोपवून ठेवायचे. इथून उतारूंना बोटीत घेतले जात असल्याचे आम्हाला माहिती होते आणि तसेच त्याला बोटीवर चढवायचा आमचा बेत होता.

मग आम्ही बोटीच्या प्रवासासाठी आवश्यक असे कागदपत्र व पासपोर्ट ताबडतोब मिळवण्यासाठी, काही तासांसाठी त्याला सोडून मी दूर गेलो.

हर्बार्टने प्रोव्हीसला समजावून सांगितले की इंग्लंड सोडून जायची त्याची योग्य वेळ आली आहे आणि त्याने अगदी लगेच नाही, तरी बुधवारी आम्हाला भेटल्यावर, एका घराचे काही जिने चढून जाणे गरजेचे आहे.

मी त्या वेळेपासून बुधवार उजाडेपर्यंत, काही तास झोपलो. ते मार्चमधील दिवस होते. खूप कडक उन्ह होते आणि गार वारा वहात होता. आमच्या बोटीने

पाण्यात उतरावे की नाही असा विचार करत, आम्ही टेम्पलच्या पायऱ्यांवर जाऊन थोडा वेळ उभे राहिलो. मग आम्ही वल्ही हातात घेतली. साडेआठ वाजले होते पाण्याला जोर होता. उसळणाऱ्या पाण्यात अनेक बोटी चालल्या होत्या. आम्ही भेटायच्या जागी निघालो.

हर्बार्ट म्हणाला, ‘तो तिथे आहे का?”

“अजून तरी दिसत नाही. नाही. एक मिनिट थांब. आता तो दिसतो आहे. जोरात वल्हव. हर्बार्ट, वल्ही जोरात मार!” आम्ही जिन्याशी आलो. तो तिथे होता आणि आम्ही परतलो. त्याने लांब झगा घातला होता. आणि त्याच्याजवळ काळी बॅग होती.

त्याच्या जागेवर बसत, माझ्या खांद्यावर हात ठेऊन तो बोलला, “प्रिय मुला, छान केलेस. आभारी आहे. मी आभारी आहे.”

नंतर तो तिथे बसून पाइप ओढू लागला. जसे काही आधीच इंग्लंडबाहेर असल्यासारखा, तो शांत व समाधानी दिसत होता.

जोराच्या लाटा उसळल्या आणि आमची बोट मैलोनमैल पुढे गेली. मध्यंतरी आम्ही निसरड्या खडकांशी गेलो. तिथे आम्ही आमच्याजवळील काही खाल्ले व प्यायले. नंतर आम्ही परत बोट सुरु केली व दुपारभर ती चालवत राहीलो. अंधार पडू लागल्यावर आम्ही घरासारखा काही आसरा शोधायचा प्रयत्न केला. काही न सापडता आम्ही चार पाच मैल गेलो. नंतर आम्हाला छप्पर व उजेड दिसल्याने आम्ही सुटकेचा श्वास सोडला. लवकरच आम्ही दगडांच्या ओबडधोबड

किनाऱ्याला लागलो. मी एकटाच किनाऱ्यावर उतरलो. मला तो उजेड एका खानावळीच्या खिडकीचा असल्याचे दिसले. ती अस्वच्छ जागा होती.

स्वयंपाकघरातील शेगडी रसरसलेली होती. इथे आम्हाला नक्कीच खायला प्यायला मिळाले असते व उबाराही मिळाला असता. आम्हाला डबलबेड असलेल्या दोन खोल्याही कदाचित मिळाल्या असत्या. मी परत बोटीवर गेलो. आणि आम्ही सगळे बोटीतून खाली उतरलो. आम्ही चांगले जेवण केले. व्यवस्थापक आमच्या शेजारी बसून विचारू लागला, "आम्ही चार वल्ह्यांची बोट उसळलेल्या लाटांवर पाहीली का. आम्ही नाही, असे म्हणालो. तो म्हणाला, 'हे विचित्र आहे. ती बोट इथे काही वेळ डुचमळत उभी होती. मग लाटांच्या जोराने पुढे गेली. ती कुठेतरी बुडाली असावी. नाहीतर तुम्हाला ती दिसली असती.

हे ऐकून, मला दुःख झाले. काही केल्या ती चार वल्ह्यांची बोट माझ्या मनातून जाईना.

आम्ही अशी योजना केली होती, की प्रोव्हीस माझ्या खोलीत राहील व हर्बार्ट दुसऱ्या खोलीत राहील. मी कपडे न बदलता पलंगावर अडवारलो. आणि काही तास झोपलो. जेव्हा मी जागा झालो, तेव्हा वारा वाढला होता. आमच्या बोटीच्या सुरक्षेची काळजी वाटून, मी खिडकीबाहेर पाहीले. चंद्राच्या चांदण्यात मला दिसले, दोन माणसे एका बोटीत बसून, आत बघत होती. मला पहिल्यांदा वाटले, इतरांना उठवावे. पण ते दमले असल्याचे आठवून, मी उभे राहून त्या दोघांना दलदलीच्या पाणथळ जागा ओलांडतांना बघितले. तरीही त्या मंद प्रकाशात लवकरच ते दिसेनासे झाले. फार थंडी वाजू लागल्याने, मी विचार करत पहुडलो आणि परत एकदा मला झोप लागली.

आम्ही सकाळी लवकर उठलो. मी रात्री काय पाहीले, ते सर्वांना सांगितले. हर्बार्ट किंवा प्रोव्हीस, कुणालाच वाईट वाटल्याचे मला जाणवले नाही. ते म्हणाले, असे असेल, की त्या दोघांना आपल्यात काही रुची नसेल. मी देखील माझे मन

तसाच विचार करण्यास प्रवृत्त केले आणि खरेच ते तसे असू शकेल. आम्ही दुपारपर्यंत त्या खानावळीत राहीलो आणि मग आमची बोट पाण्यात लोटली. ज्या दिशेने जहाज गेले ती दिशा आम्ही पकडली. रात्री दीडपूर्वी आम्ही जहाजाचा धूर बघितला. त्यामागे लगेच दुसरे जहाज देखील आम्हाला दिसले. ती दोन्ही जहाजे खूप वेगाने चालली होती. तेव्हा प्रोव्हीस व मी हर्बार्टला अच्छा केला. माझे किंवा हर्बार्टचे कुणाचेच डोळे पूर्ण कोरडे नव्हते. मी आमच्यापुढील किनाऱ्यावरून, चार वल्ह्यांची बोट निघतांना पाहीली. ती आमच्याच दिशेने चालली होती. जहाज वेगाने येत होते. मी हर्बार्टला बोट त्याच्या कडेला नेण्यास सांगितली. मध्यंतरीच्या काळात चार वल्ह्यांची बोट देखील आमच्या बोटीजवळ येऊन थडकली. चार माणसे वल्ही मारत होती. आणि एकजण सुकाणू सांभाळत होता. आणि सहावा प्रोव्हीससारखा मनुष्य मोठा बुरखा पांघरून व डोळयांवर टोपी ओढून बसला होता.

त्या बसलेल्या माणसाने आमच्याकडे बघून सुकाणूधारकाच्या कानात काही कुजबुज केली. नाहीतर दोन्ही बोटींमध्ये एकही शब्द उच्चारला गेला नाही. दृष्टी चांगली असलेल्या हर्बार्टने काही मिनिटात, पहीले जहाज कुठले आहे ते शोधून काढले आणि तो मला हळू आवाजात बोलला, “हॅम्बर्ग” ते वेगाने आमच्याजवळ येत होते. त्याचा आवाज अधिकाधिक जवळ येऊ लागला. त्याची सावली आमच्या बोटीवर पडत असल्यासारखे मला वाटले, तेव्हाच त्या जहाजाच्या गॅलरीतून सुकाणूधारकाचा आवाज आला. तुमच्या बोटीवर गुन्हेगार आहे. त्याचे नाव अबेल मॅगविच आहे. मी त्या माणसाला बेड्या घालतो आणि त्याला शरण यायला समोर आणा. त्याच क्षणी, गॅलरीच्या आमच्या बाजूने तो धावत आला.

अचानक धक्का देऊन त्याने वल्ही आत घेतली आणि ते काय करत आहेत, हे आम्हाला कळायच्या आत, तो आमच्या बोटीत शिरला. यामुळे

जहाजावर गोंधळ माजला. मला आम्हाला हाका मारलेल्या ऐकू येत होत्या. आणि आम्हाला थांबण्याची आज्ञा देण्यात आली. त्याच क्षणी बोटीच्या सुकाणूधारकाने कैद्याच्या खांद्यावर हात टाकले. दोन्ही बोटी पाण्याच्या जोराबरोबर डुचमळून गोल फिरत होत्या. त्याच वेळेस मी पाहीले की कैदी वाकून दुसऱ्या बोटीवर जात होता आणि बोटीतील सहाव्या माणसाचा बुरखा ओढून काढत होता. त्याच वेळेस मला मी कधीही विसरणार नाही, असा. अनेक वर्षांपूर्वीच्या दुसऱ्या गुन्हेगाराचा भीतीने पांढरा पडलेला चेहरा दिसला. मग मला मोठ्याने रडारड व पाण्याचा मोठ्या सपकाऱ्याचा आवाज ऐकू आला आणि माझ्याखालील बोट बुडाल्याचा भास मला झाला.



# प्रकरण १७

# मॅगविचचा मृत्यु




मी एक दोन मिनिटे पाण्यात धावपळ केली. मग मला कोणीतरी पकडून, बोटीत ओढून घेतले. हर्बार्ट तिथे आधीच होता. पण आमची बोट व दोन गुन्हेगारही बुडाले होते. जहाज व त्याबरोबर आमची बोटही पुढे पुढे चालली होती. मला प्रथम पाण्यापासून आकाश वेगळे ओळखूच येईना व एका किनाऱ्यापासून दुसरा किनाराही वेगळा असा ओळखू येईना. बोटीतील ताफ्याने त्यांची वल्ही बाजूला ठेऊन दिली. प्रत्येकजण मागील पाण्याकडे बघत होता. एक दोन क्षणात उसळलेल्या पाण्यातून, एक काळी वस्तू आमच्याकडे येतांना दिसली. जेव्हा ती जवळ आली, तेव्हा तो मॅगविच असल्याचे व तो अगदी क्षीणपणे पोहत असल्याचे मला समजले. त्याला वर बोटीत ओढले गेले व लगेच त्याच्या हातात बेड्या

घातल्या गेल्या. दुसऱ्या गुन्हेगार माणसाकरता बोट पाण्यावर स्थिर व शांत ठेवली गेली. पण आता दुसरे जहाज वेगाने पुढे येऊ लागले. मिनिटाभरात पाणी उसळून, आम्ही बोटीत वेडेवाकडे पडू लागलो. परत पाणी शांत झाले, तेव्हा जहाज दूर निघून गेले होते. दोन्ही जहाजे दूर निघून गेल्यावर आणि प्रत्येकाला माहिती होते, की आता परिस्थिती निराशाजनक आहे.

शेवटी आम्ही सर्व प्रयत्न सोडून दिले व किनाऱ्याला लागलो. तेथील खानावळीत आमच्यासाठी एक आश्चर्य होते. तिथे मला छातीमध्ये व हाताला मोठी जखम झालेल्या मॅगविचसाठी गरम पांघरूण घेता आले.

त्यांनी मला सांगितले की बुरख्यातील व्यक्ती म्हणजे कॉम्पेयसन होता. त्यांना असे वाटत होते, की दोघेही खात्रीने जहाजाखाली पाण्यात बुडाले. सुकाणूच्या शेजारील परिघात काठीत अडकवलेली अनेक छोटी वल्ही उसळत होती. त्याने कुजबुजत्या आवाजात मला सांगितले, की ते दोघे हातात हात घालून, एकदम पाण्याखाली गेले. पण मॅगविच धडपड करून, पाण्याच्या पृष्ठभागावर आला.

मी बोटीतील ऑफिसरला विचारले, की मी त्याच्या अंगावरचे ओले कपडे काढून नवीन सुके कपडे विकत घेऊन, घालू शकतो का. तो आनंदाने तयार झाला. पण म्हणाला की त्या कैद्याजवळ जे जे असेल, ते ते तो ताब्यात घेणार. त्याने मॅगविचबरोबर लंडनला परत जाण्यासाठी मला रजा दिली. पण तो म्हणाला, की हर्बर्टने खुश्कीच्या मार्गानेच परत यायला पाहीजे.

नदीचा पूर ओसरेपर्यंत आम्ही खानावळीत राहीलो व मग बोटीने मॅगविचला जहाजावर सोडले. हर्बर्टने व मी उदास होऊन एकमेकांचा निरोप घेतला. आणि

जेव्हा मी मॅगविचच्या शेजारी बसलो, तेव्हा मला वाटले, की तो अजून जिवंत असेपर्यंत, ती माझी जागा आहे.

तो पाठीवर झोपून, मोठ्या मुश्किलीने श्वासोच्छवास करत होता. आणि हे दिसत होते, की तो आतून जखमी झाला होता. मला तो न आवडणे, सगळे निघून गेले आणि त्या स्वतःची शिकार झालेला प्राण्याने माझा हात त्याच्या हातात धरून ठेवला होता. तो फक्त मला मदत करणारा एक माणूस म्हणून दिसत होता --- जो नंतर माझ्यासाठी असलेला एक चांगला मनुष्य!

रात्र होऊ लागली, तसा त्याला श्वासोच्छवास करायला अजूनच त्रास होऊ लागला. मी त्याला माझ्या हातात उचलून विश्रांती द्यायचा प्रयत्न केला. माझी खात्री झाली, की तो मरायला टेकला आहे. आणि तेच त्याच्यासाठी चांगले असल्याने, मला ते सहन केलेच पाहीजे. जर तो जगला तर त्याच्यावर खटला होणार आणि शेवटी फाशीची शिक्षा होणार, कारण त्याने त्याचा द्वेष करणाऱ्या माणसाचा खून केलेला होता. माझ्यासाठी तो घरी आल्याचे मला खूप वाईट वाटल्याचे मी त्याला सांगितले.

तो उत्तरला, "प्रिय मुला, मी ती संधी घेतली, याचे मला खूप समाधान आहे. मी माझ्या मुलाला पाहीले होते आणि तो माझ्याशिवाय सभ्य माणूस होऊ शकतो. मी मरतो आहे, प्रिय मुला, आणि माझे जे जे आहे, ते तुला मिळेल."

तो चुकत होता. मला ते माहिती होते. एक कैदी म्हणून, त्याच्या सगळ्या चीजवस्तू राजाकडे जाणार होत्या. पण मी त्याला तसे सांगितले नाही. जेव्हा झुंजूमुंजू झाले. तेव्हा मला दिसले, की आता त्याचा शेवट जवळ आला आहे. त्याला घरघर लागली होती. तरी त्याच्या डोळ्यात प्रकाश होता, तोपर्यंत, त्याने

त्याची नजर माझ्या चेहऱ्यावर खिळवून ठेवली होती. त्याला तो कुठे आहे, काही समजत नव्हते.

एकदा तो कुजबुजला, “पिप, तू इथे आहेस का?”

मी म्हणालो, “मी इथेच आहे. तुला माझी गरज असेपर्यंत, मी कुठेही जाणार नाही.” मला माझ्या हातातील त्याचा हात थरथरतांना जाणवला. मला असे वाटले की त्याच्या जगण्याच्या शेवटच्या मिनिटाला, त्याला काही सांगितले तर त्याला बरे वाटेल.

मी म्हणालो, प्रिय मॅगविच, मला तुला काही सांगितले पाहिजे. तुला मी काय म्हणतो, ते समजते आहे का?” त्याने माझ्या हातावर थोडासा दाब दिला.




“तुला एक मुलगी होती, जिच्यावर तू प्रेम केलेस व तिला मुकलास.”

माझ्या हातावर जास्त दाब पडला.

ती जिवंत आहे. तिला बलवान मित्र मिळाले. ती आता एक सुंदर बाई झाली आहे आणि मी तिच्यावर प्रेम करतो!”

शेवटचा जोर करून, त्याने माझा हात त्याच्या ओठांशी नेला मग तो त्याच्या हातातून गळून पडला. त्याच्या डोळ्यांवर एक पडदा आल्याचे मी पाहीले आणि त्याचे डोके कलंडले. मला समजले, की तो मेला आहे.

# प्रकरण १८

# जो आणि बिडी




तर असे सर्व झाले. माझ्या अगणित अपेक्षांचे पुढे काहीच झाले नाही ---

मला मिस्टर जॅगर्सकडून असे समजले, की मॅगविचने माझ्या नावे मृत्युपत्र केले नव्हते, त्यामुळे मला कायदेशीरप्रमाणे त्याच्याकडून काहीच मिळाले नाही. मी लंडनमध्ये प्रथम आलो, त्यापेक्षा फारच वाईट परिस्थितीत होतो --- गेली काही वर्षे असायचे तसे, मला कर्ज झाले होते. आता कुठून पैसे मिळायची आशा नव्हती. अशा निराश काळात हर्बार्ट एका संध्याकाळी घरी आला आणि म्हणाला, "माझ्या प्रिय पिप, मला अशी भीती आहे, की मला तुला सोडून जावे लागेल.

जाईन. मी निदान काही महीन्यांसाठी पूर्वेकडे व्यवसायासाठी जातो आहे. मग मी क्लाराशी लग्न करण्यासाठी परतेन आणि परत तिला माझ्याबरोबर घेऊन जाईन. पिप, तू काय करशील?

मी सावकाश बोललो, "मला माहिती नाही. मला काय करावे लागेल, याचा मी काही विचार केला नाही."

त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्याचा चेहरा त्रासिक दिसत होता.

तो बोलला, "पिप, आमच्या शाखेत आम्हाला एका माणसाची जरुरी आहे"

तो अडखळला. पण तो काय म्हणणार, ते मला माहिती होते. मी म्हणालो, "एक कारकून?"

"हो, तू माझ्याबरोबर येशील का?"

मी डोके हलवले. माझ्या मनात काही बेत होते. फुकटचा काही उद्देश होता. त्यामुळे मी त्याची सूचना नाकारली.

मी म्हणालो, "काही काळ तू जर तुझी ही मागणी चालू ठेवलीस --- "

हर्बार्ट ओरडला, "काही काळ? सहा महिने, एक वर्ष!"

"नाही, फार तर एक दोन महीने. "आम्ही यावर हातमिळवणी केली. त्या आठवड्यातील शनीवारी हर्बार्टने माझा निरोप घेतला. नंतर मी माझ्या एकाकी घरी गेलो --- जर ते घर म्हणायच्या योग्यतेचे उरले असते तर, कारण आता ते माझ्यासाठी घर राहिले नव्हते. आणि मला अजून कुठे घर नव्हते. मी सावध होऊन, गंभीरपणे माझ्या परिस्थितीचा विचार करू लागलो. कारण माझ्याकडे पैसे उरले नव्हते आणि माझ्या डोक्यावर कर्ज होते. मला माहिती होते, की मी आता

आजारी पडणार आहे आणि मग अशी वेळ आली, की मी कसलाच विचार करू शकलो नाही.

एकादोन दिवस मी अंथरुणावर झोपून राहीलो. मी आजारपणात अधिकच बुडत चाललो. माझे डोके व हात पाय भयंकर दुखत होते. मला काही शक्ती व उद्देश देखील उरला नव्हता. मग ती चिंतेची व भीतीची लांब लचक रात्र आली. सकाळी मी जेव्हा उठून बसलो व विचार करू लागलो, तेव्हा मला तो ही करता येईना.

मग मला माझ्या अंथरुणाजवळ दोन माणसे माझ्याकडे बघत असलेली दिसली.

मी विचारले, ''तुम्हाला काय हवे आहे? मी तुम्हाला ओळखत नाही.''

त्यातील एकजण म्हणाला, ठीक आहे सर, लवकरच तुम्ही ही गोष्ट कराल. पण मी सांगतो, की मी तुम्हाला अटक करत आहे.''

''कर्ज किती आहे?''

''एकशे तेवीस पौंड , पंधरा शिलिंग आणि सहा पेन्स. सराफाचा हिशेब.

मुकाट्याने चल.''

मी उठून कपडे करायचा प्रयत्न केला. नंतर मी त्यांना पाहीले, तेव्हा ते अंथरुणापासून थोडे लांब, माझ्याकडे बघत उभे होते. मी अजून पडूनच होतो.

मी म्हणालो, ''तुम्ही माझी अवस्था बघत आहात. जर मी येऊ शकलो असतो, तर तुमच्याबरोबर नक्की आलो असतो. पण मला ते शक्य नाही. जर तुम्ही मला तुमच्याबरोबर नेलेत, तर मला वाटते, मी वाटेतच मरून जाईन.''

कदाचित त्यांनी उत्तर दिले किंवा वाद घातला. त्यांनी काय केले, मला माहिती नाही. मला एवढेच समजले, की त्यांनी मला त्यांच्याबरोबर नेले नाही. मला अनेक दिवस व आठवडे जगात काय चालले आहे, ते माहितीच नव्हते. मला ताप होता आणि मला खुनाची व हिंसेची; सुटकेची व अटकेची; आगीची व बुडल्याची; विचित्र स्वप्ने पडून, मी पछाडला गेलो होतो. कधीतरी मला मी खऱ्या लोकांबरोबर ते खुनी आहेत असे समजून भांडत आहे, असे वाटायचे आणि मग माझ्या लक्षात यायचे, की ते माझ्यासाठी काही चांगले करत आहेत आणि मग मी परत उशीत डोके खुपसायचो आणि हे सर्व लोक कुठल्या ना कुठल्या प्रकारे मला जो शी संबंधित वाटायचे. माझ्या आजारपणाच्या उच्चांकानंतर, मला माझ्याकडे येणारा प्रत्येक माणूस जो सारखा वाटू लागला. रात्री मी डोळे उघडून बघत बसे आणि माझ्या अंथरुणाशेजारी मला जो बसलेला दिसे. दिवसा मी खिडकीशी बसल्यावरदेखील मला परत जो दिसे.

शेवटी एक दिवस मी धीर करून,मी विचारले, “हा जो आहे का?” आणि तो प्रेमळ आवाज बोलला, “हो पिप, मी जो आहे.”

“जो, तू माझे हृदय तोडतो आहेस. तू माझ्याकडे रागाने बघतो आहेस. मी तुझ्याशी ज्या पद्धतीने वागलो, त्यानंतर तरी जो, तू माझ्याशी इतके चंगले वागू नकोस.”

जो काहीच बोलला नाही. पण मला माहिती असलेल्या त्याच्या आनंदाने, त्याने त्याचे हात माझ्या गळ्यात टाकले.

मी त्याला विचारले, मी किती काळ आजारी आहे?”

“पिप, आता मे महीना संपत आला. उद्या एक जून आहे.”

“आणि एवढे दिवस तू इथेच आहेस?”

“जवळजवळ --- मला मिस्टर वेमिकने मला तू आजारी असल्याचे पत्र लिहिल्यापासून मी इथे आहे.”

मग तो म्हणाला, की तुला बरे वाटल्याशिवाय, जास्त बोलू नकोस. अनेक महिने तुझे मन शांत नाही. ते शांत ठेऊन झोप.

दुसऱ्या दिवशी मी त्याला विचारले, की मिस हॅविशाम बरी झाली का?” त्याने मान हलवली.

तो म्हणाला, “तू आजारी पडल्यावर आठवड्याने ती वारली.”

“तिच्या संपत्तीबद्दल तू काही ऐकलेस का?”

“हो, ती सर्व इस्टेलाला गेली.”

नंतर तो घाईने इतर गोष्टींबद्दल बोलला. जणू काही त्याला इस्टेलाचे नाव उच्चारून, मला दुःख द्यायचे नव्हते.

दिवस जात राहिले. जो माझ्याबरोबर राहीलेला होता. माझी शक्ती हळूहळू भरून आली. मी चालत जाऊन बागेत फिरू शकतो आहे, असे सुरु आल्यावर एक दिवस मी जो च्या हातावर रेलून बोललो, “जो, मी आजारी पडलो, म्हणून मला तुझे आभार मानायची संधी मिळते आहे. आपण एकत्र घालवलेला वेळ मी कधीच विसरणार नाही. मी कधीतरी तुला विसरलो होतो. पण हे दिवस मी जिवंत असेपर्यंत कधीच विसरणार नाही.”

त्या रात्री मी जेव्हा झोपायला गेलो, तेव्हा जो माझ्या खोलीत आला आणि त्याने विचारले, की मी सकाळी होतो तितका बरा आहे का.

मी उत्तरलो, “हो जो, मला आता बरेच बरे वाटते आहे.”

त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवला. मान हलवत, ह्सला आणि विचित्र आवाजात बोलला, “पिप, माझ्या आवडत्या मुला, “शुभ रात्र.”



मी त्या रात्री खूप वेळ जागा राहिलो. मी आजारी पडण्यापूर्वी माझ्या

मनातील उद्देश कसकसा आकार घेत होता, याचा विचार मी करत होतो. जेव्हा मी सकाळी अधिक ताकदवान व ताजातवाना होऊन उठलो,तेव्हा मी कपडे करून, ताबडतोप त्याच्या खोलीत गेलो. आणि मला तो तिथे दिसला नाही. मी घाईने न्याहारीच्या टेबलाशी गेलो. आणि मला तिथे एक पत्र मिळाले. त्यात असे लिहिले होतेः

*‘पिप, तू आता बरा झाला आहेस व माझ्या मदतीशिवाय देखील अजून सुधारशील. मी निघतो आहे.’*

जो

ताजा कलमः तुझा कायमचा उत्तम मित्र

याबरोबर कर्ज फेडल्याची त्याच्या नावाची पावती होती. जो माझे कर्ज फेडेल, असे कधी माझ्या स्वप्नातही आले नव्हते. माझ्यासाठी काय उरले, तर त्याच्या जुन्या छान कामाच्या जागेला भेट देणे आणि माझे पुढील बेत काय आहेत, ते सांगणे? बिडीला भेटणे हादेखील उद्देश होताच. मी किती नम्रपणे परत आलो हे दाखवणे आणि मी एकदा ज्याची आशा करत होतो, ते सर्व मी गमावले असल्याचे तिला सांगणे. तिला लग्नाबद्दल विचारणे आणि मी जो बरोबर काम करणार असल्याचे सांगणे. उरलेले आयुष्य आपण तिघे एकत्र काढू असेही तिला सांगणे. हा माझा उद्देश होता. अजून एका आठवड्याने जास्त बरे वाटल्यावर, मी गावाला गेलो. जूनची हवा चांगली होती. आकाश निळे होते. हिरव्या मक्याच्या

शेतात पक्षी उंच आवाजात गात होते. मला पूर्वीपेक्षाही हा गावाकडील भाग अधिक सुंदर व शांततापूर्ण वाटत होता. माझे मन माझ्या आयुष्यात पुढे येणाऱ्या --- आनंदी चित्रांनी भरून गेले होते. शेवटी जो ची कामाची जागा अगदी जवळ आली आणि मी जो च्या हातोड्याचा आवाज ऐकण्यास, अधीर झालो. मी खूप काळानंतर तो ऐकणार होतो. पण सर्व काही भीती वाटेल, इतके शांत होते. मी जवळ गेल्यावर मला ते सामसूम व बंद दिसले. पण घर रिकामे नव्हते. ते वापरते दिसत होते. खिडकी उघडी होती व तिथे ताजी फुले ठेवलेली होती. मी दार उघडून आत गेलो जो आणि बिडी माझ्यासमोर हातात हात घालून, उभे राहीले

मला पाहील्या क्षणी जणू माझे भूत पाहिल्यासारखे, बिडी प्रथम किंचाळली. पण दुसऱ्याच क्षणी ती माझ्या मिठीत होती आणि रडत होती. कारण मी पांढरा पडून अशक्त दिसत होतो.

“माझ्या प्रिय बिडी, तू किती हुशार दिसते आहेस!”

“हो, पिप.”

“आणि जो, तू देखील हुशार दिसतो आहेस.”

“हो, प्रिय पिप.” मी एकाकडून दुसऱ्याकडे पाहीले आणि मग ---

बिडी आनंदाने फुलून म्हणाली. मी जोबरोबर लग्न केले आहे!”

माझ्याकडे असलेले सर्व मी विकले आणि जाऊन हर्बार्टला भेटलो. दोन महिन्याच्या आत, मी त्याच्या कार्यालयाच्या शाखेत कारकून म्हणून काम करत होतो. चार महिन्यांनंतर, हर्बार्ट क्लाराशी लग्न करायला गेला आणि तो तिला घेऊन, परत येईपर्यंत मी तेथील शाखाप्रमुख झालो.

काही वर्षांनंतर मी त्या व्यवसायात भागीदार झालो. मी आनंदाने हर्बार्ट व त्याच्या बायकोबरोबर राहू लागलो. जो ने माझे कर्ज फेडले होते, ते पैसे मी त्याला परत केले. मी दर आठवड्याला त्याला पत्र लिहू लागलो. आमचा व्यवसाय तुफान कधीच चालला नाही, पण आमचे चांगले नाव झाले. आम्ही कसून, काम करत असू. त्यासामुळे चांगले पैसे मिळत. मी काही शिल्लक टाकू शकलो. आणि शेवटी मी सुट्टी घालवायला घरी आलो.

आणि मग काय झाले, ते सर्व मी सांगणार आहे.

# प्रकरण १९

## डिसेंबरची संध्याकाळ




जरी मी नेहमी पूर्वेकडील त्यांच्याबद्दल विचार करत असलो, तरी अकरा वर्षात मी जो किंवा बिडीला भेटलो नव्हतो. जेव्हा डिसेबरच्या एका संध्याकाळी, काळोखानंतर एक दोन तासांनी, मी स्वयंपाकघराचे जुने दार उघडले. तेव्हा मी ते इतके हळूवारपणे उघडले, की त्याचा आवाज आला नाही. आणि मी कुणाला न दिसता, मी बघितले, की केस करडे झालेला व नेहमीप्रमाणे मोठा, दणकट जो

शेकोटीशी बसला आहे आणि पाइप ओढतो आहे. माझ्या लहानशा खुर्चीत कोण बसले होते, तर एक लहान मुलगा! मी परत बघितले.

मुलाशेजारील एका खुर्चीत मी बसलो तेव्हा जो म्हणाला, “तुझ्यासाठी , आम्ही त्याला पिप म्हणत होतो आणि आम्ही अशी आशा करतो, की तो कदाचित थोडासा तुझ्यासारखा वाढेल आणि आम्ही विचार केला की असेच झाले आहे.

मलाही तसेच वाटले. दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्याला फिरण्यासाठी बाहेर काढले. आणि आम्ही समजूतदारपणे एकमेकांशी बोलत राहीलो. मी त्याला चर्चच्या अंगणात नेले आणि तेथील स्मशानातील विशिष्ट दगडावर बसवले आणि खूप खूप गोष्टी आठवल्या.

जेवणानंतर मी बिडीला म्हणालो, मी म्हणालो, “या वयाच्या पिपला तू मला द्यायला पाहिजेस.

किंवा सर्व घटनाच्या वेळी तू त्याला मला सांभाळायला द्यायला पाहिजेस.

बिडी हळू म्हणाली, “नाही, तू लग्न केले पाहिजेस. तिने तिचा हात माझ्या हातावर ठेवला आणि बोलली, “पिप, मला सांग, तू तिला अगदी विसरून गेला आहेस का?”

“माझ्या प्रिय बिडी, मी आयुष्यातील काहीच विसरलेलो नाही. पण ते जुने स्वप्न कायमचे निघून गेले. हे म्हणतांना मला माहिती होते, की मला त्या संध्याकाळी तिच्यासाठी एकट्याने त्या जुन्या जागेला भेट द्यायची होती. हो, ते असेच होते. इस्टेलासाठी.

मी तिला अती दुष्टपणे वागणाऱ्या नवऱ्यापासून अलग होऊन, अत्यंत दुःखी जीवन व्यतीत करत असलेले ऐकले होते. आणि घोड्याला त्रास दिल्याच्या पार्श्वभूमीवर ड्रुमालच्या अपघाती मृत्युबद्दलदेखील मी ऐकले होते.

हे दोन वर्षांपूर्वी घडले होते. मला माहिती होते, त्याप्रमाणे, तिने परत लग्न केले होते. त्या संध्याकाळी जेवणानंतर मी बाहेर पडलो आणि अंधार होण्याच्या सुमाराला त्या जागेशी आलो. आता तिथे घर नव्हते. पण बागेची भिंत अजून होती. पातळसर धुके पसरले होते आणि अजून चंद्र उगवला नव्हता. पण धुक्यामागे चांदण्या लखलखत होत्या. इमारतीचे काहीही अवशेष नव्हते. तिथे फार अंधार नव्हता. जुन्या पडलेल्या घराचा कुठला भाग कुठे होता, ते मला आठवत होते. आणि मी त्याकडे चालत असतांना, मला एक एकाकी आकृती तिथे उभी असलेली दिसली. जसा मी जवळ गेलो, मला ती आकृती एका बाईची असल्याचे लक्षात आले. मी अजून जवळ गेल्यावर, मला फार आश्चर्य वाटले, की ती मला हाक मारत होती.

मी ओरडलो, “इस्टेला!”

तिने तिचे दोन्ही हात पसरले आणि मी ते माझ्या हातात घेतले.

ती म्हणाली, “मी बदलले आहे. मला नवल वाटले, की तू मला ओळखलेस.

तिच्या सौदर्यातील ताजेपणा खरेच गेला होता. ती आता मुलगी राहीली नव्हती. पण ती आल्हादक बाई झाली होती. मी कधीही न पाहिलेले आकर्षण तिच्या चेहऱ्यात होते. उदाहरणार्थ, एके काळच्या अभिमानी डोळ्यातील मवाळ प्रकाश आणि मला पूर्वी कधीही न जाणवलेला एके काळी थंड असलेल्या हातांचा

मित्रत्वाचा स्पर्श! आम्ही जवळील एका बाकावर बसलो. आणि मी म्हणालो, “इतक्या वर्षांनंतर आपण इथे भेटावे, हे विचित्र आहे. तू नेहमी इथे येतेस का?”

“मिस हॅविशाम वारल्यापासून मी कधीही इथे आलेली नाही.”

“मी पण नाही.”

चंद्रोदय होऊ लागला आणि कुठल्यातरी कारणाने, आणि मला बोटीतील बिचाऱ्या मॅगविचच्या मरणाची आठवण आली. आम्ही शेवटचे शब्द बोलतांना त्याने दाबलेला माझा हात आठवला.

“इस्टेलाने विचारले, “तू इथे भटकत होतास. जुन्या जागेची अशी अवस्था झालेली पाहून,” तुला आश्चर्य वाटले का?”

“हो, इस्टेला.”

“जमीन माझी होती. ती फक्त मालकी होती. मी काही सोडून दिले नव्हते. बाकी सर्व माझ्या हातून हळूहळू निसटले. पण हे मी अजून ठेवले आहे.”

“इथे तू नवीन काही बांधणार आहेस का?”

“हो. ते बांधण्यापूर्वी जुन्या जागेचा निरोप घेण्यासाठी मी आले आहे आणि तू, --- तू अजून परदेशी रहातोस का?”

“अजून?”

“आणि माझी खात्री आहे, की --- तुझे छान चाललेले असणार.”

“मी पुरेशा चांगल्या आयुष्यासाठी भरपूर कष्ट करतो. हो आता माझे छान चालले आहे.”

इस्टेला म्हणाली, “मी नेहमी तुझी आठवण काढत असे.”

“खरे की काय?”

“अगदी अलीकडेपर्यंत, सतत.”

तिचा आवाज असा होता, की मी तिच्या डोळ्यात बघितले.

मी उत्तरलो, “माझ्या हृदयात तुझ्यासाठी नेहमीच जागा होती.”

आणि मग बराच वेळ आम्ही शांत होतो.

ती अचानक बोलली, “मला सांग, आपण अजूनही मित्र आहोत का?”

मी उठलो आणि तिचा हात हातात घेतला. मी म्हणालो, “आपण मित्र आहोत.” आम्ही त्या पडीक जागेपासून दूर गेलो.

जेव्हा मी जो ची कामाची जागा सोडली, तेव्हा जसे सकाळचे धुके पसरले होते, तसेच संध्याकाळचे धुके आता पसरत होते. आणि शांत असीम प्रकाशात, मला तिच्यापासून बाजूला होणारी कुठलीच सावली दिसली नाही.












वृषाली जोशी
यांची
त्रेपन्न पुस्तके










वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
भाग १


वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
भाग २


वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
संग्रह ३


MOBY DICK
HERMAN MELVILLE
वृषाली जोशी
मॉबी डिक


वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स


वृषाली जोशी
कहाणी दोन शहरांची
A Tale of Two Cities
CHARLES DICKENS


वृषाली जोशी
AMERICAN
STORIES
अमेरिकन लघुकथा


DOWN AND OUT
IN PARIS
AND LONDON
GEORGE
ORWELL
भाग १
पॅरिस
वृषाली जोशी


DOWN AND OUT
IN PARIS
AND LONDON
GEORGE
ORWELL
भाग २
लंडन
वृषाली जोशी

ज्या कव्हरवर क्लिक कराल

ते पुस्तक उघडेल

(नेट आवश्यक)

*Agatha Christie*





















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)

Agatha
Christrie



















वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह


कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी


वृषाली जोशी
मार्क ट्वेन


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक


वृषाली जोशी
विश्वकथा१


वृषाली जोशी


वृषाली जोशी
विश्वकथा-३


वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night




शेरलॉक होम्स

भाग १ ते ८ (५० कथा)

ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल





















## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.

## डॉ. वृषाली जोशी यांचे हे चौपन्नावे पुस्तक आहे.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपलॆ साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे. अनुवादाचा तिनशे रुपये पर पेज हा रेट धरला तरी सुमारे तीस लाख रुपयांचे हे काम त्यांनी मराठी वाचकांसाठी विनामूल्य केले आ्हे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ

मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (५६पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी (५४)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२६), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (४) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३),

विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे, सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(२), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(३), कैलास बडगुजर, अंजुषा पाटील असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।